


सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ १९२६

आसमंतसह

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, ६ ऑक्टोबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३३६ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


# काँग्रेसला हवा कमकुवत भारत

## सत्तेत आल्यास कल्याणकारी योजना बंद करेल ● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घणाघात

◆ **वाशीम, ५ ऑक्टोबर**

शहरी नक्षलवाद हा काँग्रेसचा एकमेव अजेंडा आहे. देशाचे सतत अहित साधण्यासाठी उभ्या असलेल्या या शक्तींना काँग्रेसचा पाठिंबा आहे. सध्या शहरी नक्षल्यांच्या एका मोठ्या टोळीकडे काँग्रेसची सूत्रे आहेत आणि त्यांच्या माध्यमातून या पक्षाला सत्तेत यायचे आहे. त्यामुळे काँग्रेसपासून सावध राहा, असा जोरदार घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी येथे केला. कमजोर व अविकसित भारत हीच काँग्रेसची संकल्पना आहे, असा आरोपही त्यांनी केला.

शहरी नक्षल्यांशी हातमिळवणी करून देशाचे विभाजन करण्याचा घातक कट काँग्रेसने रचला आहे. अशा स्थितीत देश एकत्र आला, तर आपला डाव हाणून पडेल, या भीतीपोटी हा पक्ष देशाचे तुकडे करू पाहत आहे, असे मोदी म्हणाले. आपल्या सत्ताकाळात काँग्रेसने गरिबांना लुटले आहे. राजकीय फायद्यासाठी या पक्षाने कधीच त्यांचा विकास केला नाही. केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी अनेक योजना सुरू केल्या. निधीही उपलब्ध करून दिला. महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार आले तर शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या योजना बंद करण्याचे काम करतील, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी पोहरादेवी येथे नगारा भवनच्या उद्घाटनानंतर सभेत केला.

व्यासपीठावर राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, राजीवरंजन सिंह, प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार आदी उपस्थित होते.

इंग्रजी हुकूमशहाप्रमाणेच काँग्रेसचे घराणे दलित, पीडित, शोषित, आदिवासी व बंजारा यांना आपल्या बरोबरीने मानत नाही. त्यामुळेच स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षांनंतरही हा समाज मागे आहे. ज्यांना कोणी विचारत नाही, त्यास मोदी जवळ करतो, असे काँग्रेस व गांधी कुटुंबाचा अप्रत्यक्ष उल्लेख करीत पंतप्रधानांनी निशाणा साधला. ◂(तभा वृत्तसेवा)



पोहरादेवी येथील जगदंबा मंदिरात देवीची आरती करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

### अमली पदार्थ तस्करीत काँग्रेस नेता

दिल्लीत हजारो कोटींचे अमली पदार्थ पकडले. यात काँग्रेसचा नेता अडकल्याचा आरोप करीत नरेंद्र मोदी म्हणाले की, या पैशातून काँग्रेस आपल्यात फूट पाडण्याचे प्रयत्न करणार आहे.

## महत्त्वाचे

### रतन टाटांनी मिळवला २३ हजार टक्के परतावा



**मुंबई** : टाटा सन्सचे मानद अध्यक्ष रतन टाटा यांनी ब्रोकरेज प्लॅटफॉर्म अपस्टॉक्समधील ०.०६ टक्के हिस्सा १८ कोटी रुपयांमध्ये विकला. कंपनीतील त्यांच्या मूळ गुंतवणुकीवर त्यांना २३ हजार टक्के परतावा मिळाला आहे. कंपनीचे मूल्यांकन २०२२ मध्ये ३.५ अब्ज डॉलर्स होते. रतन टाटा यांनी आठ वर्षांपूर्वी अपस्टॉक्समध्ये गुंतवणूक केली होती. या शेअर विक्रीनंतर टाटांचा अपस्टॉक्समधील हिस्सा १.२७ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. टाटा सन्स ही देशातील सर्वांत मोठी औद्योगिक समूह टाटा समूहाची होल्डिंग कंपनी आहे. टाटा समूहाचे अनेक दशके नेतृत्व केल्यानंतर ८० वर्षीय रतन टाटा यांनी शेकडो कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली. मूल्यांकन सुधारल्याने आता ते नवीन युगातील कंपन्यांमधील आपली गुंतवणूक विकत आहे. अपस्टॉक्सपूर्वी रतन टाटा यांनी आयपीओद्वारे बेबी केअर प्लॅटफॉर्म फर्स्टक्रायचे काही शेअर्स विकले होते.

### हरयाणात ६१ टक्के मतदान

**नवी दिल्ली** : ९० सदस्यीय हरयाणा विधानसभा निवडणुकीत ६१ टक्के मतदान झाले होते. मतदान सुरळीत आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडले. आजच्या मतदानाने मुख्यमंत्री नायबसिंह सैनी, माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांच्यासह १,०३१ उमेदवारांचे भाग्य ईव्हीएममध्ये बंद झाले. मेवात जिल्ह्यात सर्वाधिक ६८.२८ टक्के तर, गुरुग्राममध्ये सर्वात कमी ४९.९७ टक्के मतदान झाले. अंबालात ६२.२६ टक्के, भिवानीत ६३.०६ टक्के, फरिदाबाद ५१,२८ टक्के, फतेहाबाद ६७.०५ टक्के, हिसारमध्ये ६४.१६ टक्के, झज्जरमध्ये ६०.५२ टक्के, जिंदमध्ये ६६.०२ टक्के, पंचकुलात ५४.७१ टक्के, पानीपतमध्ये ६०.५२ टक्के, सोनीपतमध्ये ५६.६९ टक्के, कर्नालमध्ये ६०.४२ टक्के, कुरुक्षेत्रमध्ये ६५.५५ टक्के, रोहतकमध्ये ६०.५६ टक्के मतदान झाले. ५ वाजेनंतरही मतदार मोठ्या संख्येत केंद्रांवर होते, त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढू शकते.

# नियत खोटी असल्याने राजकोट किल्ल्यावरचा पुतळा पडला : गांधी

**तभा वृत्तसेवा,**
**कोल्हापूर, दि.५ ऑक्टोबर-**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आयुष्यभर एक विचारधारा मनात बाळगून संघर्ष केला. हा देश सर्वांचा आहे, आपल्याला सगळ्यांना घेऊन चालायचं आहे, हा संदेश शिवाजी महाराजांनी संपूर्ण जगाला दिला. भारताचं संविधान हे शिवाजी महाराजांच्या विचारांचं प्रतीक आहे. मात्र, आज देशातील एक विचारधारा हे संविधान संपवण्याच्या योजना आखत आहे. याच विचारधारेच्या लोकांनी राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला होता. पण त्यांची नियत खोटी असल्याने हा पुतळा पडला. एकीकडे शिवाजी महाराजांच्या पायावर डोके टेकवायचे आणि त्यानंतर २४ तास त्यांच्या विचारधारेविरोधात काम करायचे, ही त्यांची वृत्ती आहे. त्यामुळे राजकोट किल्ल्यावरील पडलेल्या पुतळ्याने एक संदेश दिला आहे की, शिवरायांचा पुतळा उभारला जात असेल तर संबंधितांकडून त्यांच्या विचारांचं संरक्षण झालं पाहिजे, असे राहुल गांधी यांनी म्हटले. कोल्हापुरात आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात बोलत होते.

त्यांनी म्हटले की, शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा फक्त पुतळा नाही. आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीचा पुतळा उभारतो तेव्हा त्यांच्या कर्माचं आणि विचारधारेचं मनापासून समर्थन करतो. त्यामुळे आता शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण केल्यानंतर आपण शिवराय आयुष्यभर ज्यासाठी लढले, त्याच्यासाठी आता आपण लढा दिला नाही, तर नुसता पुतळा उभारुन काही अर्थ नाही. शिवाजी महाराज ज्यांच्याविरोधात लढले, ज्याप्रकारे लढले तेवढं नाही पण काही अंशी तरी आपण काम केले पाहिजे, असे राहुल गांधी यांनी सांगितले.



शिवाजी महाराज आणि शाहू महाराज नसते तर या देशात संविधान आकाराला आले नसते. संविधान आणि शिवाजी महाराजांच्या विचारांचा थेट संबंध आहे. भारतात सध्या दोन विचारधारांची लढाई सुरु आहे. एक विचारधारा शिवाजी महाराजांच्या विचारांचं प्रतिक असणाऱ्या संविधानाचं रक्षण करते, समानता आणि एकता मानते. ही शिवरायांची विचारधारा आहे. दुसरी विचारधारा संविधान संपवण्यासाठी २४ तास काम करत आहे. शिवाजी महाराजांचं संविधान कसं संपवायचं, याचा विचार ते २४ तास करतात. देशातील संस्थांवर आक्रमण करतात, लोकांना धमकावतात आणि शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर जाऊन डोकं टेकतात. तुम्ही शिवरायांच्या पुतळ्यासमोर डोकं ठेवत असाल तर तुम्हाला संविधानाचे रक्षण करावे लागेल.

# हरयाणात काँग्रेस, जम्मू-काश्मिरात नॅकॉ-काँग्रेसला आघाडी

### एक्झिट पोलचा अंदाज

◆ **नवी दिल्ली, ५ ऑक्टोबर**

हरयाणात काँग्रेसला बहुमत मिळेल, असा अंदाज शनिवारी बहुतांश एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. जम्मू-काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेसला आघाडी मिळेल. येथे प्रादेशिक भागीदार सर्वांत मोठा पक्ष ठरेल, असा अंदाजही वर्तवण्यात आला.

हरयाणातील ९० सदस्यीय विभानसभेत काँग्रेसला ४४ ते ५५ आणि भाजपाला १५ ते २९ जागा मिळतील, असा अंदाज दैनिक भास्करने वर्तवला. इंडिया टुडे-सी व्होटरच्या अंदाजात भाजपाला २० ते २८ आणि काँग्रेसला ५० ते ५८ जागा मिळतील. रेड माईक-दतांशने हरयाणात काँग्रेसला ५० ते ५५ जागा आणि भाजपाला २० ते २५ जागा दिल्या आहेत. ध्रुव रिसर्चने काँग्रेसला ५० ते ६४ आणि भाजपाला २२ ते ३२ जागा दिल्या आहेत. पीपल्स पल्सने काँग्रेस ४९ ते ६० आणि भाजपा २० ते ३२ जागा जिंकण्याचा अंदाज वर्तवला. बहुतांश एक्झिट पोलमध्ये जेजेपीपेक्षा आयएनएलडीच्या जागा जास्त दाखवण्यात आल्या, तर इतरांना १० जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला.

केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरच्या ९० सदस्यीय विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्स आघाडीला ४० ते ४८ आणि भाजपाला २७ ते ३२ जागा मिळतील, असा अंदाज सी-व्होटर-इंडिया टुडेने काढला. नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीला ३५ ते ४० आणि भाजपाला २० ते २५ जागा मिळतील, असा अंदाज दैनिक भास्करने वर्तवला आहे. पीपल्स पल्सने भाजपाच्या २३ ते २७ आणि नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीला ४६-५० जागा दाखवल्या आहेत. भाजपाला २८ ते ३० तसेच एनसी-काँग्रेस आघाडीला ३१-३६ जागा मिळण्याचा अंदाज रिपब्लिकन-गुलिस्तानने वर्तवला आहे. वेगवेगळ्या पोलमध्ये पीडीपी ५ ते १२ जागांवर विजयी होईल, तर इतरांना ४ ते १६ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला. विधानसभा निवडणुकींचे निकाल ८ ऑक्टोबर रोजी जाहीर केले जातील. ◂(वृत्तसंस्था)

### राहुल गांधी यांनी कोल्हापुरात टेम्पोचालकाच्या घरात बनवला स्वयंपाक!

**कोल्हापूर** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी शुक्रवार व शनिवार असे दोन दिवस कोल्हापूर दौऱ्यावर आले आहेत. शिवाजी महाराज पुतळा अनावरण आणि संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहिले. दरम्यान, विमानतळावर उतरून ते थेट एका सामान्य कुटुंबाच्या घरी गेले. तिथे जाऊन त्यांनी स्वतः स्वयंपाक करून त्या कुटुंबाला जेवूही घातले. राहुल गांधी अजयकुमार सनदे यांच्या घरी गेले होते. याबाबत प्रतिक्रिया देताना अजयकुमार सनदे कुटुंबियांनी आनंद व्यक्त केला.

# मुंबईतील १११ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**मुंबई, ५ ऑक्टोबर**

निवडणूक आयोगाचे अधिकारी महाराष्ट्र दौऱ्यावर असताना त्यांनी अधिकाऱ्यांच्या बदल्या वेळेत न केल्याबाबत नाराजी व्यक्त केली होती.

त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर शनिवारी १११ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने एका पदावर तीन वर्षे पूर्ण झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचा आदेश निवडणूक आयोगाने दिला होता.मात्र, यावर प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने ३१ जुलै रोजी पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश दिला होता तसेच आदेशाचा अनुपालन अहवाल २० ऑगस्टपर्यंत सादर करण्यास सांगितले होते. मात्र, त्यानंतरही बदल्या करण्यात झाल्या नव्हत्या. १३० पोलिस अधिकाऱ्यांची मध्यावधीत बदली करण्यास गृह खात्याने असमर्थता दर्शवली होती. मध्यावधी बदलीचा पोलिस अधिकाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होण्याची भीती गृह खात्याने वर्तवली होती.



# अखेर भीमा-सीना नदीजोड प्रकल्पास मंजुरी

### आ. सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/मंद्रुप, दि. ५ ऑक्टोबर-**

भीमा-सीना जोडकालव्यास 0.५११ टीएमसी पाण्याची तरतूदीस शासनाने दिनांक १ ऑक्टोबर रोजी मंजुरी दिली आहे. या जोड कालव्यामुळे सीना नदीवरील एकूण ५३ किमी लांबीच्या परिसरातील शेतकर्यांना सिंचनासाठी पाणी मिळणार आहे. आ. सुभाष देशमुख यांनी योजनेसाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

पावसाळ्यात वडापूर येथील बंधाऱ्यावरून भीमा नदीतून खालच्या भागात पावसाळ्यात पुरावेळी जवळपास ६0 ते १00 टीएमसी पाणी वाहून जाते. वडापूर येथे भीमा नदीवर बॅरेज बांधून हे पाणी बोगद्याद्वारे सीना नदीत सोडले जाणार आहे. वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागाकडे वळवण्यात येणार असल्याने आता बारमाही सिंचनासाठी मिळणार आहे. भीमानदीवर वडापूर येथे बॅरेजसाठी दक्षिण सोलापूरचे आ. सुभाष देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून दुष्काळी भागातील शेतकर्यां साठी त्यांनी आपले कसब पणाला लावले आहे. वडापूर बॅरेज येथून जोडकाल्याद्वारे १४.४७ दशलक्ष घन मिटर इतके पाणी सीना नदीत येणार आहे. सीना नदीवरील नंदूर, वडकबाळ, सिंदखेड, बंदलगी, कोर्सेगाव व कुंडल येथे कोल्हापूर पद्धतीचे ६ बंधाऱ्यात उजनी धरणाचे पाणी उपलब्ध होणार आहे. या जोडकालव्याची लांबी १८ किमी असून सीना नदीवरील कोल्हापूर बंधारा अकोले मंद्रूप ते कुडलसंगम पर्यंतचे अंतर ३५ किमी आहे.



#### या गावांना होणार फायदा

या वाढीव 0.५११ टीएमसी पाण्यामुळे नंदूर, डोणगाव, तेलगाव, अकोले मंद्रुप, गुंजेगाव, पाथरी, वांगी, मनगोळी, वडकबाळ, वांगी, हत्तूर, समशापूर, सिंदखेड, बिरनाळ, चंद्रहाळ, होनमुर्गी, बंदलगी, औराद, राजूर, संजवाड, चिंचोली, कोर्सेगाव, कुमठा, केगाव, हत्तरसंग, बोळकवठा, कल्लकर्जाळ या बागायती क्षेत्र वाढणार आहे.

#### शेतकऱ्यांच्या विकासाला गती येणार : आ. देशमुख

सर्वांच्या सहकार्याने आणि पाठपुराव्यामुळे ही योजना पूर्ण होत आहे. योजना लवकरच कार्यान्वीत होण्यासाठी आपण सर्वांना एकत्रीत येणे ही काळाची गरज आहे. या योजनेमुळे शेतकर्यांच्या विकासाला व उत्पन्नाला भविष्यात चांगलीच गती मिळणार आहे, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

सीना नदीला कालव्याचा दर्जा मिळावा म्हणून गेली २५ वर्षे आम्ही मागणी करत होतो परंतु बापूच्या रुपाने आम्हाला पुन्हा एकदा पृथ्वीवरती भगीरथ भेटला आणि आमच्या भावी पिढींचा कल्याण होणार आहे त्याच्यासाठी आम्हाला हे भगीरथ वाटतात.

**- संदीप टेळे,** पंचायत समिती सदस्य, औराद

जगामध्ये सध्या वाटल तेवढा आर्थिक पुरवठा होऊ शकतो पैसा कुठे नाही उपलब्ध करता येतो परंतु पाण्याची निर्मिती करता येत नाही त्यामुळे पाणी उपलब्ध करता येत नाही परंतु बापूंनी सर्व कसं पणाला लावून ताकद पणाला लावून आमच्या भागाला पाणी उपलब्ध करून दिलं आमच्या भविष्यातल्या सगळ्या पिढ्या समृद्ध होणार आहेत.

**- दयानंद माने,** अकोले मंद्रूप, प्रगतशील बागायतदार -




## महत्त्वाचे

### बडोदा विमानतळाला धमकी देणारा ई-मेल

**बडोदा :** येथील विमानतळावरील अधिकाऱ्यांना बॉम्बची धमकी देणारा ई-मेल प्राप्त झाला. कसून चौकशी केल्यानंतर तो फसवा निघाल्याचे पोलिसांनी सांगितले. येथील हरणी विमानतळावर तैनात असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाला शुक्रवारी सकाळी ईमेल प्राप्त झाला. यात अहमदाबाद, राजकोट आणि भूजसह विमानतळांची यादी आहे; पण बॉम्बचे ठिकाण निदिष्ट केले नाही. ईमेलमध्ये सूचीबद्ध केलेल्या सर्व विमानतळांसाठी ही धमकी सामान्य होती. विमानतळ परिसर आणि फनेल क्षेत्राचा शोध घेण्यात आला आणि बॉम्बची धमकी फसवी असल्याचे आढळून आले.

### मौखिक आरोग्यसेवा देणाऱ्या नायकांचा गौरव

**मुंबई :** हेलेऑनचा आघाडीचा मौखिक देखभाल ब्रॅण्ड असलेल्या सेन्सोडाईनने देशभरातील दंतचिकित्सकांचे व्यक्तिगत व्हिडीओ बनवण्यासाठी एआय सामर्थ्याचा उपयोग करून एक नावीन्यपूर्ण डिजिटल अभियान सुरू केले. या व्हिडीओजमध्ये लोकांचे मौखिक स्वास्थ्य सुधारण्यातील आणि त्यांचे दैनंदिन जीवन आनंददायी करण्यातील त्यांची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे. या अभियानात दंतचिकित्सकांचे चार हजार कस्टमाईझ्ड व्हिडीओ सामील आहे, ज्याचा उद्देश दंतचिकित्सकांना 'डॉक्टर्स ऑफ जॉय' म्हणून स्थापित करण्याचा आहे. हे व्हिडीओ विविध शहरांत शेअर करण्यात येतील आणि लोकांच्या जीवनातील दंतचिकित्सकांची भूमिका अधोरेखित करण्यासाठीचे एक दमदार माध्यम ठरेल. यूट्युबसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मवरून या सुजाण कृतीचा प्रचार करण्यात येईल. मेट्रो, टियर १ आणि टियर २ शहरांतील ३८ दशलक्षपेक्षा जास्त लोकांपर्यंत ते व्हिडीओ पोहोचतील, अशी माहिती हेलेऑन येथील कॅटेगरी लीड ओरल हेल्थकेअर किशले सेठ यांनी दिली.

# अमरावतीत पोलिस ठाण्यावर दगडफेक

### पोलिसांचा लाठीचार्ज, जमावबंदीचा आदेश

### २२ पोलिस जखमी, १० वाहनांचे नुकसान



पोलिस ठाण्याच्या आवारात दगडांचा असा सडा पडला होता.

**अमरावती, ५ ऑक्टोबर**

अमरावती शहरातील नागपुरी गेट पोलिस ठाण्यावर शुक्रवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या (एसडीपीआय) नेतृत्वात आलेल्या जमावाने दगडफेक केल्याने प्रचंड तणाव निर्माण झाला. दगडफेक करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज करीत अश्रुधुराचे नळकांडे फोडले. या संघर्षात २२ पोलिस जखमी झाले असून, १० वाहनांचे नुकसान झाले आहे. पोलिसांनी ११०० जणांवर गुन्हे दाखल करून दोघांना ताब्यात घेतले आहे.

उत्तरप्रदेशातील यती स्वामी नरसिंह महाराज यांनी केलेल्या वक्तव्याचा विरोध करीत जमाव शुक्रवारी दुपारी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेला होता. प्रकरण उत्तरप्रदेशातले आहे, असे कारण देत पोलिसांनी तक्रार घेतली नाही, असा आरोप जमावाने केला. रात्री १० वाजताच्या सुमारास मोठा जमाव पोलिस ठाण्यावर धडकला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तक्रार नोंदवण्यास तयारी दर्शविली. मात्र, जमावाने पोलिस ठाण्यावर दगडफेक केली. दंगा नियंत्रण पथक आणि अतिरिक्त पोलिस कुमक नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या परिसरात दाखल झाली. जमावावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये जमावातील काही जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी पोहोचले. त्यांनी तणाव निवळण्याचा प्रयत्न केला. दगडफेक करणारे आणि नागरिकांना भडकवणाऱ्या विशिष्ट व्यक्तींविरुद्ध कारवाईचे आदेश देत, नवरात्री उत्सव सुरू असताना कुठल्याही अफवांना बळी पडू नये, शांतता टिकवून ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत जमावबंदीचा आदेश देखील पोलिस आयुक्तांनी जारी केला आहे.

## दोन रेल्वे इंजिनमध्ये धडक, चार कर्मचारी जखमी




**मूल, ५ ऑक्टोबर**

रेल्वे रुळाची देखभाल करणाऱ्या दोन एमपीटी इंजिन एकमेकांवर आदळल्याने झालेल्या अपघातात चार कर्मचारी जखमी झालेत. ही घटना मूल रेल्वे स्थानक परिसरात शनिवार, ५ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास घडली.

चंद्रपूर येथील गोंदियाकडे जाणाऱ्या रेल्वे रुळावरील मूल रेल्वेस्थानकावर तांत्रिक काम करण्यासाठी एक एमपीटी इंजिन उभे होते. त्याचवेळी मूल रेल्वेस्थानकाकडे दुसरे एक एमपीटी इंजिन वेगाने आले. यात दोन्ही इंजिनची धडक झाली. त्यात चार कर्मचारी जखमी झालेत. जोराचा आवाज झाल्याने परिसरातील नागरिक गोंधळून बाहेर आले. सर्वत्र गर्दी झाली. या अपघातामुळे एका इंजिनचा दर्शनी भाग क्षतिग्रस्त झाला आहे. जखमी कर्मचाऱ्यांवर येथील उपजिल्हा रुग्णालय आणि चंद्रपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

## कंटेनरने स्कूटीवरील दोघांना चिरडले



**उमरखेड, ५ ऑक्टोबर**

मद्यधुंद अवस्थेत भरधाव कंटेनर चालविणाऱ्या चालकाने स्कूटीवरील दोघांना चिरडले. यात आजोबा रमणिक भीमजी पटेल व नातू केतव राजेश पटेल ठार झाले. हे दोघेही उमरखेडचे रहिवासी होते. ही घटना शनिवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास बोरी-तुळजापूर महामार्गावरील नांदगव्हाण घाटात घडली.

रमणिक पटेल हे महागाव येथे नातवाच्या कॉलेजच्या कामासाठी स्कूटीवरून नातवाला घेऊन जात होते. यावेळी नांदेडकडून यवतमाळकडे कंटेनर चालक महेंद्र नथू बागडे हा अमली पदार्थाच्या नशेत भरधाव वाहन चालवत असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी महागावचे ठाणेदार मिलिंद सरकाटे, सहायक निरीक्षक सरस्वती राठोड, शेख वसीम आणि पोलिसांचा ताफा सोबत घेऊन ट्रकचा पाठलाग सुरू केला. अवघ्या १० मिनिटांत अंबोडा गावाजवळ ट्रकचालकाच्या मुसक्या आवळल्या. *(तभा वृत्तसेवा)*

# कौंडण्यपूरची पुराणकालीन अंबिका देवी

### अनेक ग्रंथांमध्ये उल्लेख

**नितीन पवार**



**कुऱ्हा, ५ ऑक्टोबर**

वैभवशाली विदर्भाची तत्कालीन राजधानी म्हणून कौंडण्यपूर कीर्तिवंत आहे. येथील अंबिका देवीचा उल्लेख अनेक पुराणांमध्ये व ग्रंथांमध्ये आढळून येतो.

पुरातन काळात वशिष्ठ ऋषींच्या तपसामर्थ्याने येथील नदीला वशिष्ठा हे नाव मिळाले. त्याचा अपभ्रंश म्हणून आज वर्धा हे नाव प्रचलित आहे. अंबरिश ऋषींचे पुत्र कुंडन (कौंडिण्य) ऋषीने या वशिष्ठा नदीच्या तीरी याच भूमीत तप केले म्हणून या तपोभूमीला कुंडणपूर, पुढे कुंडिण्यपूर हे नाव प्राप्त झाले. तेच आजचे प्रचलित क्षेत्र कौंडण्यपूर होय.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांची आजी, राजा दशरथाची आई, अज राजाची पत्नी राणी इंदुमती कौंडण्यपूरची राजकन्या होती. अगस्ती ऋषींची पत्नी लोपामुद्रा कौंडण्यपूरची कन्या होती. भारतभूमीवर गंगा अवतरण करणाऱ्या भगीरथ राजाची माता केशिनीसुद्धा कौंडण्यपूरची कन्या आहे. नल राजाची पत्नी राणी दमयंती कौंडण्यपूरची कन्या आहे. नल दमयंती भव्य परिणय सोहळा याच आई अंबिकेच्या साक्षीने झाला होता. राजा भीमकाची कन्या रुक्मिणी हिचा विवाह भावाच्या निर्णयानुसार राजा शिशुपालासोबत ठरला; परंतु मनोमन पती म्हणून श्रीकृष्णाची निवड केल्यामुळे ती शिशुपालाला कशी वरणार? हा संदेश सुदेव ब्राह्मणाच्या हाताने रुक्मिणीने द्वारकेला पाठविला. लग्न सोहळ्यात येण्याकरिता तत्काळ विलंब न करता श्रीकृष्ण कौंडण्यपूरला आले. त्यावेळची राजघराण्याची अशी कुळाचार प्रथा होती की, आई अंबिकेच्या पूजनशिवाय मुलगी बोहल्यावर चढत नसे. रुक्मिणी आई अंबिकेच्या दर्शनाला मंदिरात सर्व सोहळ्यानिशी आली. प्रत्यक्ष अंबिकेच्या साक्षीने रुक्मिणीमातेचे हरण श्रीकृष्णाने याच मंदिरातून केले. म्हणूनही अंबिका मातेचे हे मंदिर पुढे चांगलेच प्रचलित झाले. साधारणतः एक हजार वर्षांपूर्वीची नोंद हैदराबाद गॅझेटमध्ये आढळते. सध्याच्या मुख्य मंदिराची रचना साधारणतः यवन काळातील आहे. मुख्य मूर्ती वालुकामय आहे.

ही शक्ती स्वरूपिनी नसून, ब्रह्मस्वरूपिनी आहे. भागवत पुराणांमध्ये सुद्धा याचा उल्लेख आहे. देवीच्या सेवेला संत ज्ञानेश्वर संजीवन समाधीपूर्वी निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई या तीनही भावंडांसह येथे वर्षभर होते, असे वर्णन नामदेव गाथेत आढळते.

## चामोलीत अडकले दोन परदेशी गिर्यारोहक

**गोपेश्वर, ५ ऑक्टोबर**

चामोली जिल्ह्यातील चौखंबा येथे अमेरिका आणि ब्रिटनमधील दोन गिर्यारोहक अडकले असून, शोधमोहीम सुरू आहे. बचाव कार्यात मदत करण्यासाठी एसडीआरएफच्या गिर्यारोहकांचे एक पथक ज्योतिर्मठ येथे पोहचले.

शुक्रवारी दोन महिलांचा शोध घेण्यासाठी भारतीय हवाई दलाचे दोन हेलिकॉप्टर दिवसभर चाललेल्या मोहिमेनंतर रिकाम्या हाताने परतले. अमेरिकेच्या मिशेले थेरेसा डवोराक आणि ब्रिटनच्या फव्ह जेन मॅनर्स गुरुवारपासून चौखंबा येथे ६,००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर अडकल्या आहेत.

डेहारडूनमधील राज्य आपत्कालीन ऑपरेशन केंद्रानुसार, ६,९९५ मीटरवर असलेल्या चौखंबा ३ च्या मार्गावर ६,०१५ मीटर उंचीवर असताना त्यांची लॉजिस्टिक आणि तांत्रिक उपकरणे घसरल्याने दोन परदेशी महिला अडकल्या. *(वृत्तसंस्था)*

# भारतीय महिला संघ पाकिस्तानविरुद्ध लढण्यास सज्ज

### आयसीसी महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक

**आजचे सामने**

**भारत वि. पाकिस्तान**
**स्थळ :** दुबई
वेळ : दुपारी ३.३० वाजतापासून

**स्कॉटलंड वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ :** दुबई
**वेळ :** सायंकाळी ७.३० वा.पासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्‌सवर

**दुबई, ५ ऑक्टोबर**

आयसीसी महिलांच्या टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत रविवारी दुपारच्या सत्रात अ गटात भारत आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. सायंकाळच्या सत्रात ब गटात स्कॉटलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे.





भारतीय महिला संघाला कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा सामना करावा लागेल व संघ संयोजनातील असंतुलन दूर करावा लागणार आहे, कारण शुक्रवारी भारतीय महिला संघाला न्यूझीलंडकडून ५८ धावांनी पराभव पत्करावा लागला. त्यामुळे भारताची स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची शक्यता कमी झाली नाही, परंतु त्यामुळे ते निश्चितच अडचणीत सापडले आहे. भारताची -२.९९ अशी धावगती सध्या वाईट आहे व त्यामुळे पाकिस्तान, श्रीलंका व ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उर्वरित तीन सामन्यांमध्ये मोठा विजय अनिवार्य आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध खेळाच्या तिन्ही विभागांमध्ये वाईट कामगिरी केली, मात्र संघाला आता २४ तासांच्या आता त्या उलट कामगिरी करण्याची गरज आहे. परंतु हे कठीण आहे, कारण गुरुवारच्या पहिल्या साखळी सामन्यात बलाढ्य श्रीलंकेला पराभूत केल्यानंतर पाकिस्तान संघाचा आत्मविश्वास उंचावलेला असेल.

मात्र भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध याच मार्गावर चालायचे आहे. त्याकरिता या सामन्यापूर्वी भारतीय संघ व्यवस्थापनाला आपल्या संयोजन क्रमवारीत बदल करावा लागेल.

अरुंधती रेड्डीमध्ये एका अतिरिक्त वेगवान गोलंदाजाचा समावेश हा उत्तम निर्णय आहे व याचा अर्थ संघात मोठ्या प्रमाणात बदल झाला. यामुळे हरमनप्रीतला तिसऱ्या क्रमांकावर, जेमिमाह रॉड्रिग्जला चौथ्या क्रमांकावर व ऋचा घोषला पाचव्या क्रमांकावर बढती देण्यास भाग पाडले. या फलंदाजांसाठी नेहमीचे स्थान नाही.

तीन वेगवान गोलंदाजांचा समावेश करणे चुकीचे नव्हते कारण तिथे दव नव्हते. न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजांनी टणक खेळपट्टीचा पुरेपूर वापर केला. पण भारताने आपल्या त्रिपक्षीय वेगवान आक्रमणाचा प्रयत्न केला. पूजा वस्त्राकरला केवळ एक षटक टाकण्याची संधी मिळाली. तिने १६ सामन्यांत २० बळी टिपून या वर्षातील टी-२० क्रिकेटमधील तिसरी सर्वोत्तम गोलंदाज ठरली आहे. तसेच, डावखुरा फिरकीपटू राधा यादव १३ सामन्यांत २२ बळींसह दुसरी सर्वात यशस्वी टी-२० गोलंदाज आहे. त्यामुळे भारतीय महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांना संयोजनाकडे दीर्घकाळ लक्ष द्यावे लागेल, कारण आणखी एका पराभवामुळे भारतीय संघाला अ गटातून अंतिम चारमध्ये स्था मिळवण्याच्या संधींना गंभीरपणे बाधा येईल.

भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध खेळताना मानसिकदृष्ट्या गोठलेला दिसत होता. हरमनप्रीतने डावात केवळ १५ धावा केल्या. संघ व्यवस्थापन फलंदाजीला बळ देण्यासाठी दयालन हेमलताचा संघात समावेश करण्याचा विचार करू शकतो. टी-२० क्रिकेटमध्ये आतापर्यंत भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले आहे. भारताने आतापर्यंत १५ पैकी १२ सामने जिंकले असले तरी, भारताकडे कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला पराभूत करण्याची क्षमता आहे.

मात्र भारताला पाकिस्तानच्या गोलंदाजांचा विशेषतः अनुभवी निदा दार, कर्णधार फातिमा सना व सादिया इक्बाल यांचा सामना करावा लागणार आहे.


तथापि, श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात दुखापतग्रस्त झालेल्या वेगवान गोलंदाज डायना बेग हिच्या तंदुरुस्तीवर पाकिस्तान संघ व्यवस्थापनाची बारीक नजर असेल. *(वृत्तसंस्था)*

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत :** हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, ऋचा घोष, यास्तिका भाटिया (तंदुरुस्तीच्या अधीन), पूजा वस्त्राकर, अरुंधती रेड्डी, रेणुका सिंग ठाकूर, दयालन हेमलता, आशा शोभना, यादव, यादव श्रेयंका पाटील (तंदुरुस्तीच्या अधीन), सजीवन, प्रवास राखीव : उमा चेत्री (यष्टिरक्षक), तनुजा कंवर, सायमा ठाकोर.

**पाकिस्तान :** फातिमा सना (कर्णधार), आलिया रियाझ, डायना बेग, गुल फिरोजा, इरम जावेद, मुनीबा अली, नशरा संधू, निदा दार, ओमामा सोहेल, सदफ शमास, सादिया इक्बाल (तंदुरुस्तीच्या अधीन), सिद्रा अमीन, सय्यदा आरूब शाह, तस्मिया रुबाब, तुबा हसन. प्रवास राखीव: नजीहा अल्वी.

# आई जगदंबेचे पूजन, नगारा वादन



नगारा वादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी


**मानोरा, ५ ऑक्टोबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील नवरात्रातील दौऱ्याची सुरुवात पोहरादेवीची आई जगदंबा यांना नमन करून केली. पंतप्रधानांनी देवीचे पूजन करून आरती केली. यानंतर संत सेवालाल महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. समाधीस्थळाच्या बाहेर महंत कबीरदास महाराज यांनी बंजारा दुपटा आणि हार घालून त्यांचे स्वागत केले.

यावेळी पंतप्रधानांनी नगारा वादन करून उपस्थितांची मने जिंकली. यानंतर संत रामराव बापू यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. याप्रसंगी बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबुसिंग महाराज व देवीभक्त शेखर महाराज उपस्थित होते. यावेळी शेखर महाराज यांनी नरेंद्र मोदी यांना बंजारा दुपटा, कवड्याची माळ, संत सेवालाल महाराजावर आधारित ग्रंथ व चांदीचा शिक्का मोदींना भेट स्वरूपात दिला.

**पंतप्रधानांचे मानले आभार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी भाषणात नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. मराठीला अभिजात भाषेचाला दर्जा मिळाल्यामुळे मराठी जागतिक भाषा होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.



# पंतप्रधानांच्या साक्षीने पोहरादेवीच्या विकासाचे स्वप्न साकार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मानोरा, ५ ऑक्टोबर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशी विश्वनाथ मंदिराचा कायापालट केला, त्याच पद्धतीने बंजारा समाजाच्या काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवीचा कायापालट होणार आहे. संत रामराव महाराज यांनी मला व पालकमंत्री संजय राठोड यांच्यावर पोहरादेवीच्या विकासाची जबाबदारी सोपविली होती. पंतप्रधान मोदी यांच्या साक्षीने पोहरादेवीचा कायापालट होत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले. ते नगारा वास्तुसंग्रालयाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन महाराष्ट्रातील जनतेला आपलेसे केले. संत सेवालाल महाराज व संत रामराव महाराज यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी असल्यामुळे रामराव बापू महाराजांचे अधुरे स्वप्न आज साकार होत आहे. यासाठी निधीची कमतरता भासू दिली नाही. पंतप्रधान मोदी यांनी देशात शेतकऱ्यांसाठी सन्मान योजना राबविली त्याच पृष्ठभूमीवर राज्यात 'नमो शेतकरी सन्मान योजना' राबवून शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे महायुतीचे सरकार आज उभे आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी मोफत वीज दिली असून, बारा तास अखंडित वीज पुरवठा येणाऱ्या काळात मिळणार आहे. डबल इंजीनचे सरकार असले तर भूमिपूजनही करते आणि लोकार्पणही. मी मुख्यमंत्री असताना या नगारा वास्तुसंग्रहालयाचे रामराव महराज यांच्या अध्यक्षतेखाली भूमिपूजन केले होते. बंजारा समाज मातीशी जोडलेला असून, या समाजाचे आमच्या महायुती शासनाशी घट्ट नाते आहे, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, देशाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आज अमेरिकेसारखा देशही भारताची संबंध दृढ करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. राज्यात लाडकी बहीण योजना सुरू करून स्त्रीशक्तीच्या विकासाला गती दिली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नरेंद्र मोदी यांनीच दिला आहे.

# देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रीम प्रोजेक्टमूळे महाराष्ट्राला मिळाली गती

**मुंबई दि. ५ ऑक्टोबर,**

गेल्या १५ वर्षात आणि मुख्यमंत्री म्हणून आपल्या कार्यकाळात, देवेंद्र फडणवीस यांनी एकसंध पायाभूत धोरणासाठी एक आराखडा तयार केला, ज्यात अनेक मेट्रो मार्ग जोडण्याचा, महामार्ग बांधण्याचा प्रयत्न केलाआज या सर्व ड्रीम प्रोजेक्ट ला गती मिळाली आहे. येत्या काळात महाराष्ट्र सुजलाम सुफलाम आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे परिपूर्ण बनविण्याचे महाराष्टाचे स्वप्न पूर्ण आहे.

फडणवीस यांच्या कार्यकाळात ७०१ किलोमीटर लांबीच्या मुंबई-नागपूर द्रुतगती मार्ग किंवा समृद्धी महामार्गासह राज्यातील काही महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना मंजुरी आणि प्रारंभ झाला, ज्याने आधीच प्रमुख औद्योगिक केंद्रांमधील प्रवासाचा कायापालट करण्यास सुरुवात केली आहे.

मेट्रो ३ चे आजचे उद्घाटन त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या प्रकल्पांच्या वाढत्या यादीत भर घालते, ज्यात मेट्रो मार्ग २ए, ७ आणि ४, तसेच जलमार्ग आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन प्रणालीचा समावेश आहे. मेट्रो ३ मुळे भारतातील सर्वात गर्दीच्या शहरी केंद्रांपैकी एक असलेल्या मुंबईतील कनेक्टिव्हिटीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.पंतप्रधान मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र दौऱ्यांमुळे पायाभूत सुविधांच्या विकासावर सरकारचा भर अधिक ठळकपणे दिसून आला आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प आणि गोरेगाव-मुलुंड लिंक रोडसह २९,४०० कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन केले. या प्रयत्नांचा उद्देश केवळ गर्दी कमी करणे हा नाही तर मुंबईचा भविष्यातील विकास शाश्वत आहे हे सुनिश्चित करणे हा आहे.

पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी एमएमआरडीए आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळासारख्या संस्थांशी जवळून काम करण्यासाठी फडणवीस यांनी एक समर्पित वॉर रूम उभारला. यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी सुव्यवस्थित होण्यास आणि नोकरशाहीतील विलंब टाळण्यास मदत झाली पंतप्रधान मोदी आज मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या प्रवासातील आणखी एका टप्प्याचे उद्घाटन करत असताना फडणवीसांनी घातलेला पाया महाराष्ट्राच्या शहरी आणि प्रादेशिक परिदृश्याला आकार देत आहे,

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# डान्स करण्यास रोखले; जिवंत न सोडण्याची धमकी

## अलकुंटे चौकातील प्रकार; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोंबर -**
आंध्र नवरात्र महोत्सव तरुण मंडळातील महिला सदस्य अलकुंटे चौकात डान्स करताना त्याठिकाणी चौघांनी येऊन महिलासोबत डान्स करण्यास सुरुवात केली. त्यांना मंडळातील काही सदस्यांनी विरोध केला असता यातील चौघांनी आम्हाला डान्स करण्यापासून कोण रोखणार आहे. त्यास आम्ही जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिल्याची घटना ३ ऑक्टोबर रोजी रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास घडली.

याप्रकरणी सिद्राम चंद्रप्पा म्हेत्रे (वय-४०,व्यवसाय व्यापार, रा.घर नंबर ३७ प्रकाश बापूजी हाऊसिंग सोसायटी अलकुंटे चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गणेश सिद्धाराम म्हेत्रे रा. सरस्वती चौक,मोची समाजाचे अध्यक्ष करेप्पा जंगम यांच्या घराशेजारी,बापू उर्फ उमेश आवट,ओंकार मच्चा,राजेश अन्नोज यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की,बुधवार (दि.३) ऑक्टोबर रोजी घटस्थापनेच्या दिवशी आंध्र नवरात्र महोत्सव तरुण मंडळातील महिला सदस्य हे देवी मिरवणुकीत डान्स करीत होत्या. त्याठिकाणी गणेश सिद्धाराम म्हेत्रे यांनी त्याच्या उजव्या हाताने तलवार उंचवून आम्हाला डान्स करण्यापासून कोण रोखणार त्यास आम्ही जिवंत सोडणार नाही असे म्हणून व इतरांनी काठ्या आणून माझ्यासह मंडळातील उपाध्यक्ष नरसिंग सिद्धाराम वल्लापोल्लू व इतर सदस्यांना शिविगाळ करून आमच्या अंगावर तलवारीने व काठ्यांनी मारण्यासाठी येऊन दहशत निर्माण केली आहे. त्या दहशतीमुळे आमच्या गल्लीतील महिला व मंडळाचे सदस्य तेथून पळून गेले असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास सदर बझार पोलीस करीत आहेत.

## हॉटेलसमोर पार्क केलेली दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोंबर-**
जोडबसवण्णा चौकातील गुडलक हॉटेलसमोर पार्क केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी विनायक हिरालाल आरकाल (वय ४२, रा. नागनाथ सोसायटी, यल्लालिंग मठाजवळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरकाल यांनी त्यांची दुचाकी क्रं. एमएच १३ सीए ५३६२ ही २९ सप्टेंबर रोजी दुपार हॉटेल गुडलक येथे बाहेर लावलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली. आहे. पुढील तपास पोलीस हवालदार नदाफ हे करीत आहेत.









सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# ...पळाली सुधा स्वर्गलोकाकडे!

**प्रासंगिक**

**प्रकाश एदलाबादकर**

*माझ्या मराठी मातीचा । लावा ललाटास टिळा*
*हिच्या संगाने जागल्या । दऱ्याखोऱ्यातील शिळा*
*हिच्या कुशीत जन्मले । काळे कणखर हात*
*जिच्या दुर्दम्य धीराने । केली मृत्यूवरी मात*
*रत्नजडित अभंग । ओवी अमृताची सखी*
*चारी वर्णातुनी फिरे । सरस्वतीची पालखी*
*माझ्या दरिद्री मातीचा । नका करू अवमान*
*हिच्या दारिद्र्यात आहे । भविष्याचे वरदान*
*नाही पसरला कर । कधी मागायास दान*
*स्वर्णसिंहासनापुढे । कधी लवती न मान*
*माझ्या मराठी मातीचा । लावा ललाटास टिळा*
*हिच्या संगाने जागतील । मायदेशातील शिळा*

एका तपाच्या अथक प्रयत्नांनंतर माझ्या, नव्हे आपल्या सर्वांच्या मायबोली मराठीला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त झाला आहे. हा अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि समाधानाचा क्षण आहे. या क्षणी आठवली ती कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रतिभेतून अवतरलेली वरील कविता. आज प्रत्येकच मराठी भाषकाच्या ललाटावर अभिमानाचा टिळा लागलेला आहे. मराठी मायबोलीला हा सन्मान प्राप्त व्हावा म्हणून कुणी आणि कसे प्रयत्न केले, त्यासाठी किती निवेदने दिली, किती पुरावे सादर केले, शासनाच्या दरबारी किती अर्ज-विनंत्या केल्या, मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी आणि सन्मानासाठी कार्य करणाऱ्या अनेक संस्थांनी आणि व्यक्तींनी आपली वाणी, करणी आणि लेखणी कशी झिजवली हा इतिहास आता अख्ख्या मराठी जगताला ठावूक आहे. प्रत्येकाच्या वाटा आणि मार्ग कदाचित वेगवेगळे असतील परंतु, ध्येय मात्र एकच होते आणि ते म्हणजे मराठीला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त करून देणे. या सर्व प्रयत्नांचा एकसमयावच्छेदेकरून परिणाम झाला आणि घटस्थापनेच्या मुहूर्तावर, शारदीय नवरात्रीच्या पहिल्या माळेला मराठी मायबोलीच्या गळ्यात अभिजाततेच्या सन्मानाची माळ पडली. घटस्थापना म्हणजे आद्य संत कवयित्री मुक्ताबाईचा जयंतीदिन! हा सुद्धा एक योगायोगच म्हणावा लागेल ! 'चिंता क्रोध मागे सारा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा' असे आर्जव करणाऱ्या मुक्ताबाईच्या हाकेला शेवटी केंद्र सरकारने प्रतिसाद दिला आणि ताटी उघडली. मराठीला सन्मानपूर्वक आत घेतले आणि तिचा सन्मान केला.

अभिजात भाषेचा सन्मान तर मिळाला पण आता मराठी भाषक म्हणून आपली जबाबदारी वाढलेली आहे. हे प्रत्येक मराठी भाषकाने लक्षात घ्यायला हवे. आपल्या भाषेविषयीची आत्मीयता, तिचा सन्मान, तिचा आदर आणि तिचा वापर आपल्या रोजच्या व्यवहारात झाला पाहिजे. आज सर्वत्र इंग्रजी भाषेचे स्तोम माजलेले दिसते. त्या भाषेला विरोध असण्याचे काही कारण नाही, परंतु त्यापायी आपल्या मातृभाषेकडे दुर्लक्ष करणे हा मात्र अक्षम्य अपराध मानायला हवा. एकीकडे अभिजाततेचा सन्मान आणि दुसरीकडे ही दुरवस्था हे चित्र पुसले गेले पाहिजे. आजची तरुण पिढी, विशेषतः शाळेपासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंतची पिढी मराठीपासून दूर गेल्यासारखी झालेली आहे. त्या पिढीला परत आपल्या मायबोलीकडे वाळविणे आवश्यक झालेले आहे. मराठी भाषेची थोरवी अनेक साहित्यिक, लेखक, समीक्षक, कवी यांनी वेळोवेळी सांगितलेली आहे. परंतु, ही थोरवी आणि हे महत्त्व आज केवळ लिखाणापुरते किंवा साहित्य संमेलनामधील चर्चा-परिसंवादापुरतेच शिल्लक आहे की काय, अशी साधार भीती वाटते.

एक बाब प्रकर्षाने लक्षात घेतली पाहिजे की, भाषा हे परस्पर संवादाचे प्रभावी माध्यम आहे. आपल्या मनात विचार येतात. ते एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला बोलून दाखविण्याची मनात इच्छा निर्माण होते. परंतु यासाठी माध्यम आवश्यक असते. हे माध्यम म्हणजेच भाषा. आपले बोलणे, विचार करणे, लिहिणे हे सर्व भाषेच्या माध्यमातूनच होत असते. इतकेच नव्हे तर एखाद्या विषयाच्या अभ्यासासाठी भाषेचाच आधार घ्यावा लागतो इतके महत्त्व आपल्या जीवनात भाषेला आहे. आणि या सर्व व्यवहारांसाठी आपली मराठी भाषा पूर्णतः संपन्न आहे. मराठी भाषेचा उगम कसा झाला हे सांगताना, श्रवण बेळगोळ येथील मूर्तीखालच्या शिलालेखाचे उदाहरण दिले जाते. गोमटेश्वराच्या मूर्तीखालच्या शिलालेखात श्री चावुण्डराये करवियले असा उल्लेख साधारण बाराव्या शतकाच्या सुरुवातीस आहे. मराठीच्या उद्गमासंबंधी आणि तिच्या प्रारंभीच्या अस्तित्वखुणांविषयी अशी अनेक उदाहरणे विद्वान अभ्यासकांनी नोंदविलेली आहेत.

मराठीला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त झाल्यानंतर तिच्या अभ्यास, संशोधन, विकासाची प्रक्रिया इत्यादींसाठी शासनाकडून काय मदत केली जाईल, त्यासाठी किती आणि कसा निधी मिळेल याचीही चर्चा झाली आहे. मुख्य मुद्दा आहे तो या निधीचा योग्य उपयोग होण्याचा. देशभरातील विद्यापीठांमध्ये मराठीच्या अध्ययन आणि अध्यापनाचा मार्ग आता मोकळा होईल असे सांगण्यात येते. परंतु दुसरीकडे खुद्द महाराष्ट्रातच मराठी भाषेचे हाल सुरू आहेत. मराठी माध्यमाच्या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहेत. याला पायबंद कसा घालणार? मराठी भाषा आणि संस्कृतीचे धडे योग्य रीतीने द्यायचे असतील तर आधी आपल्या समाजाचे मराठीपण टिकवणे महत्त्वाचे आहे. हे मराठीपण कशाने टिकून राहील आणि वृद्धिंगत होईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शासनाच्या शिक्षण विभागाने या प्रयत्नात आता गती आणणे गरजेचे आहे. परंतु या सर्व संबंधात केवळ शासनावर अवलंबून राहायचे, हे योग्य नाही.

महाराष्ट्रातील आणि बृहन्महाराष्ट्रातील नामवंत साहित्य संस्थांचे सुद्धा ते महत्त्वाचे काम आहे. किंबहुना मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार यासाठीच या संस्था निर्माण झाल्या आहेत. या साहित्य संस्थांच्या घटनेमधील मुख्य उद्दिष्टच मुळी मराठीचा प्रचार, प्रसार आणि विकास हा आहे. या पृष्ठभूमीवर सध्या साहित्य संस्था या विषयासंबंधाने काय करताहेत याचाही शोध घेणे आवश्यक आहे. केवळ प्रादेशिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आयोजित करून भाषिक विकास किती झाला याचाही गांभीर्याने विचार या संस्थांनी करणे गरजेचे आहे. संमेलनांचे उत्सवी स्वरूप कमी करून प्रत्येक संमेलनात भाषा विकासाच्या दृष्टीने पाऊले उचलली पाहिजेत. आता तर साहित्य संस्थांची या दृष्टीने जबाबदारी वाढलेली आहे. यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानीत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा सन्मान मिळाल्यानंतरचे हे पहिलेच संमेलन आणि तेही थेट देशाच्या राजधानीत, असा अपूर्व योग आहे. त्याचा किती आणि कसा उपयोग मराठीच्या भल्यासाठी करून घ्यायचा याची पूर्वयोजना तयार पाहिजे. आज मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. परंतु ती यापुढे ज्ञानभाषा म्हणून विकसित झाली पाहिजे. त्यासाठी या क्षेत्रातील संबंधितांनी आता नव्या उमेदीने कामाला लागले पाहिजे.

मराठीला अभिजात भाषेचा सन्मान मिळाला नव्हता तरीही मराठी भाषेचा विकास होतच होता. मराठी भाषेतील दर्जेदार साहित्याने जगाला भुरळ घातली आहे, हे आपण विसरता कामा नये. मराठी भाषा टिकविण्याचे आणि तिला वैभव प्राप्त करून देण्याचे श्रेय बऱ्याच अंशी साहित्यिकांना जाते हे कुणीच नाकारणार नाही. मराठी साहित्यातील वैविध्य हा खरे तर स्वतंत्र लेखाचाच विषय आहे. मराठीच्या विकासाच्या वाटा साहित्याच्या मांडवाखालूनच जातात. त्यातही मराठीमधील संतसाहित्य हे मराठीचे अलंकार आहेत. आपली मराठी सर्वांगाने परिपूर्ण आहे. संत ज्ञानेश्वरांनीच ठणकावून सांगितले आहे...

*माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंके । ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ (६-१४)*
*मूळ ग्रन्थिचिया संस्कृता । वरि मऱ्हाठी नीट पहातां । अभिप्राय मानिलिया चित्ता । कवण भूमी हें न चोजवे ॥ (६-४३)*
*मऱ्हाठियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥ (१२-१६)*

मराठी इतके सुंदर लिहीन की, मूळ कोणते आणि भाषांतर कोणते याची भ्रांती वाचकांना आणि श्रोत्यांना पडेल असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. तोच अमृताचा वारसा लाभलेली माझी मायबोली आज अभिजात भाषांच्या पंक्तीत बसली आणि खऱ्या अर्थाने वैभवाच्या शिरी बसली याचा अभिमान वाटतो. मराठी साहित्याच्या उन्नतीसाठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी आता उत्तम संधी उपलब्ध होतील. सामान्यजनांच्या समृद्धीसाठी आणि सुसंस्कारित मनांच्या जडणघडणीसाठी आणि पर्यायाने राष्ट्राच्या उभारणीसाठी भाषेचे महत्त्व या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. मराठी भाषेचा विचार करता अभिजाततेची ही राजमान्यतेची सुवर्णमुद्रा येणाऱ्या काळात मराठीचे भाग्य उजळेल यात शंका नाही. १९९५ साली परभणीला झालेल्या ६८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन समारंभ आज माझ्या डोळ्यासमोर उभा आहे. कविश्रेष्ठ नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनाच्या उद्घाटन समारंभात परभणीच्या कलावंतांनी डॉ. ना. गो. नांदापूरकर यांचे गीत सादर केले होते. ते शब्द आजही कानात रुंजी घालत आहेत.

*आम्ही मराठी हिचे पुत्र लोकी ।*
*कधी भ्यावयाचे मुळी ना कुणा ।*
*आकंठ प्यालो हिचे दुग्ध आम्ही ।*
*पहा रोमरोमांतुनी ह्या खुणा ॥*
*तोडा, चिरा दुग्धधाराच येती ।*
*न हे रक्त वाहे शरीरातुनी ।*
*माझी मराठी मराठाच मीही ।*
*असे शब्द येतील हो त्यातुनी ॥*
*मराठी असे आमुची मायभाषा ।*
*हिच्या कीर्तीचे तेज लोकी चढे ।*
*गोडी न राहे सुधेमाजी आता ।*
*पळाली सुधा स्वर्गलोकाकडे ॥*

अमृतापेक्षाही गोड असलेल्या मराठी मायबोलीचा सन्मान हा आपण सर्वांचा सन्मान आहे.

९८२२२२२११५




# आजि सोनियाचा दिनु...

**चर्चेत**

**प्रा. बाळासाहेब मुरादे**

महाराष्ट्राला संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही, हे मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात भाषेच्या दर्जामुळे सिद्ध झाले. केंद्र सरकारने मराठीबरोबरच पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्यामुळे आता अभिजात भाषांचा दर्जा मिळालेल्या भाषांची संख्या अकरा झाली आहे. अभिजात दर्जा मिळाल्याने भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहर उमटली आहे.

कवी कुसुमाग्रजांनीच एकदा, मराठी भाषा मंत्रालयाच्या दारात फाटकी वस्त्रं नेसून उभी असल्याचं म्हटलं होतं. त्या मराठीला आता चांगले दिवस यायला हरकत नाही. अर्थात एखादा निर्णय झाला, म्हणजे लगेच भाषेचं वैभव वाढतं असं नाही. मुळातच मराठी ही अतिशय जुनी आणि अभिजात भाषा आहे. तिच्यावर आता राजमान्यतेची मोहर उमटली इतकंच. यापुढे मराठी भाषा वैभवसंपन्न बनून मंत्रालयाच्या दारात पैठणी नेसून उभी असलेली दिसावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असली, तरी हे स्वप्न साकार होण्यासाठी सरकारबरोबरच १३ कोटी मराठीजनांपैकी प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. वेगवेगळ्या भाषा अवश्य शिकल्या पाहिजेत; परंतु अमृताहून अधिक गोड असलेली ही भाषा बोलण्यात आपल्याला कमीपणा वाटता कामा नये. भलेही प्रमाणित भाषा बोलता येत नसेल; परंतु बोली भाषेत तरी बोलण्याची सवय ठेवली पाहिजे. दाक्षिणात्यांसारखा कडवा भाषाभिमान नसावा; परंतु याचा अर्थ आपली भाषाच आपण सोडून द्यावी, असेही नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात, त्यात थोडा बदल करून भाषा घासावी, भाषा तासावी; परंतु भाषा बोलावी. भाषेला सौंदर्य असतं. भाषेला माधुर्य असतं. भाषेत गोडवा असतो. तिचं हे माधुर्य, गोडवा, सौंदर्य जपलं पाहिजे. वाढवलं पाहिजे.

महाराष्ट्राला संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही, हे अभिजात भाषेच्या दर्जाबाबतही झालं. अर्थात सहजासहजी मिळणाऱ्या गोष्टींचं महत्त्वही नसतं. लढून मिळवलेली गोष्ट महत्त्वाची असते. अभिजात दर्जा मिळाल्याने भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहर उमटली आहे. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे २५०-३०० कोटी रुपये विविध माध्यमांतून अनुदान स्वरूपात मिळतात. भाषा भवन, ग्रंथ आणि साहित्यप्रसार, ग्रंथालये, देशभरातील विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषा प्रसार, अध्यासने, त्या भाषेतील विद्वानांसाठी पुरस्कार आदींसाठी आर्थिक पाठबळ मिळते. मराठी भाषा हा देशाचा अभिमान आहे. या उत्तुंग भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने देशाच्या इतिहासात मराठी भाषेचा समृद्ध सांस्कृतिक वारशाचे योगदान अधोरेखित झाले आहे. भारताच्या परंपरेत मराठी कायमच अत्यंत महत्त्वाची आहे. आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे अनेक अमराठी लोकांना मराठी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळेल.

अभिजात भाषा भारताच्या पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करतात. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर त्याचं श्रेय घेण्याची स्पर्धा नेहमीसारखी सुरू झाली आहे. निवडणुकीचं टायमिंग साधून निर्णय झाल्याचं श्रेय घेऊन त्याचं मतात रूपांतर करण्याचा प्रयत्न होईलही; परंतु मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी दोन दशकं वाट पाहावी लागली. २००४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा द्यायला सुरुवात झाली. त्यानंतर आठ वर्षांनी देशातील जुन्या, सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा असलेल्या मराठीच्या अभिजात दर्जासाठी प्रयत्न सुरू झाले. कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्याचा अधिकार हा केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाला आहे. भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अतीव प्राचीन स्वरूपाचा म्हणजे दीड-दोन हजार वर्षे जुना हवा, प्राचीन साहित्य हवं, जे त्या भाषकांना मौल्यवान वारसा वाटतं, दुसऱ्या भाषासमूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, अभिजात भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे निकष त्यासाठी लावण्यात आले होते. तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगु, मल्याळम आणि ओडिया या भाषांना अभिजात भाषांचा दर्जा देण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये एकाही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला नाही.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा संघर्ष हा आजचा नाही. मराठीच्या अभिजात दर्जाबद्दल संशोधन करून तसा अहवाल केंद्र सरकारला देण्यासाठी २०१२ मध्ये प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. २०१३ मध्ये या समितीने आपला अहवाल प्रकाशित केला. महारट्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्री भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षे जुनं असल्याचे पुरावे असल्याचं या अहवालात म्हटलं होतं. १३ कोटी लोकांची मराठी जगातली दहाव्या ते पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे. तिच्या ऐतिहासिक प्रवासाचे संदर्भ देत आणि विविध शतकांमध्ये विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाचा विचार करून तिचं अभिजातपण स्वयंसिद्ध आहे, असंही या अहवालात म्हटलं होतं. 'गाथा सप्तशती' हा सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा ग्रंथ असून, पुढील काळात लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा यासह अनेक समृद्ध ग्रंथांची परंपरा मराठी भाषेत निर्माण झाली. पतंजली, कौटिल्य, टॉलमी, वराहमिहिर, चिनी प्रवासी यूएन त्संग यांच्या लिखाणातील दाखले, ज्येष्ठ संशोधक श्री. व्यं. केतकर यांच्यासह अन्य संशोधकांचे अहवाल, जुन्नरजवळील नाणेघाटात आढळलेला ब्राह्मी लिपीतील सुमारे २२२० वर्षांपूर्वीचा शिलालेख यासह अनेक पुरावे सादर करण्यात आले. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देताना मराठीतल्या विवेकसिंधू, लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी या ग्रंथांचा आधार घेतला आहे. विवेकसिंधू हा ग्रंथ शके १११० मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी रचला होता. हा मराठी भाषेतला पहिला ग्रंथ आहे. आद्यकवी मुकुंदराज हे मूळचे बीडचे. बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथे मुकुंदराजांनी विवेकसिंधू या ग्रंथाची रचना केली. ज्ञानेश्वर माउलींच्या जन्माच्या आधी मुकुंदराजांनी समाधी घेऊन ७५ वर्षे झाली होती. त्यांनी त्यांच्या विवेकसिंधू या ग्रंथामध्ये शंकराचार्यांच्या वेदांतावर निरूपणात्मक विवेचन केलं. या ग्रंथामध्ये एकूण १८ ओवीबद्ध प्रकरणं आहेत.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा, यासाठी एक तप पाठपुरावा, आंदोलन केल्यानंतर आता दर्जा मिळाला. अभिजात भाषांचा दर्जा मिळाल्यानंतर संस्कृत, तामिळ, कन्नड, तेलुगु या भाषांसाठी काही संस्था उभारल्या गेल्या आहेत तसंच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली गेली. यात प्रत्येक भाषेसाठी दरवर्षी काही कोटी रुपये दिले होते. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ आणि साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी आर्थिक पाठबळ दिलं जातं. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास त्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिज'ची स्थापना केली जाते. प्रत्येक विद्यापीठात त्या त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र उभारलं जातं. हे आता मराठीच्या वाट्यालाही येणार आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे नोकरीच्या संधी वाढतील. विशेषतः सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होतील. त्याचबरोबर संवर्धन, माहिती गोळा करणं, या भाषांमधील पुरातन साहित्याचं डिजिटायझेशन यामुळे भाषांतर, नोंद, विविध साहित्याचं प्रकाशन तसंच डिजिटल माध्यमात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. आता आपली मराठी बोलण्याची, वाचण्याची, पाहण्याची, जपण्याची आपली जबाबदारी वाढली आहे. मी मराठीसाठी काय करतो किंवा करते याचा विचार प्रत्येक व्यक्तीने करायला हवा. मराठी बोलीभाषा ही ज्ञानभाषा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. राज्य शासनाच्या भाषा धोरणांमध्ये त्या स्वरूपाची शिफारस करण्यात आली आहे. विज्ञान-तंत्रज्ञान मराठीमध्ये आले आणि मराठी ही रोजगाराची भाषा होऊ शकली, तर तरुणाई आपोआप मराठीकडे वळेल. आपण आतापर्यंत मराठीची अक्षम्य हेळसांड केली आहे. ती दूर करून सुंदर आणि समृद्ध भाषेचा वापर करताना भाषेच्या अभिवृद्धीचा गोवर्धन उचलून धरणे ही सर्वांची जबाबदारी आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष राहिलेल्या प्रा. पठारे यांची प्रतिक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. या निर्णयामुळे मराठी भाषकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली, तरी पुष्कळ गोष्टी साध्य होऊ शकतील, असं ते म्हणतात. एक तपानंतर निर्णय झाला, आता या निर्णयामुळे मराठी पैठणी नेसून कशी मिरवेल, हे पाहणे ही आपली जबाबदारी आहे.



# फडणवीसांमुळे वारकऱ्यांच्या आध्यात्मिक प्रवासाचे स्वप्न वास्तवात

***पालखी महामार्ग हा महाराष्ट्रातील एक पवित्र पालखी मार्ग आहे, जो भगवान विठ्ठल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठोबाच्या भक्तांसाठी श्रद्धेचा मार्ग म्हणून खोलवर रुजलेला आहे. दरवर्षी वारकरी म्हणून ओळखले जाणारे लाखो भाविक या भव्य तीर्थयात्रेत सहभागी होण्यासाठी आणि आषाढी एकादशी साजरी करण्यासाठी २१ दिवसांमध्ये सुमारे २५० कि. मी. अंतर कापून भगवान विठ्ठल यांचे पूज्य निवासस्थान असलेल्या पंढरपूर वारीकडे लांबचा प्रवास करतात. ही यात्रा जगातील सर्वात जुन्या सामूहिक यात्रांपैकी एक आहे आणि त्याकडे लोकचळवळ म्हणून पाहिले जाते.***

फडणवीस मुख्यमंत्री असताना तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा विकास योजनेचा एक भाग म्हणून पालखी महामार्गाची कल्पना करण्यात आली होती. या योजनेत भाविकांना विना अडथळा आणि सुरक्षित मार्ग सुनिश्चित करण्यासाठी, पुणे आणि पंढरपूर दरम्यानच्या प्रवासाचा वेळ दोन तासांनी कमी करण्यासाठी, गर्दी कमी करण्यासाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी प्रमुख राष्ट्रीय महामार्गांचा समावेश होता. कृषी उत्पादने आणि स्थानिक उत्पादनांना मोठ्या बाजारपेठेत प्रोत्साहन देताना ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला चालना देण्याची कल्पनाही या योजनेत होती. या विकास योजनांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, कचरा विल्हेवाट प्रणाली, शौचालये आणि पावसाचे पाणी साठवणे यांचा आवश्यक घटक म्हणून समावेश करण्याचे आश्वासनही फडणवीस यांनी दिले आहे. त्यांनी हे सुनिश्चित केले की योजना केवळ बांधकाम-केंद्रित नसतील तर त्यात शाश्वततेचा दृष्टीकोन देखील असेल. मराठी संस्कृतीचे जतन करतानाच धार्मिक भावना आणि लोकांचे कल्याण यांना केंद्रस्थानी ठेवून हा फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक होता.

पालखी महामार्गाच्या निर्मितीपूर्वी, आशादी एकादशीसारख्या शुभ प्रसंगी वारकरींचा प्रवास अनेकदा दुर्दैवी अपघात, मृत्यू आणि असुरक्षित आणि गर्दीच्या मार्गांवरील जखमांद्वारे चिन्हांकित केला जात असे. मिरवणुकीदरम्यान त्यांच्या डिंडीला (गटाला) ट्रक आणि भरधाव वेगातील गाड्यांनी धडक दिल्याने वारकरींच्या अकाली मृत्यू झाल्याच्या अनेक बातम्या आल्या आहेत. यात्रेदरम्यान वारकरी लोकांची सुरक्षा, कनेक्टिव्हिटीचे प्रश्न आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा हे अनेक वर्षांपासून तीर्थयात्रेच्या पर्यटनातील अधिकाऱ्यांसाठी एक मोठे आव्हान राहिले आहे.

मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे मोजकेच लोक दीर्घकालीन, शाश्वत तोडगा काढण्याच्या दिशेने सक्रियपणे काम करत होते. परिणामी, या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महामार्ग प्रकल्पांची कल्पना केली गेली आणि नंतर केंद्र सरकारने त्यांना मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंदाजे १२,२९४ कोटी रुपये खर्चाच्या १३ प्रकल्पांची पायाभरणी केली. यामध्ये २२१ किलोमीटर लांबीचा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग (एन. एच. ९६५) आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्ग (एन. एच. ९६५ जी) यांचा समावेश आहे, ज्याचा अंदाजे खर्च अनुक्रमे ६,६९० कोटी रुपये आणि ४,४०० कोटी रुपये आहे, ज्यात दोन्ही बाजूंना 'पालखी' साठी समर्पित पदपथ आहेत. या प्रकल्पात मल्हारपूरमधील दळणवळणाला चालना देण्यासाठी अंदाजे १,१८० कोटी रुपये खर्चाच्या २२३ किलोमीटरहून अधिक पूर्ण झालेल्या रस्ते प्रकल्पांचाही समावेश होता. पुण्याहून प्रवास करणाऱ्या भाविकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला.

फडणवीस यांच्या धोरणांनी महाराष्ट्रातील मंदिरांची शहरे आणि आसपासच्या प्रदेशांच्या विकासासाठी सातत्याने भक्कम वचनबद्धता दर्शविली आहे, सार्वजनिक समस्यांचे निराकरण करताना पायाभूत सुविधांच्या प्रगतीला सांस्कृतिक संवर्धनाशी जोडले आहे. स्वतः भगवान विठ्ठल यांचे प्रखर भक्त असल्याने, फडणवीसांनी या प्रकल्पाकडे सहभक्तांची सेवा म्हणून पाहिले. मंदिराला भेट देण्याची आणि शतकानुशतके जुन्या सांस्कृतिक प्रथेची कदर करण्याची कोणतीही संधी फडणवीस कधीही सोडत नाहीत. नोव्हेंबर २०२३ मध्ये, कार्तिक एकादशीच्या निमित्ताने, ते मंदिरातील महापूजेला उपस्थित राहिले, मंदिराच्या जीर्णोद्धार कार्याचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना त्यांच्या पाठिंब्याचे आश्वासन दिले. अलीकडेच, जुलैमध्ये, त्यांनी पुन्हा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकाला भेट दिली आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखीमध्ये भाग घेतला, जे वारकरी संस्कृतीबद्दलचा त्यांचा आदर दर्शवते. भगवान विठ्ठलासमोर झुकून, फडणवीस हे सुनिश्चित करतात की ते त्यांच्या मुळांशी खोलवर जोडलेले राहतील आणि आध्यात्मिक आदर आणि प्रादेशिक प्रगती यांच्यातील संतुलनावर भर देत प्रदेशाच्या विकासाच्या गरजांसाठी वचनबद्ध राहतील. यावर्षी जुलैमध्ये आशादी एकादशीच्या पूर्वसंध्येला त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ते पंढरपूरपर्यंतच्या 'नमो एक्स्प्रेस या विशेष द्रुतगती रेल्वेचे उद्घाटन केले तेव्हा हे समर्पण स्पष्ट झाले. भक्तांसाठी वाहतूक आणि सुलभता सुधारण्याच्या फडणवीस यांच्या दृष्टीकोनाशी हा उपक्रम जुळला. हे प्रवासाची व्यवस्था सुव्यवस्थित करते आणि तीर्थयात्रेचा एकूण अनुभव वाढवते, ज्यामुळे दरवर्षी प्रवासाला सुरुवात करणाऱ्या हजारो भाविकांना फायदा होतो.

पंढरपूर वारी ही भक्तांसाठी दीर्घकाळापासून एक आध्यात्मिक यात्रा राहिली आहे, ज्यामुळे एक सखोल भावनिक संबंध निर्माण झाला आहे. मात्र, भाविकांनी सहन केलेल्या अडचणींकडे आधीच्या सरकारांनी बऱ्याच काळापासून दुर्लक्ष केले होते. या पवित्र मार्गाच्या निर्मितीद्वारे भक्तांचा विश्वास प्रकट करत फडणवीस यांनी आपली दृष्टी प्रत्यक्षात आणली आहे. त्यांच्या या उपक्रमाने या खडतर प्रवासाचे लाखो वारकरी लोकांसाठी एक आरामदायक अनुभवात रूपांतर झाले आहे. फडणवीसांच्या भविष्यातील दूरदृष्टीचे हे प्रमुख उदाहरण आहे.

**लेखक : सुधांशू जोशी**

**रविवारची पत्रे**

## या देवी सर्व भूतेषु मातृ-रूपेण संस्थिता...

जगदंबेचा उत्सव वेगळ्या दृष्टीने बघणे गरजेचे वाटते. शैलपुत्रीपासून सिद्धिदात्रीपर्यंतची देवीची रूपे जीवनाला संपूर्ण वळण देणारी ठरतात. केवळ राक्षस आणि देवी यांचे तुंबळ युद्ध किंबहुना अन्य देवांनी देवीच्या विजयासाठी केलेली कठीण उपासना एवढाच भाग सप्तशतीच्या अध्यायांमध्ये मर्यादित नसून ७०० श्लोक सात जन्मांचे जीवन शुद्ध करतात. त्यासाठीची कर्मठ अशी उपासना अभिप्रेत आहे. कुळाचार, परंपरा आपल्या डोक्यावर वाडवडिलांनी ओझे ठेवले आहे, या भावनेने हे नवरात्र न करता श्रद्धेने मातेची सेवा करून जीवन उज्ज्वल करावे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे की, ज्यावेळी धर्माचा ऱ्हास होतो आणि सज्जनांवर दुर्धर प्रसंग ओढवतो, त्यावेळी मी अवतार घेतो आणि धर्माची पुन्हा स्थापना करतो. तशीच काहीशी वेळ सध्या जगात निर्माण झालेली आहे. हिंदू धर्माबद्दल हिंदू धर्माचीच मंडळी अन्य धर्माचा बुरखा घालून स्वधर्माचा नाश करू इच्छितात. त्यांच्या उच्चाटनासाठी या नवरात्रात सर्वांनी मनापासून जगदंबेची आराधना करून हिंदुधर्मरक्षणार्थ विडा उचलावा. श्रद्धा नष्ट होऊ नये, परंपरा मोडू नये आणि अवास्तव वेळ लागू नये या सर्वांचाच विचार या धकाधकीच्या जीवनात होणे गरजेचे आहे. या पूजनात महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती ही जगदंबेची प्रासंगिक रूपे आहेत. अर्थात विशिष्ट गुणदर्शक असे मातेचे अंशावतार आहेत. बंगालमध्ये हा उत्सव राष्ट्रीय स्वरूपाचा मानला जातो. तमोगुण, रजोगुण आणि सात्त्विक गुणांचा मिलाफ या सेवेतून प्राप्त होताना दिसतो. या उत्सवात मूळ हेतू न विसरता उपासना घडावी. पूर्वी देव-दानव यांच्या युद्धप्रसंगी या त्रिगुणात्मक शक्ती देवींनी देवांचे म्हणजे सत्त्वगुणी व्यक्तींचे राज्य दानवांचा वध करून पृथ्वीवर आणि स्वर्गात घडवून आणले होते. तेव्हा त्यांचे निरंतर स्मरण राहावे आणि त्यांच्या उपासनेने इहलोकी अभ्युदय आणि परलोकी मोक्ष यांचा मार्ग स्पष्ट दिसावा, असा या उत्सवाचा मूळ हेतू आहे. महिषासुर, मधुकैटभ, शुंभ-निशुंभ अशा वृत्तीचे राक्षस या कलियुगात वावरत आहेत. त्यांच्या संहारासाठी जगदंबेची सेवा अगत्याची आहे. क्रूर व विवेकहीन दानव सर्व नीतिनियम बाजूला ठेवून जेव्हा अनन्वित कृत्ये करतात अशावेळी भगवंताला स्वतःचा व स्वतःच्या संस्कृतीच्या बचावासाठी जशास तसे वागून त्यांचा वध घडवून आणणे भाग पडते. शेवटी 'बुद्धिर्यस्य बलं तस्य' हेच तत्त्व सिद्ध होते. कधी कधी क्रूरकर्म्याचा विजय होतोसुद्धा; परंतु सत्त्वगुण तमोगुणावर मात करून विजय प्राप्त करतोच. सध्याच्या काळात काही वेगळे घडते असे दिसत नाही. त्यासाठीच देवीची प्रत्येकाने प्रार्थना करावी, 'हे जगदंबे तू या पृथ्वीवर पुनः अवतार घेऊन ये आणि मानवताच नष्ट करू पाहणाऱ्या दानवांचा संहार कर.' देवीचे वचनही तसेच आहे;

*ॐ इत्थं यदा यदा बाधा दानवोत्था भविष्यति ।*
*तदा तदावतीर्याहं करिष्याम्यरिसंक्षयम् ॥*

**अमोल करकरे**/९१६७९२७६१७

## आता काय करावं या शिक्षणाचं?

आजघडीला देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. कित्येक वर्षांपासून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत. वयाची ३० ते ३५ वर्षे उलटूनही हातात नोकरी नाही; ज्यामुळे अनेक तरुण निराश झाले आहेत. नोकरीसाठी संघर्ष करीत आहेत. निवडणुका तोंडावर असताना थोड्याफार प्रमाणात सरकार नोकरीची जाहिरात काढली जाते. पेपरफुटी किंवा दुसरा काही घोटाळा झाला की, परीक्षा पुन्हा घेतली जाते. भरती थांबवली जाते. या सर्वांमध्ये तरुण भरडला जातो. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांचे नुकसान होते. आज उच्चशिक्षण घेऊन ना नोकरी मिळत आहे, ना धड रोजगार मिळतो. अनेक तरुण-तरुणी उच्चशिक्षित असूनही रोजगाराअभावी त्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे. शिक्षणाने माणूस सुशिक्षित होतो. सुशिक्षित असल्याने तर पोट भरत नाही. हातात रोजगार नसल्याने आर्थिक परिस्थितीने कमजोर होत आहे. तरुणांनी करावे तरी काय? एखादी भरती घेतली तरी त्यामध्ये जॉईन करायला दोन ते तीन वर्षे लावतात. नोकरी लागूनही जॉईन होईपर्यंत तरुण आपले घर सांभाळण्यासाठी शेतीची कामे करताना दिसतात वा कोणताही रोजगार करून पोट भरताना दिसतो. आता बघा, शिक्षक भरती १० ते १२ वर्षांपासून घेतली नव्हती. आता ३० हजार शिक्षक भरती घेऊ, असे सांगितले. आतापर्यंत १० ते १२ हजारच शिक्षक घेतले. बाकीची भरती तशीच रखडून ठेवली. यामध्येही शिक्षणसेवक पद आहे. १०-१२ वर्षांपासून अनेक विद्यार्थी भरतीची वाट बघत होते. त्यामध्येही तीन वर्षांसाठी शिक्षणसेवक पद ठेवले आणि सोळा हजार मानधन. बाहेरगावी राहून आपला आणि आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह कसा करायचा, हा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षक देशाचा आधारस्तंभ असतो. मग आज शिक्षकांनाच सेवक बनवून ठेवले आहे, हे कितपत योग्य आहे. एवढ्या वर्षातून नोकरी लागली म्हणून आनंदही होत आहे. परंतु, एवढ्या कमी पगारात संसार चालवायचा कसा, असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. आपल्या भारतीय संविधानामध्ये दर्जाची आणि संधीची समानता दिली आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या दर्जानुसार रोजगार दिले पाहिजे, असे सांगितले आहे. समान काम, समान वेतन असले पाहिजे. मग आज आपल्या देशात संविधानातील मूल्ये खरोखरच लागू करतात का? भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे, असे म्हणतात. आज लोकांचे प्रश्न खरोखरच सोडविले जात आहेत का? आज आपण बघतो की, लोकशाहीची पायमल्ली होताना दिसते आहे. आपले प्रश्न मांडण्यासाठी, आपले अधिकार आणि हक्क मिळविण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी समोर येण्याची गरज आहे. देशातील अनेक संघटना, पक्ष आणि लोकांनी मिळून लढले तरच आपल्याला न्याय मिळू शकेल. परंतु, शेवटपर्यंत एक प्रश्न निर्माण होतो की, आता या शिक्षणाचं काय करायचं?

**प्रीती खोब्रागडे**/७९७२२०३२९७

## पवार टोळीची वायफळ बडबड

भाजपाच्या नितीन गडकरींनी लाडकी बहीण योजनेवर बौद्धिक दिल्यानंतर राज्यातील सर्वपक्षीय पवार टोळीचा लाडकी बहीण योजनेवर आक्षेप(!) घेण्याचा जोर वाढलेला दिसतो. मी आर्थिकदृष्टीने शेतीप्रश्नी व्यक्त होणारा कार्यकर्ता असून समाजवादी डाव्या पठडीच्या हे द्या, ते द्या असल्या मागण्या आमच्यासारखे शरद जोशी विद्यापीठात शिकलेले कार्यकर्ते कधीच करीत नसतो. तरीसुद्धा या लाडकी बहीण योजनेवर हा प्रपंच करतो आहे. २०१४ साली सत्तेत आलेल्या देवेंद्र सरकारने आल्या आल्या आमचे सरकार गुंतवणूकधार्जिण्या गुंतवणूक धोरणांनीच शेतकरी, कामगार, महिला, तरुण व इतर घटकांचा विकास यावर भर देईल. कर्जमाफी, अनुदान अशा भिकेसारख्या स्वस्त लोकप्रियता मिळवून देणाऱ्या घोषणांना थारा असणार नाही, असे निक्षुन सांगितले होते. याउलट सरकारी तिजोरीवर आपली मतपेढी भरण्याचे राजकारण करण्याची सवय पडलेले पवार टोळीसारखे बडे बडे पुढारी नाक मुरडायला लागले. बाहेरून पवार टोळी व आतून सत्तेत सहभागी असलेले हे असे, यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी; तीही सर्व ७/१२ धारक शेतकऱ्यांना (पगारदार, इन्कम टॅक्स भरणारे व्यावसायिक व राजकारणाच्या धंद्यातून गब्बर झालेल्या राजकीय धेंडासहित) सरसकट देऊन सरकारची तिजोरी रिकामी करा, मूलभूत विकासाचे पुढे पाहू, अशी मागणी करू लागले. या दबावातही विचलित न होता देवेंद्र यांनी तिजोरीचे भान ठेवत मधला मार्ग काढला- तो म्हणजे ७/१२ धारक, पगारदार, व्यावसायिक व राजकीय पुढारी यांना वगळत, निखळ शेतीवर पोट व चरितार्थ असलेल्या शेतकऱ्यांना दीड लाखाची सरसकट कर्जमाफी देण्याचा निर्णय जाहीर केला. यासाठी आधीच्या सरकारांनी खिळखिळी करून ठेवलेल्या अर्थव्यवस्थेतून सुमारे ४० हजार कोटी रुपयांचे नियोजन केले. ही कर्जमाफी काँग्रेस काळातील कर्जमाफीच्या १० पट अधिक होती. तरी या टोळीचे नाक मुरडणे चालू होते. गत १० वर्षांत देशाची व राज्याची खिळखिळी झालेली अर्थव्यवस्था प्रभावी अंमलबजावणीमुळे रेकार्ड ब्रेक मजबूत झाली; सोबतच गत ७०-७५ वर्षांच्या समाजवादी धोरणांमुळे गरीब झालेल्यांसाठी (२०१४ साली १४० लोकसंख्येत ८० कोटी गरीब) कल्याणकारी योजना राबवायला दोन्ही सरकारांना काहीही अडचण राहिली नाही. म्हणूनच देश व राज्य पातळीवरील किसान सन्मान व लाडकी बहीण योजनेंसह इतर सर्व कल्याणकारी योजना निरंतर सुरूच राहतील. 'खटाखट ८५०० रुपये महिनाअखेर बँक खात्यात' अशा शासकीय तिजोरीचे व अर्थव्यवस्थेचे भान न ठेवता, राहुल गांधी टाईप अजागळ योजनेसारखे त्या योजनांचे स्वरूप नसेल, याचे भान या लाडकी बहीण योजनेवर शंका उपस्थित करणाऱ्या पवार टोळीने ठेवावे; उगीच वायफळ बडबड थांबवावी, एवढेच!

**अरविंद नळकांडे**/९८९०९७०६२८

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सिनेअभिनेत्री अन्नपूर्णा विठ्ठल यांनी घेतले मश्रूम गणपतीचे दर्शन

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

सिने अभिनेत्री अन्नपूर्णा विठ्ठल हे तुळजापूरला दर्शनासाठी जात असता तळे हिप्परगा येथील श्री मशरूम गणपती येथे दर्शनासाठी आले असता त्यांच्या हस्ते श्रींची आरती व पूजा करण्यात आली. यावेळी मंदिराचे पुजारी संजय पतंगे यांच्या हस्ते त्यांचा श्रीची प्रतिमा शाल व प्रसाद देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी आपल्या दिवसाची सुरुवात श्री गणेशाचे दर्शन घेऊनच आपण आपल्या कामाची सुरुवात करते. मी आतापर्यंत मराठी चित्रपट देखणी माझी बायको, बांगड्या भरा, सवयी हवलदार, सिरीयल सावधान इंडिया, सहकुटुंब सहपरिवार तसेच १६० जाहिरात व तेलगू चित्रपटात काम केले आहे. यावेळी त्यांनी हॉटेल नसले बंधू येथे चहाचा आस्वाद घेतला व त्यांना सोलापूरची सुप्रसिद्ध शेंगाची चटणी हॉटेल नसले बंधूचे मालक सुनील देशमुख यांना सदिच्छा भेट म्हणून दिली. यावेळी श्रमंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी, तुकेश भैरी, स्मिता भैरी ,सौ अनुसया जिंदम, डॉक्टर राजेंद्र गुल्लापल्ली अण्णा भोसले, दीपक देशमुख व भक्त मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



### भारत को जानो प्रश्नमंजुषा स्पर्धेत चव्हाण, राऊत, इंगळे प्रथम

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

भारत विकास परिषद शाखा आयोजित 'भारत को जानो' प्रश्नमंजुषा स्पर्धा सेवासदन प्रशाला येथे झाली. यामध्ये श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेतील हर्षवर्धन चव्हाण व तनय राऊत या विद्यार्थ्यांनी मोठ्या गटात तर आयुष राऊत व भूषण इंगळे(८ड) यांच्या गटाने लहान गटातून प्रथम क्रमांक पटकाविला. या दोन्ही संघांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यांना सहशिक्षक तनय गांधी व डॉ. वर्षा पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे आदींनी केले.



### पोलिस आयुक्तालयात उपहारगृह सुरु

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

सोलापूर शहर पोलीस आयुक्त कार्यालय येथे पोलीस उपाहारगृह व नूतनीकरण केलेल्या मिटिंग हॉलचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, विजय कबाडे, डॉ. दिपाली काळे, सर्व सहायक पोलिस आयुक्त, सर्व पोलिस ठाण्यांचे निरीक्षक उपस्थित होते.

### लाडका विद्यार्थी योजना आणा : ॲड. हांडे

**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**

लाडक्या बहिणीच्या धरतीवरच लाडका विद्यार्थी म्हणून राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांना सगळेच शिक्षण मोफत करा. विद्यार्थिनीप्रमाणे विद्यार्थ्यांनाही पूर्णपणे सगळेच शिक्षण मोफत करावे या मागणीसाठी बार्शीचे आरक्षणाचे अभ्यासक ॲड. गणेश हांडे यांनी शालेय मंत्री दीपक केसरकर, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेऊन ती मागणी पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला. दोन्ही मंत्र्यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला व येणाऱ्या काळात ही मागणी पूर्ण करू असे आश्वासन दिले.यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते योगेशजी केदार हेही उपस्थित होते त्यांनी ही मागणी पूर्ण झाली तर आपल्या सरकारला त्याचा कसा फायदा होईल असे निदर्शनास आणून दिले.



## निधन वृत्त

### पी. बी. कामतकर



**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

बँक ऑफ बडोदा सोलापूरचे निवृत्त मॅनेजर पी. बी. कामतकर (वय ८९) यांचे शनिवारी पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. आयबीई संघटनेसाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, विवाहित कन्या, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सुमन भगरे



**भोसे, दि. ५ ऑक्टोबर-**

भोसे (ता. मंगळवेढा) येथील सुमन भगरे यांचे अल्पशा आजाराने शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# हमीभाव खरेदीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु

**● पात्र शेतकऱ्यांना मिळणार मूग, उडीद, सोयाबीन या पिकांवर हमीभाव**




| हमीभाव आणि खरेदीकेंद्र | | नाफेडने ठेवलेली आधारभूत हमीभाव दर |
|---|---|---|
| १) | मूग | ८ हजार ६८२ रू. |
| २) | उडीद | ७ हजार ४०० रू. |
| ३) | सोयाबीन | ४ हजार ८९२ रु. |

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑक्टोंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील खरीप हंगाम २०२४ मध्ये नाफेड या सरकारी संस्थेच्या वतीने मुग, उडीद, सोयाबीन हमी भावाने खरेदीकरीता शेतकरी नोंदणी सुरू केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ८ सेंटरला मंजुरी दिली असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी एच. डी. भोसले यांनी दिली आहे.

चालू आर्थिक वर्षात सण २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार राज्यात नाफेडच्या वतीने मुग, उडिद, सोयाबीन पिकांच्या खरेदीकरीता शेतकरी नोंदणी आणि खरेदी करण्याबाबतच्या सुचना (दी.२७) सप्टेंबर २०२४ रोजी दिल्या आहेत. नाफेडने राज्यातील जवळपास १९ जिल्ह्यातील १४६ केंदाना मंजुरी दिली आहे. हमीभाव खरेदीसाठी शेतकऱ्यांना आपल्या शेताचा सातबारा उतारा, आधार कार्ड, बँकेचे पासबुकसह आपल्या पिकाची नोंदणी करावी. त्यानंतर एस.एम.एस आल्यानंतर शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उत्पादित केलेल्या शेतमालाचे चाळणी तसेच आद्रता प्रमाणात असणे आवश्यक आहे. खरेदी प्रक्रियेच्या निकषांमध्ये उत्पादितचे शेतमाल यांचा समावेश झाल्यानंतरच त्याची खरेदी करता येणार आहे.

> राज्य सरकारने आणि नाफेडने ठरवलेल्या हमीभाव दराने मूग, उडीद, सोयाबीन खरेदी करण्यात येणार आहे. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा, अक्कलकोट, बार्शी, माढा, मंगळवेढा, पंढरपूर आणि दक्षिण सोलापूर अशा आठ केंद्रामधून शेतकऱ्यांकडून मूग, उडीद, सोयाबीनची खरेदी केली जाणार आहे.



# विद्यापीठ परिसरातील धार्मिक स्थळाबाबत नव्याने अहवाल सादर करू

**● कुलगुरूंचे आश्वासन**
**● विश्व हिंदू परिषदेचे निवेदन**

**छत्रपती संभाजीनगर,**
**दि. ५ ऑक्टोबर-**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील मंदिरे व विपश्यना केंद्र या प्राचीन धार्मिक स्थळांमध्ये मागील तीनशे वर्षांपासून पूजाअर्चा सुरू आहे. राज्यघरातून भाविक येथे दर्शनाला मोठ्या संख्येत येतात. असे असूनही विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीत पुरातत्व खात्याचा तज्ञ मंदिर विषयातला अभ्यासक न घेता ही धार्मिक स्थाने अतिक्रमित असल्याचा चुकीचा अहवाल उच्च न्यायालयात सादर केला.

त्या आधारावर माननीय उच्च न्यायालयाने सर्व धार्मिक स्थळे पाडण्याचा आदेश दिला. यासंदर्भात विश्व हिंदू परिषदेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरू यांना निवेदन देऊन विद्यापीठ परिसरातील मंदिरांच्या व विपश्यना केंद्राच्या बाबतीत जी समिती तयार करण्यात आली. त्यात मंदिर अभ्यासक पुरातत्व खात्याचा सदस्य घेउन व्यवस्थित अभ्यास करून नव्याने पुनश्च अहवाल सादर करावा व उच्च न्यायालयाकडून यासाठी आवश्यक तो वेळ मागून घ्यावा, असे निवेदन दिले. कुलगुरूंनी प्रत्यक्ष चर्चेत आम्ही लगेचच या संदर्भात पुरातत्त्व खात्याचा तज्ञ या समितीत घेऊन नव्याने आमचा अहवाल उच्च न्यायालयात दाखल करू असे आश्वासन दिले. यावेळी विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार जिल्हा मंत्री अभिषेक कादी सहमंत्री गोपाळ डोंगरे गजाननजी सानप फुलचंद सलामपुरे विनायकजी पांडे धर्मराज बागवाले आणि अन्य बजरंग दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# दीड महिन्यांनी सरकारमधील सर्व गद्दार बेकार होणार : ठाकरे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.५ ऑक्टोबर -**

बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना सरकारकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. मात्र सच्चे शिवसैनिक त्यांच्या रोजगारासाठी प्रयत्नशील आहे. दीड महिन्यानंतर सरकारमधील सर्व गद्दार बेकार होतील, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी केले.

ठाकरे गटाचे सेनेकडून विलेपार्ले येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुती सरकारवर कडाडून टीका केली. ते म्हणाले, मराठी माणूस नोकरी घेणारा नाही तर नोकरी देणारा बनला पाहीजे, यासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली होती. ते काम आजही निष्ठेने सुरू आहे. मात्र आज सरकारकडून दंगली भडकविण्याचं राजकारण सुरू आहे. हिंदू-मुस्लीम दंगल भडकवूनसमाजासमाजात तेढ निर्माण केली जात आहे. यामुळे सामान्य माणूस व्यस्त राहतो आणि मूळ प्रश्नांकडे पाहत नाही. दंगलीत सामान्य माणूस भरडला जातो, दंगली घडविणारे मात्र बाजूला राहतात. असे सांगून ,ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई-ठाण्याची वारी करत आहेत ते त्यांच्या कंत्राटदारांचे खिसे भरायला. हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प घोषित होतात, पण प्रकल्पही पूर्ण होत नाहीत.



ज्या ज्या प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधानांनी केले, त्या प्रकल्पाचे काम पूर्ण झालेलं नाही. रस्त्यांची कामं, शिवस्मारकाचं जलपूजन केलं होतं, तेही झालं नाही. कंत्राटदारांची खिसे मात्र भरले जात आहेत. त्यामाध्यमातून मोदींनी पाहिजे तितक्या फिती कापायच्या आहेत, त्या कापून घ्यावेत. विधानसभा निवडणुकीत तुमच्या पक्षाला आणि तुमच्या गद्दार मित्रांना जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. आज आम्ही तरूण-तरूणींना रोजगार देत आहोत. तसे आगामी दीड महिन्यांनी सरकारमधील सर्व गद्दार बेकार होणार आहेत. ते गद्दार आमच्याकडे येतील, पण आम्ही एकाही गद्दाराला रोजगार देणार नाहीत. तसेच प्रकल्पाच्या नावाने तुम्ही जी लूट करत आहात, त्या लुटीचा हिशेब आम्ही सत्तेत आल्यानंतर करू, असेही आव्हान ठाकरे यांनी दिले. मराठी लोकांना रोजगार नाकारणाऱ्यांना इशारा देताना ते म्हणाले की, मधल्या काळात मराठी माणसांना 'नो एंट्री 'अशी जाहिरात काहीनी लावली होती, यापुढे हा बोर्ड ज्या दारावर लागेल, ते दार तोडून-फोडून मराठी माणूस आत घुसल्याशिवाय राहणार नाही. मराठी माणसांना नाकारणारा बोर्ड लावूनच दाखवावा, असे आव्हानही त्यांनी यावेळी दिले.

# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या तालुकाध्यक्षाची निघृण हत्या

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.५ ऑक्टोबर-**

राष्ट्रवादी काँग्रेसचे(अजित पवार) भायखळा विधानसभा तालुका अध्यक्ष सचिन कुर्मी ऊर्फ मुन्ना(वय ४५) यांची शुक्रवारी मध्यरात्री हत्या करण्यात आली. दोन ते तिघाजणांनी धारदार हत्याराने वार करू त्यांना मारण्यात आले. हत्येचे नेमके कारण व हल्लेखोरांचा अद्याप थांगपत्ता लागलेला नाही. पूर्व वैमन्य व आर्थिक देवाणघेवाणीतून ही हत्या झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.याबाबत भायखळा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भायखळा येथील रेतीवाला इंजस्ट्रीज समोरील अनंत पवार मार्गावर शुक्रवारी मध्यरात्री एक व्यक्ती जखमी अवस्थेत पडल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला मिळाली. जवळ असलेल्या काळाचौकी पोलीस ठाण्याच्या मोबाइल व्हॅनला घटनास्थळी पोचल्यानंतर त्यांनी जखमी कुर्मी यांना तात्काळ जे.जे. रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या मानेवर, हातावर, पोटावर व छातीवर गंभीर जखमा आहेत.दोन ते तीन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याचा संशय आहे. भायखळा येथील म्हाडा कॉलनीच्या मागच्या बाजूला हा प्रकार घडला. एका पादचाऱ्याने घटनेची माहिती देण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्षाला दूरध्वनी केला होता. दरम्यान, हा हल्ला का करण्यात आला त्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

सचिन कुर्मी (रिलहळप ज्ञीीाळ) यांच्यावर कोणी आणि कोणत्या कारणासाठी हल्ला केला हे अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, वादातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. शिवाय, या हत्येमुळे त्यांचे समर्थक आक्रमक झाले आहेत. आरोपींना तात्काळ पकडण्याची मागणी होत आहे. याप्रकरणी काय कारवाई होते याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. अद्याप याप्रकरणी कोणतीही अटक झालेली नाही. तर कुर्मी हे समीर भुजबळ यांचे जवळचे कार्यकर्ते म्हणून ओळखले जायचे, आज समीर भुजबळ कुर्मी कुंटूबांची भेट घेणार आहेत.

# तरुण भारतचे पत्रकार किरण बनसोडे यांचा आज नागरी सत्कार

**● पत्रकारिता भूषण पुरस्काराने होणार गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑक्टोबर-**

पत्रकारितेची २२ वर्षपूर्ती झाल्याबद्दल दैनिक सोलापूर तरुण भारतचे पत्रकार किरण बनसोडे यांचा रविवार दि. ६ ऑक्टोंबर सायंकाळी ५.३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, श्री सिद्धेश्वर मंदिर शेजारी, सोलापूर येथे पत्रकारिता भूषण पुरस्काराने नागरी सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती गौरव समितीचे अध्यक्ष चांगदेव सोनवणे आणि सचिव भालचंद्र साखरे यांनी दिली.



पत्रकार किरण बनसोडे गौरव समितीच्या वतीने हा सोहळा होणार आहे. सन्मान चिन्ह, मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते बनसोडे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष राजाभाऊ सरवदे , जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी संजय जावीर, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड, आर्यनंदी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. राजेश फडकुले, रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष सुबोध वाघमोडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष राजाभाऊ इंगळे, रिपाइंचे प्रदेश उपाध्यक्ष के. डी. कांबळे,बसपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. संजीव सदाफुले, ज्येष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे, कामगार नेते अशोक जानराव , सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनीष केत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# अज्ञात इसमाचा मृतदेह सापडला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑक्टोबर-**

धारदार शस्त्राने हल्ला करुन बेवारस स्थितीत टाकून दिलेल्या एका अनोळखी ३५-४० वयोगटातील इसमाचा मृतदेह आढळून आला आहे.

हा प्रकार १ ऑक्टोबर रोजी देवळा गंगापूर येथील भीमा नदीच्या काठावर रुद्रपद पायऱ्यांजवळ आढळून आला. सचिन गुमाटे हे मित्रांसोबत जात असताना त्यांना हा मृददेह आढळून आल्याने त्यांनी पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली.त्या मृतदेहावर पांढरा शर्ट, चॉकलेटी रंगाचा एस्सा कंपनीची अंतर्वस्त्रे, मृताच्या डाव्या हातावर तेलगू अक्षरांचा आर. श्रीशैलम् असा टॅट्, मृताच्या उजव्या पायाच्या खाली आणि पायावर जुनी जखम आहे. एक लहान पितळी पदक, काळा धागा बांधलेला आहे, तांब्याची अंगठी आहे. ओळख पटल्यास देवल गंगापूर ९४८०८०३५६८, अफजलपूर ९४८०८०३५६८, आळंद उपविभाग: ९४८०८०३५२३, कलबुर्गी जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष किंवा ४०८०८२३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन सर्कल इन्स्पेक्टर चन्नय्या हिरेमठ यांनी केले आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **BHAGYALAXMI REVANSIDAYYA MALBHAGE** TO HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE **BHAGYALAXMI REVANSIDHAYA MALBHAGE** IN FUTURE THE SAMENAME WILL BE USED BY MY HUSBAND CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: **BHAGYALAXMI REVANSIDAYYA MALBHAGE**

NEW NAME: **BHAGYALAXMI REVANSIDHAYA MALBHAGE**

ADDRESS: SHIV NAGAR, DEONI DISTRICT LATUR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **REVANSIDAYYA KASHINATH MALBHAGE** TO HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE **REVANSIDHAYA KASHINATH MALBHAGE** IN FUTURE THE SAMENAME WILL BE USED BY MY WIFE CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: **REVANSIDAYYA KASHINATH MALBHAGE**

NEW NAME: **REVANSIDHAYA KASHINATH MALBHAGE**

ADDRESS: SHIV NAGAR, DEONI DISTRICT LATUR (M.S.) 413519

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name, **Anju Sundardas Ahuja,** has been changed to new **Manmeet Kamlesh Kukreja**

Address - 102 Antrolikar Nagar 2, Solapur.

Kindly note the same.

**पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय**

**१५१/५, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर ४१३००५**

**४८ व ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाची ४८ व ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि २०/१०/२०२४ रोजी सकाळी १०:३० वा संस्थेच्या विणकर सभागृहात बोलविण्यात येत आहे तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सभा दि ०७/०५/२०२३ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे
२) सन २०२२-२३ व २०२३-२४ या सालाचे ताळेबंद पत्रक तसेच उत्पन्न व खर्चाची माहिती घेऊन त्यास मंजुरी देणे
३) सन २०२२-२३ व २०२३-२४ या सालाचे ऑडीट रिपोर्टची माहिती घेऊन त्यास मंजुरी देणे
४) सन २०२४-२५ या सालाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे
५) सन २०२४-२५ या वर्षाकरिता लोकल ऑडिटरची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे
६) मा अध्यक्षसाहेब यांच्या पूर्व परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय

**ठिकाण :- सोलापूर**
**दिनांक :- ०५/१०/२०२४**

**सही/-**
**पांडुरंग सिद्रामप्पा दिड्डी**
**अध्यक्ष**

**सही/-**
**अरविंद दत्तात्रय चित्री**
**कार्यवाह**

**टिप :-**
१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल त्या वेळेस कोरमची आवश्यकता लागणार नाही.
२) सभासदांनी मागील येणे वर्गणी थकबाकी एक दिवस अगोदर संपूर्णपणे भरावी.
३) सभेपुढील विषय सुचना फलकावर पहावयास मिळतील त्या संबंधीची कागदपत्रे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**जाहीर समन्स** रस्ता/ ४/२०२४

**कुर्डुवाडी येथील मे. उपविभागीय माढा विभाग कुर्डुवाडी यांचे कार्यालयात**

**रयत शिक्षण संस्था सातारा** - **अपेलंट**

**विरुध्द**

१) **किसन अंबादास घोडके** (वय. सज्ञान, धंदा. शेती)
२) **रामचंद्र तुळशीराम बागल** (वय. सज्ञान, धंदा. शेती)
३) **शिवाजी कृष्णा माने** (वय. सज्ञान, धंदा. शेती)
४) **राम भागवत माने** (वय. सज्ञान, धंदा. शेती)
५) **अंकुश उत्तम गळगुंडे** (वय. अज्ञान, धंदा. शेती)
६) **सुभाष उत्तम गळगुंडे** (वय सज्ञान, धंदा. शेती)

**सर्व रा. घोटी ता. माढा जि. सोलापूर - रिस्पॉंडंड**

ज्याअर्थी वर नमुद अपेलाट यांनी तुम्ही रिस्पॉंडंट यांचे विरुध्द सदरचे अपील हे मे.उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी यांचे न्यायालयात दाखल केलेले आहेत. सदरहु प्रकरणामध्ये तुम्ही वर नमुद रिस्पॉंडंट नं.१ ते ६ यांना वारंवार अपीलाचे नाटीसा पाठवुनही तुमचा आढळ होत नाही. ज्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की तुम्ही सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे किंवा मे.कोर्टाने नेमलेल्या तारीख १७/१२/२०२४ रोजी तुम्ही स्वतः किवा वकीलामार्फत हजर राहुन म्हणने मांडणे अन्यथा कोर्ट आपले गैरहजरीमध्ये पुढील योग्य तो आदेश पारित करतील याची नोंद घ्यावी हे जाहीर समन्स/नोटीस दिली असे ता.४/१०/२०२४

**सही/-**
**क.लिपीक**

शिक्का

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग कुर्डूवाडी**

**खरेदी पुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे गाताची वाडी ता. बार्शी, व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापुर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी मौजे गाताची वाडी ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन मिळकत गट नं. ११ पैकी न विभागलेले हिस्याची संपूर्ण जमीन तीचे क्षेत्र ०० हे ७० आर आकार ०० रु. ९८ पैसे ही शेतजमीन आतील तदंगभुत वस्तुंसह व मालकी वहिवाटीच्या हक्कांसह.

वरील वर्णन केलेली शेतजमीन ही श्री. गणेश पांडुरंग मंडलिक व श्री. योगेश पांडुरंग मंडलिक यांनी ता. १७/०५/२०२३ रोजी रजि.दस्त क्र. ३२१६/२०२३ अन्वये खरेदी केलेली असुन, त्यांचे शेतजमीन गट नं. ११ चे ७/१२ उताऱ्यास सामाईकात नोंद आहे.

वर नमुद शेतजमीनीचे ७/१२ उताऱ्यास श्री. गणेश पांडुरंग मंडलिक व श्री. योगेश पांडुरंग मंडलिक यांचे मालकी हक्कात नोंद असुन त्यांनी सदर मिळकतीचा कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकार यांचे बरोबर कायमखुश खरेदी देण्याचा, ठराव करून वर नमुद शेतजमीनीचा साक्षीदारासमक्ष खरेदी व्यवहाराची बोलणी करुन इसारा दाखल रोख रक्कम स्विकारलेली आहे. तसेच त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे. तरी, वर नमुद मिळकती संदर्भाने इतर कोणीही कसल्याही प्रकारचा साठे करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा बैंक कर्ज बोजे व विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार निर्माण होतील असा कोणताही व्यवहार करु नये. तसे केल्यास तो व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याउपरही वर नमुद शेतजमीनी संदर्भाने साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार निर्माण होतील असा दस्त केला असल्यास त्यासंबंधीची सर्व ती कागदपत्रे घेवुन आमचे पक्षकार किंवा त्यांचे माहितीगार वकिल ॲड. आर.ए. पाटील यांच्याकडे येत्या आठ दिवसाचे आत संपर्क करावा अन्यथा वर नमुद शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार किंवा हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ०६/१०/२०२४

**सही/-**
**श्री.ॲड.पी.पी.वाघमारे**
**श्री. ॲड राहुल अंकुश पाटील (गुंड)**
**बी.ए.एल.एल.एम**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**मो. ९५२७०२३११८**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Re-Tender 3rd call Notice**

Digitally signed online bids are invited through Re-tender 3rd call process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000033331 Re-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/Re-Tender:14/2024-2025,** (3rd call) **Particulars: -** Work of replacement of Old C&R panel by BCU based C&R panels at various substation under EHV O&M Circle Solapur, **Estimated cost:** Rs. 67,57,375/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 67,574/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 03.10.2024 to 11.10.2024 **Last Date of Submission:** 11.10.2024 up to 18:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 11.10.2024 at 18:30Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer - 7447440608 For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.

PRE Bid Meeting :- 07.10.2024 at 12 : 00 @ EHV O&M Circle Solapur

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## उत्तम अभियंता पुरस्काराने जुबेर शेख सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**



सोलापूर- जुनी मील वीज कार्यालयात महावितरण ग्रामीण विभागात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या जुबेर शेख यांना भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या उत्तम अभियंता पुरस्कार देण्यात आला.

यावेळी वीज महावितरण विभागाचे अधीक्षक अभियंता सुनील माने, वरिष्ठ मोटार यांत्रीक अविनाश शिंदे, बांधकाम विभागाचे अभियंता संजय माळी, नसीमा पठाण, विजय पाटील, बाळासाहेब वाघमारे आदी उपस्थित होते. जुबेर शेख हे अक्कलकोट शहर शाखा कार्यालय येथे २६ वर्षे आणि जोडबसवण्णा चौक येथे पाच वर्षे येथे उत्तमरित्या सेवा बजावली आहे.



## पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयामध्ये लाल बहाद्दूर शास्त्री व महात्मा गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर -**

संस्थेचे सर्व पदाधिकारी यांच्या शुभहस्ते लालबहादूर शास्त्री आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले अरविंद चिन्नी यांनी लालबहादूर शास्त्री आणि महात्मा गांधी यांच्या जीवन कार्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली यावेळेस देविदास गोटीपामूल म गणपत कुरापाटी लक्ष्मीनारायण बोद्दुल संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते

# गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

## होनसळजवळ कारवाई; तालुका पोलिसांच्या गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील होनसळ गावाजवळ सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने गावठी कट्टा बाळगणार्या एकास अटक केली.

सुग्रीव उत्तरेश्वर करंडे (वय २६, रा. होनसळ ता. उत्तर सोलापूर) असे गावठी कट्ट्यासह अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

आगामी विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडून निवडणुकीच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठीची खबरदारी पोलिसांकडून घेण्यात येत आहे त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी या अनुषंगाने तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी




गुन्हे प्रकटीकरण पथकाला विशेष सूचना केल्या आहेत दरम्यान, त्यांनी विनापरवाना बेकायदेशीर अग्नीशस्त्र बाळगून फिरणा-या इसमाची माहिती संकलित करून त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या प्रमाणे सोलापूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर होनसळ फाटा येथे पथकाने मिळालेल्या माहितीप्रमाणे संशयित इसमाचा शोध घेतला. तेव्हा तेथे एक काळया रंगाची पॅन्ट व पांढरा हिरव्या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट घातलेला इसम मिळून आला. त्याचा पथकातील अधिकारी व अंमलदारांना संशय आल्याने त्यास ताब्यात घेताना तो पळून जाण्याच्या तयारीत होता त्यास शिताफीने पकडून त्याची झडती घेतली. तेव्हा त्याच्या कंबरेला पॅन्टच्या आतमध्ये खोचून ठेवलेला एक देशी बनावटीचा कट्टा मिळून आला. त्याच्याकडे परवाना नसल्याचे त्याने सांगितले. याबाबत पोलीस नाईक लालसिंग तुकाराम राठोड यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार राहुल महिंद्रकर हे करीत आहेत. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता ७ ऑटोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक मनोज अभंग, पोलीस अंमलदार राहुल महिंद्रकर, नागेश कोणदे, लालसिंग राठोड, अनंत चमके, पोलीस अंमलदार पैंगबर नदाफ व वैभव सूर्यवंशी यांनी केली.



सोलापूर : गणेश पेठ हिंगलांबिका मंदिरात तिसऱ्या माळेला देवीस ब्रह्मचारणी माता रूपदर्शन साकारण्यात आले.



# सोलापूरच्या दोन्ही संघाची विजयी सलामी

### राज्य थ्रोबॉल स्पर्धेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर -**

सोलापूरच्या पुरुष व सबज्युनियर मुलींच्या संघाने सलामीचे सामने जिंकत विजयी सलामी दिली.

हत्तुरे नगर येथील मल्लिकार्जुन हायस्कूलच्या मैदानावर शनिवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत पुरुष संघाने लातूरचा व सबज्युनियर मुली संघाने साताराचा २-0 असा पराभव केला.थ्रोबॉल असोसिएशन सोलापूर व श्री मल्लिकार्जुन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र थ्रोबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शांती एज्युकेशन सोसायटीचे सचिव सॉफ्टबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सॉफ्टफुटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे, महाराष्ट्र थ्रो बॉल संघटनेचे सचिव सुनील इंगोले, बेसबॉलचे जिल्हाध्यक्ष सीए विनोद भोसले, जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, प्रशालेचे संचालक धरेप्पा हत्तुर, महानगरपालिकेचे क्रीडाधिकारी श्रीकांत घोलप, तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव हे उपस्थित होते.

सूत्रसंचालन संतोष खेंडे व प्रास्ताविक गंगाराम घोडके यांनी केले. पर्यवेक्षक दिंडोरे यांनी आभार मानले.



सोलापूर -पद्मनगर महिला बहुउद्देशीय सामाजिक संस्था व पद्मनगर सांस्कृतिक सेवा व क्रीडा मंडळाच्या वतीने कर्णिक नगर येथे आयोजित भव्य ब्रतुकम्मा आणि दांडिया स्पर्धा.



## इंडियन मॉडेल स्कूलच्या तिघांची विभागीय सॉफ्टटेनिस स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

इंडियन मॉडेल स्कूलच्या सीबीएसईच्या तिघींची विभागीय शालेय सॉफ्टटेनिस स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे झालेल्या शहर सॉफ्ट टेनिस स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात उन्नती इंगोले हिने तिसरा, १७ वर्षाखालील मुलाच्या गटात हर्ष सूर्यवंशी याने तर मुलींच्या गटात पलक कोल्हापुरे हिने पाचवा क्रमांक मिळवला. या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सचिन ढवाण व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

## मेहता प्रशालेची योगासन, रोप स्किपिंग स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

वि. मो. मेहता माध्यमिक प्रशालेच्या खेळाडूंनी शालेय व असोसिएशनच्या योगासन व शिवदारे कॉलेजच्या वतीने झालेल्या रोप स्किपिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. खेळाडूंना सहशिक्षिका योगशिक्षिका स्वामी प्रतिमा यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशालेचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



**कामगिरी : योगासन -** शालेय : १४ वर्षाखालील : संहिता गद्रे (पारंपारिक आणि वैयक्तिक रेदमिक, द्वितीय), समर्थ नागनाथ कुरे (वैयक्तिक रिदमिक प्रथम), संहिता गद्रे व अनुष्का प्रतीक झाकणे (आर्टिस्टिक वेअर व रिदमिक वेअर द्वितीय), असदअली शेख व समर्थ कुरे (रीदमिक वेअर प्रकारात चौथा).

**१७ वर्षांखालील :** वेदांत संगमेश्वर दाशाळ (वैयक्तिक रिदमिक प्रकारात द्वितीय, पारंपारिक योग प्रकारात सहावा), श्रावणी मल्लिकार्जुन बगले ( रिदमिक योग द्वितीय), अंजली मणुरे व वैष्णवी दाशाळ (रिदमिक पेअर पाचवा), गुरूकिरण कुरे व वेदांत दाशाळ (तृतीय). जिल्हा असोसिएशन योगासन : संहिता अच्युत गद्रे (ट्रॅडिशनल योगासनामध्ये प्रथम, आर्टिस्टिक सिंगल द्वितीय)

**रोप स्किपिंग-** १४ वर्षांखालील गट : समर्थ कुरे, वेदांत दाशाळ, राजवर्धन बिराजदार, विनायक हुबळी रिले रोप स्किपिंग प्रकारात द्वितीय), सहिता गद्रे (३० सेकंद स्पीड प्रकारात तृतीय). १७ वर्षांखालील गट : गुरुकिरण कुरे (फ्रीस्टाइल, प्रथम व ३० सेकंद स्पीड द्वितीय)



## शालेय जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत केएलई स्कूल एनटीपीसी तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

ज़िल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथे झालेल्या शालेय जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत के. एल.ई. स्कूलएनटीपीसीचा संघाने तृतीय स्थान मिळविले.

१४ वर्षांखालील मुलींच्या गटात त्यांनी ही कामगिरी केली. तसेच अवनी नाम्बियार हिची खेळाडूचे विभागीय स्पर्धे साठी निवड झाली. संघास क्रीडाशिक्षक रेवणसिद्ध म्हेत्रे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका सिस्टर रंजना यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ :** अवनी नाम्बियार, अनामीका सिंह, कोल्लूरी श्रीनिकिला, शमिका सिंह, याझिनी एम.

# गायकवाड, चव्हाण, चौगुले, गोचडे, रवा अजिंक्य

### शालेय शहर सॉफ्ट टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर -**

शालेय शहर सॉफ्ट टेनिस स्पर्धेत मृण्मयी गायकवाड (छत्रपती शिवाजी प्रशाला), रुद्र प्रताप चव्हाण( लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल ), केतकी चौगुले (सेवासदन हायस्कूल ), आरुष गोचडे (नागेश करजगी ऑर्किड स्कूल), जॅक भंडारे (छत्रपती शिवाजी प्रशाला )व वृंदा रवा(वालचंद कॉलेज) यानी अनुक्रमे १४, १७ व १९ वर्षाखालील गटात अजिंक्यपद पटकावले.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुल लॉन टेनिस कोर्टवर झालेल्या या स्पर्धेत १०२ मुले ३६ मुलींचा सहभाग होता. या स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना शहर



प्रमुख दत्तात्रय वानकर, संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, राज्य लॉन टेनिस मानद सचिव राजीव देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या स्पर्धेसाठी पंच म्हणून सुधीर सालगुडे, गणेश बंडगर, पूजा सालगुडे, महेश झांबरे, उमेश, वसीम शेख सर बालाजी केदार प्रशांत केदार , ओंकार जाधव यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम पाच) : १४ वर्षाखालील मुले : रुद्रप्रताप चव्हाण (लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल), तनुज संचेती (के. एल.ई. इंग्लिश मीडियम स्कूल, यशवंतराजे पवार (हरिभाई देवकरण), अजिंक्य वसपटे (श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला), आरव कणकी (लिटिल फ्लावर स्कूल).

मुली : मृण्मयी गायकवाड, विपश्यना सोनवणे (छत्रपती शिवाजी प्रशाला ), उन्नती इंगवले (इंडियन मॉडेल स्कूल ), पोर्णिमा सोलापूर (छत्रपती शिवाजी प्रशाला). इफ्रा सय्यद (हरीभाई देवकरण प्रशाला ).

१७ वर्षाखालील मुले : आरुष गोचडे (नागेश करजगीऑर्किड स्कूल ), वर्धन शिंगवे (के. एल.ई. इंग्लिश मीडियम स्कूल), आर्यन येमुल (संगमेश्वर पब्लिक स्कूल ), ईश्वराज होमकर (नागेश करजगी स्कूल), हर्ष सूर्यवंशी (इंडियन मॉडेल स्कूल ).

मुली : केतकी चौगुले (सेवासदन हायस्कूल) भक्ती जाधव (रॉजर्स इंग्लिश मीडियम स्कूल), श्रुती मंगरुळे (सेंट थॉमस इंग्लिश मीडियम स्कूल), राशी पवार (सेंट थॉमस इंग्लिश मीडियम स्कूल). पलक कोल्हापुरी (इंडियन मॉडेल स्कूल).

१९ वर्षाखाली मुले : जॅक भंडारे, योसेफ नाईक (छत्रपती शिवाजी प्रशाला), मयूर वाले (संगमेश्वर कॉलेज), विजयकुमार वीर गोंडा (नेताजी भोसले हायस्कूल), ईशान मेरू (संगमेश्वर कॉलेज).

मुली : वृंदा रवा (वालचंद कॉलेज ), सुदिक्षा डुनगे, जोया सय्यद, प्रिया दुधनी, तनुजा वावरे (छत्रपती शिवाजी प्रशाला).






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



सांगोला : विद्या मंदिर प्रशालेत वन्यजीव सप्ताह कार्यक्रमात सहभागी झालेले वन अधिकारी, विद्यार्थी व शिक्षक.

### वन्यजीव संरक्षण, जतन करणे काळाची गरज : तुकाराम जाधवर

**सांगोला, दि. ५ ऑक्टोबर-**

वन्यजीव संरक्षण व जतन काळाची गरज आहे असे प्रतिपादन सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांनी केले.सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे वन्यजीव सप्ताह निमित्त वन्यजीव निसर्ग साखळी व मुलांची शिस्त याविषयी व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सां.ता.शि.प्र.मंडळाचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य अमोल गायकवाड, वनरक्षक वनिता इंगोले, जी. बी. व्हरकटे, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद उपस्थित होते. यावेळी जाधवर यांनी वन्यजीव प्राणी यांची माहिती, वन्यजीव संरक्षण, वन्यजीव प्राणी कायदे, नुकसान भरपाई विषयी माहिती, झाडांचे अनन्यसाधारण महत्त्व, वनपरिक्षेत्र नोकरीची संधी व विद्यार्थ्यांना शिस्तीविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रम नंतर वनपरिक्षेत्र कार्यालयाकडून देण्यात आलेल्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण यांनी तर प्रकाश म्हमाणे यांनी आभार मानले.



बार्शी : निमाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. प्रदीप जाधव यांचा सत्कार करताना मान्यवर.

### निमा बार्शीच्या अध्यक्षपदी डॉ. जाधव

**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**

बार्शीतील आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. प्रदीप जाधव यांची सर्वानुमते निमा बार्शी शाखेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर सचिवपदी डॉ. विजय पवार व खजिनदारपदी डॉ. रणजीत काकडे यांची निवड करण्यात आली. यावेळी निमा वुमन फोरमची नवीन कार्यकारिणीचीही निवड करण्यात आली. यामध्ये डॉ. मीरा गोदेपुरे यांची अध्यक्षपदी, डॉ. संध्या साने यांची सचिवपदी तर डॉ. रश्मी अग्रवाल यांची खजिनदारपदी पुनर्निवड करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ सदस्य डॉ. विजय गोदेपुरे, डॉ ना. पा. देशपांडे, डॉ. हेमंत साने, डॉ. मीरा गोदेपुरे यांनी आपले विचार मांडले. यावेळी संघटनेतील ज्येष्ठ सदस्य डॉ. सुनील फटाले, डॉ. निशीगंध जाधव, डॉ. गणेश जाधव, डॉ. विलास सरवदे, डॉ. प्रशांत मांजरे, डॉ. सुधीर राऊत, डॉ. जयंत कुलकर्णी, डॉ. गणेश वाघमारे उपस्थित होते.



सांगोला : सोमवारी लोकार्पण करण्यात येणाऱ्या शिवशिल्पाची सुंदर प्रतिकृती.

### सांगोल्यात उद्या शिवतीर्थाचे होणार लोकार्पण

**सांगोला, दि.५ ऑक्टोबर-**

सांगोल्यात सोमवारी ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वा. शिवतीर्थाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. २७ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशिल्पाचे सांगोल्यात स्वागत करण्यात आले होते. शिवशिल्पाचे लोकार्पण छत्रपती उदयनराजे भोसले, छत्रपती संभाजी राजे, श्रीमंत शिवाजीराजे जाधव, श्रीमंत अमोलराजे भोसले, श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर, डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या उपस्थितीत होणार आहे. शिवप्रेमी मंडळाला आजपर्यंत सर्व जाती धर्मातील नागरिकांनी सहकार्य केलेले असून या पुढेही आपणा सर्वांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली मंडळाची पुढील वाटचाल राहील. या शिवतीर्थच्या लोकार्पण सोहळ्यास सर्व शिवप्रेमीनी सहकुटुंब पारंपारिक वेशभूषा मध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन शिवप्रेमी मंडळाने केले आहे.



मंद्रुप : वडकबाळ येथील गोशाळेत गोमातेचे पूजन करताना उमा बिराजदार, कविता राठोड, कमलाबाई मुलगे, सुरेखा पुजारी.

### वडकबाळच्या कट्टेव्वादेवी गोशाळेत जल्लोष

**मंद्रुप, ५ ऑक्टोबर-**

देशी गाईला राज्यमाता आणि प्रति गोवंश प्रति दिवस पन्नास रुपये चाऱ्यासाठी अनुदान मंजूर केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे आदर्श कामधेनू संशोधन संस्था संचलित श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळच्या वतीने अभिनंदन तसेच हे ऐतिहासिक निर्णय सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी रिक्षा अभियानाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष उमा बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिवा कविता राठोड, माजी सरपंच कमलाबाई मुलगे, काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष सुरेखा पुजारी, श्री कट्टेव्वादेवी ट्रस्टचे बसवराज बिराजदार, वेदमूर्ती बसय्या स्वामी, ज्येष्ठ समाजसेवक रुद्रप्पा बिराजदार, राजामती बिराजदार, मुक्ताबाई लिगाडे, श्रीदेवी बिराजदार, शोभा बिराजदार, नागुबाई बिराजदार, सुनंदा कोळी, दैवशाला बिराजदार, अश्विनी बिराजदार, मेघा बिराजदार, रेवम्मा केरे, सुंदराबाई उमराणे, महादेवी बिराजदार, अविनाश हजारे, रावसाहेब राठोड आदी गोभक्त उपस्थित राहून गोमातेचा आशीर्वाद घेऊन शासनाचे आभार मानले.

# मुख्यमंत्री धर्मजागरण यात्रा पंढरपुरात दाखल

**लोककल्याणकारी योजना साधू-संतांद्वारे घरोघरी : मुख्यमंत्रिपदी पुन्हा एकनाथ शिंदेंनाच विराजमान कर; विठुरायाला अक्षय महाराज भोसले यांचे साकडे**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ आॅक्टोंबर -**

मुख्यमंत्री धर्मजागरण यात्रा शनिवारी (ता.५) पंढरपूरात दाखल झाली. यावेळी राज्यात महायुतीचे सरकार येऊन मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंनाच विराजमान कर असे विठुरायाला आपण साकडे घातल्याची माहिती शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांनी दिली. दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रभर या यात्रेचा प्रवास होणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

अक्षयमहाराज भोसले म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जगतील सर्वोत्तम असे क्षेत्र म्हणून पंढरपूरचा विकास करायचा आहे. पंढरपूरकरांच्या मनातील शासनाकडून सर्वांना विश्वासात घेऊन अत्यंत सुंदर पंढरपूर आपल्याला बनवायचे आहे.




पंढरपूर : मुख्यमंत्री धर्मजागरण यात्रा पंढरीत दाखल झाल्यानंतर विठ्ठलाचे दर्शन घेताना अक्षय महाराज भोसले यांच्यासह पदाधिकारी.

#### कोल्हापुरातून यात्रेस प्रारंभ

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रेरणेन आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाने अक्षयमहाराज भोसले यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री धर्मजागरण यात्रेचा २ आँक्टोबर रोजी कोल्हापूरातून प्रारंभ झाला. पश्चिम महाराष्ट्रासह विदर्भ, मराठवाडा, कोकण व उत्तर महाराष्ट्र असा राज्यभर या यात्रेचा प्रवास असणार आहे.

या सर्व घटनेत पंढरपूरकरांना आधी प्राधान्य दिले जाईल. मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे आतापर्यंत पंढरपूरसाठी ज्या ज्या मागण्या आम्ही केल्या त्या त्या तात्काळ त्यांनी पूर्ण केल्या आहेत. या मध्ये तिरुपतीच्या धर्तीवर आधारित दर्शन बारी असेल किंवा पंढरपूर मंदिराचा झालेला कायापालट. आषाढी यात्रेमधील मधील त्यांचा असणारा वावर आपण सर्वांनी अनुभवला आहेच. कोणताही डामडौल नसून सर्वसामान्यांसाठी काम करणारे असे व्यक्तीमत्व म्हणजे एकनाथ शिंदे आहेत असेही भोसले यांनी सांगितले. यावेळी वारकरी फडकरी दिंडी संघटनेचे संजयमहाराज देहूकर, वारकरी पाईक संघ प्रमुख राणामहाराज वासकर, राष्ट्रीय प्रवक्ते रामकृष्णमहाराज वीर, श्याम महाराज उखळीकर, नामदेव महाराज लबडे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, कबीर महाराज उपस्थित होते. भोसले महाराज यांनी पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे माहेरघर आहे. सर्व संत वंशज, फडकरी मंडळींच्या भेटी घेत अक्षयमहाराज भोसले यांनी संवाद साधला.

## राजू खरे यांच्यासोबतच राहणार : मनोहर सपाटे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑक्टोबर-**

मोहोळ विधानसभा राखीव मतदार संघातून निवडणूक लढविण्याची तयारी करीत असलेले उद्योजक राजू खरे यांच्याकडून पंढरपूर तालुक्यातील ताई सपाटे शिक्षण संकुल तारापूर नाला या शाळेसाठी तब्बल २०० बेंचेसची मदत करीत विद्यार्थ्यांना उत्तम सोय करण्यात आली आहे.

अध्यक्षस्थानी सोलापूरचे माजी महापौर मनोहर सपाटे होते. उद्योजक राजू खरे उपस्थित होते. सपाटे यांनी अगदी स्पष्टपणाने भूमिका गावातील नागरिकांसमोर मांडली. यामध्ये आपला माणूस म्हणून कायम मी खा. शरद पवार यांच्याच सोबत राहिलो आहे. यापुढेही कायम राहणारच आहे. आपण पवारनिष्ठ असल्यानेच मोहोळ विधानसभा मतदारसंघातून राजू खरे यांच्यासारखा कर्तव्यदक्ष आमदार होण्यासाठी आपण योग्य ती भूमिका घेणार असून, खरे यांना निवडणुकीत सहकार्यच करणार असल्याचे जाहीरपणे सांगितले.

राजू खरे यांनी मोहोळ तालुक्याचा विकास फार पूर्वी होणे अपेक्षित असल्याचे सांगत, या भागातील विद्यार्थ्यांसाठी मेडिकल आणि इंजीनियरिंग महाविद्यालय निघाले नाही. उलटअंशी मोहोळ शहरातील विकास होण्याऐवजी येथील महत्त्वपूर्ण अशी शासकीय कार्यालय अनगरकडे घेऊन जाण्याचे महापाप ज्यांनी केले आहे. त्यांना या आगामी विधानसभा निवडणुकीत मोहोळच्या मतदारकडून नक्की मूल्यमापन केल्याचे दिसून येईल, असे सांगितले. प्राचार्य महंमद शेख यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, सरपंच पांडुरंग परकाळे, सौदागर खडके, अरुण बनसोडे, गणेश नामदे, कुंडलिक डोंगरे, सौदागर गायकवाड, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष छगन पवार, शिवसेनेचे विलास चव्हाण, आरपीआयचे लक्ष्मण गायकवाड, भीम टायगर सामाजिक संघटनेचे लखन घाटे, संजय, समाधान बाबर, बालाजी वाघ, कृष्णा वाघ, संजय परकाळे, कृष्णाजी मदने, महादेव माने, बाळासाहेब सपाटे, मधुकर सपाटे, अ‍ॅड. समाधान गाडे आदी उपस्थित होते.

#### तारापूर नाला येथील सपाटे शाळेला २०० बेंचेसची भेट



पंढरपूर : तारापूर नाला शाळेतील कार्यक्रमाप्रसंगी राजू खरे, मनोहर सपाटे, तानाजी माने, पांडुरंग परकाळे यांच्यासह मान्यवर.

#### ६० लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

मोहोळ मतदार संघातील पंढरपूर तालुक्यातील तारापूर येथे जवळपास ६० लाख रुपयेची विकासकामे उद्योजक राजू खरे यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आली होती. यातील काही कामांचा शुभारंभ ही शनिवारी खरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तारापूर आणि परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## आधी उसाचे बिल द्या, मग बोला

#### तेलगाव येथील शेतकऱ्यांचा धर्मराज काडादी यांच्यासमोर आक्रमक पवित्रा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, ५ ऑक्टोबर-**

तेलगाव येथ सिद्धेश्वर कारखान्याचे प्रमुख धर्मराज काडादी यांना तेलगाव ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी आधी दोन-दोन वर्षांचे उसाचे बिल थकीत आहे ते द्या, शेतकऱ्यांनी काय करावे. चिमणी पाडली म्हणून तुम्हाला आमदार व्हायचे आहे. तुम्ही शेतकऱ्यांसाठी काय केले आतापर्यंत? आता का आला आहात. तुम्हाला वैयक्तिक स्वार्थासाठी आमदार व्हायचे आहे, शेतकऱ्यांसाठी व्हायचे असते तर आतापर्यंत तुम्ही शेतकऱ्यांसाठी काय केलंय? असे म्हणत शेतकरी व ग्रामस्थांनी प्रचंड विरोध करीत काडादी यांना बोलू दिले नाही.



काडादी परत जातानाही आधी बिल द्या, मग येथून जा असे म्हणत त्यांची गाडी रोखून धरण्याचा प्रयत्न केला. एका शेतकऱ्यांनी काडादी यांच्या गाडीसमोर झोपण्याचा प्रयत्न केला. कधीच सर्व सामान्यांचे प्रश्न काय आहेत याची माहिती नसणारे, शेतकऱ्यांच्या अडचणीत पाणी प्रश्न, वीज तोडणी, अतिवृष्टी, दुष्काळ, अशा प्रसंगात एकदाही शेतकऱ्यांसाठी काही न केल्यामुळे शेतकऱ्यांनी काडादी यांना जाब विचारला. आता विधानसभेला उभा राहायचे आहे म्हणून शेतकरी आठवला का? असा प्रश्न विचारला. त्यावेळी त्यांच्या सोबत आलेल्या नेते मंडळींनी शेतकऱ्यांना समजवण्याचा प्रयत्न केला. पण आक्रमक झालेले शेतकरी तुमचा काय संबंध? असे म्हणत त्यांना जुमानत नव्हते व गावकऱ्यांनी आपला रोष व्यक्त करीत काडादी व सोबतच्या नेत्यांना पळ काढायला लावला.

## सांगोल्यातील विकासकामांना तीन कोटींचा निधी मंजूर

#### आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ ऑक्टोबर-**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सांगोला नगरपरिषदेच्या ५ विकास कामांसाठी ३ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे,अशी माहिती आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली.

सांगोला नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे फर्निचर व अंतर्गत कामाकरिता १ कोटी, नगरपालिका जागेमध्ये जैन समाजासाठी त्यागी निवास व समाज मंदिर बांधकामासाठी ५० लाख,दिव्यांग बांधवांसाठी सभागृह बांधकामासाठी ५० लाख,ब्राम्हण समाजासाठी वाचनालय व सभागृह बांधकामासाठी ५० लाख, महाराणाप्रताप राजपुत गिसाडी समाजासाठी समाजमंदिर बांधकामासाठी ५० लाख असा एकूण ३ कोटी रुपये निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केला आहे. आ.शहाजीबापू पाटील यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश मिळाल्याने समाज बांधवांकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुती सरकारचे व आ.शहाजीबापू पाटील यांचे आभार मानण्यात येत आहेत.



## डॉ. सागर कांबळे यांची नियुक्ती

**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**



कौशल विकास मंत्रालयाडून बार्शी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेवर डॉ.सागर कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तिचे पत्र संबंधित संस्थेला प्राप्त झालेले व डॉ. सागर कांबळे यांना मंत्रालयातुन नियुक्ती संदर्भात पत्र मिळाले. डॉ. सागर कांबळे यांनी या अगोदर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद् बार्शी सहमंत्री, शहरमंत्री, तालुकाप्रमुख व जिल्हा समितीवर कॉलेज जीवनापासून त्यांनी विध्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलने, मोर्चे काढलेली आहेत. त्यांची कौशल्य विकास मंत्रलयाकून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेवर झालेली निवड ही त्यांनी केलेल्या कामाची पोचपावती आहे असा बोलले जात आहे.

## लोणारी समाज आर्थिक विकास महामंडळास राज्य सरकारची मंजुरी

#### दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ ऑक्टोबर-**

लोणारी समाज आर्थिक विकास महामंडळास अखेर राज्य सरकारने मंजुरी दिली आहे.याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे पाटील यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.या निर्णयाबद्दल दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांचे विशेष आभार मानले आहेत.

संपूर्ण राज्यभरात लोणारी समाज विस्तारला आहे.लोणारी समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे ही या समाजाची अनेक वर्षांची मागणी होती.लोणारी समाजाच्या तरुणांना राज्य सरकारने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून उद्योग व्यवसाय आणि अन्य क्षेत्रात मदतीचा हात दिल्यास या समाजातील तरुण स्वतःच्या पायावर उभा राहून उद्योग जगतात लोणारी समाजाचा नावलौकिक करतील अशी आग्रही मागणी दीपकआबा साळुंखे पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून राज्य सरकारकडे केली होती. लोणारी समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयावर राज्य सरकारने अखेर शिक्कामोर्तब केल्याने लोणारी समाज बांधवात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



लोणारी समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे ही मागणी आम्ही माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्याकडे केली होती. या मागणीसाठी दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी वारंवार राज्य सरकारकडे पाठपुरावा करून आमची मागणी पूर्ण केल्याबद्दल संपूर्ण लोणारी समाज सदैव दीपकआबा साळुंखे-पाटील यांचा ऋणी राहील.

**-पै. सुरेश गवंड,**
उपाध्यक्ष, लोणारी समाज संघटना, सांगोला

# अक्कलकोट शहर होणार 'ओपन' गटारमुक्त

#### आ. सचिन कल्याणशेट्टींचा प्रयत्न; १६८ कोटी ७९ लाख रुपयांच्या भूमिगत गटार योजनेस प्रशासकीय मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि . ५ सप्टेबर**

अक्कलकोट येथे १६८ कोटी ७९ लाख रुपयाच्या भूमिगत गटार प्रकल्प योजनेस प्रशासकीय मान्यता मिळाली असून महाराष्ट्र नगरोत्थान महाभियानात मलनिस्सारण प्रकल्प योजनेस मंजुरी मिळाली आहे. लवकरच या योजनेसाठी निविदा प्रक्रिया अंतिम टप्यात असून लवकरच काम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.

याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेसाठी मंजुरी मिळून निधी मिळावा म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.मोठ्या सार्वजनिक मलनिस्सारण व्यवस्थेत भूमिगत गटाराच्या माध्यमातून जोडलेल्या प्रत्येक घरातून गोळा झालेला सगळा शौच, इतर घाण व सगळे सांडपाणी नलिकांद्वारे गोळा करून मलनिस्सारण प्रकल्पात पाठवले जाते. तेथे त्याच्यावर विविध प्रकारची भौतिक व रासायनिक प्रक्रिया होऊन सगळी घाण गाळून, बाजूला काढून स्वच्छ पाणी तयार केले जाते. त्यामुळे, ते पाणी पिण्याचा व घरगुती वापर सोडून इतर कुठल्याही कामाला वापरले जाऊ शकते, जसे बांधकाम, बागकाम, शेती, गाडी धुणे इत्यादी कामासाठी करता येते.या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे सहकार्य लाभल्याचे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले.

महायुतीचे सरकार आल्यानंतर पुन्हा एकदा विधानसभा क्षेत्रातील विकासाची कामे जलद गतीने सुरू झाली असून अक्कलकोट शहर भुयारी गटार योजनेस शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे अक्कलकोट शहरातील सांडपाणी व्यवस्थापन व स्वच्छतेस अधिक मदत होणार आहे.राज्यातील नागरी भागात मुलभूत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी व त्यांचा दर्जा वाढविण्याकरिता संदर्भाधीन शासन निर्णयाच्या तरतुदीन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत नगरपरिषदेचा मलनिस्सारण प्रकल्पाचा प्रस्ताव राज्यस्तरीय मान्यता समितीकडे होता. यासाठी आ. कल्याणशेट्टी यांचा पाठपुरावा सुरू होता. या प्रकल्पास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत सादर केलेल्या मलनिस्सारण प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. योजनेसाठी १६८ कोटी ७९ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्यात असून लवकरच काम सुरु होणार आहे. तसेच योजनेचे काम वेळेत पूर्ण करून यासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करून कामाची नियमित तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे लवकरच अक्कलकोट शहर स्वच्छ सुंदर होण्यास मदत होणार आहे.

#### ३० वर्षांनंतर लागला मुहूर्त

अक्कलकोट शहराची भूमिगत गटार योजना ही गेल्या ३० वर्षांपासून मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेली आणि पुढील ३० वर्षांसाठी म्हणजेच २०५६ च्या लोकसंख्येसाठी प्रस्तावित केली आहे. सद्यस्थितीत अक्कलकोट शहरात ओपन ड्रेनेज सिस्टीम आहे आणि सांडपाणी गोळा करण्याची व्यवस्था, उपचार आणि विल्हेवाट नाही. उघड्या नाल्यांमुळे अस्वच्छ वातावरण निर्माण होऊन परिसरात दुर्गंधी पसरते. डास आणि कीटकांच्या प्रादुर्भावामुळे गंभीर प्रकारचे साथीचे रोग होऊ शकतात. म्हणून वरील परिस्थिती हाताळण्यासाठी भूमिगत गटार योजना हा सर्वोत्तम उपाय असू शकतो.

#### घाण पाण्यावर होणार प्रक्रिया

नागरिकांच्या भविष्यातील मागणीचा विचार करून सांडपाणी व्यवस्थापनाची पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि सीवरेज सिस्टीमच्या क्षेत्रात दर्जेदार सेवा प्रदान करणे हा प्रकल्पाचा उद्देश ठेवण्यात आला आहे.शहरातील सर्व घन पाणी या मलशुद्धीकरण केंद्राद्वारे प्रक्रिया करून राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या नियमानुसार पर्यावरण पूरक प्रक्रिया केलेले पाणी लगतच्या नाल्यामध्ये सोडण्यात येणार आहे. तसेच प्रक्रिया केलेले पाणी हे शेती व बाग कामासाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे.








# गुरुंची कमतरता पुस्तकेच भरून काढू शकतात : डॉ.मृदुला भाटकर

**● प्रिसिजन वाचन अभियानात लोकशाहीतील न्यायदान व तत्वांचे सांगितले महत्व**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

पुस्तके माणसाचं आयुष्य घडवतात. गुरूंची कमतरता ही पुस्तकेच भरून काढू शकतात असे मत माजी न्यायमूर्ती डॉ.मृदुला भाटकर यांनी प्रिसीजन वाचन अभियानाचे चौथे पान उलगडताना मुलाखतकार मिलिंद कुलकर्णी यांनी घेतलेल्या मुलाखती दरम्यान व्यक्त केले.

प्रारंभी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने कार्यक्रमाची सुरुवात ' लाभले आम्हास भाग्य,बोलतो मराठी' या गीताने झाली. न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी लिहलेल्या 'गेले लिहायचे राहुनी' या पुस्तकाचे अभिवाचन ड.अर्चना कुलकर्णी व प्रा.वैभव कुलकर्णी केल्यानंतर त्यानंतर दोघांचाही सन्मान डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते करण्यात आला. अभिवाचना नंतर प्रकट मुलाखतीवेळी मृदुला भाटकर यांनी विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे देताना 'आठवण ही न संपणारी साठवण असते' या कवितेच्या ओळी वाचून दाखवल्या. मराठी भाषेत घेतलेल्या शिक्षणामुळे ज्ञानार्जन करणारे साहित्य वाचता आले. पुस्तके खऱ्या अर्थाने माणसाचे आयुष्य घडवतात. आयुष्यातील गुरुची कमतरता ही पुस्तकेच भरून काढू शकतात, असे त्यांनी सांगितले. कसाबची अटक व खटला हा लोकशाहीचे जगाला दिलेले मूर्तिमंत उदाहरण आहे. देशातील प्रलंबित खटले सरकारने साधने उपलब्ध करून दिल्यास लवकर निकाली लावता येतील. मात्र असे करताना व्यावसायिक तत्वांचे पालन करावे लागते असे सांगितले. न्यायदानाचे काम करताना थिएटर हे पहिले प्रेम असल्याचे गुपित त्यांनी उलगडले. न्यायदानात पूर्वग्रह व सहानुभूतीचा समतोल साधण्याची कसरत होते. त्यामुळे न्यायदात्यांनी आयुष्य जपून नाही तर भिडून जगावे तरच आयुष्य समृद्ध होते, असेही त्यांनी सूचित केले.

यावेळी त्यांनी अनेक हृदयस्पर्शी किस्से त्यांनी सांगितले. परदेशातील गंध नसलेली अनेक फुले पाहिल्यावर भारतीय मातीत सुवास आहे हे लक्षात आले. लोकशाहीचा भक्कम पाया हा कुटुंबपद्धती हाच आहे. देशात ती रुजवली पाहिजे. पोलिस खात्यात उद्धटपणा व लाच घेण्याचे प्रमाण याचा सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास होतो परंतु हे सांगतानाच त्यांनी मुंबई पोलिसांचे कोरोना, २६/११ घटना , गणपती काळातील कामाचे ही कौतुक केले. नागरिकांनीही कायद्याचे रक्षण करताना सामाजिक भान ठेवले पाहिजे. निर्भया प्रकरणाची बीजे आपणच रोवल्याचे त्यांनी खडसावून सांगितले. न्यायदानात नागरिकांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे, असेही सांगितले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माधव देशपांडे यांनी केले.

### कैलास काटकर यांचा सन्मान

टेंभुर्णी येथील सलून मध्ये वाचनालय उघडणाऱ्या आणि सलूनमध्ये बसून पुस्तके वाचल्यास केस कटिंगसाठी लागणाऱ्या मोबदल्यामध्ये सूट देणाऱ्या कैलास काटकर यांचा सर्व म ान्यवरांच्या हस्ते पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर डॉ.मृदुला भाटकर व मिलिंद कुलकर्णी यांचा डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# राजकीय पक्षांनी नेत्यांसाठी बनवावी आचारसंहिता

**● पत्रकार साहिल जोशी यांची भूमिका : महाराष्ट्राचे राजकारण - 'दशा आणि दिशा' वर रंगल्या गप्पा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ ऑक्टोबर-**

माध्यमांसमोर आक्रस्ताळेपणा करणारे नेते टाळ्या खेचू शकतात. पण मतदार मात्र अशा नेत्यांना नाकारतो हे वारंवार सिद्ध झाले आहे. नेत्यांनी जबाबदारीने बोलावे अशीच माध्यमांची अपेक्षा असते. पण सवंग प्रसिद्धीच्या हव्यासापोटी नेते भान हरपून विधाने करतात. अशा नेत्यांना आवर घालण्याची जबाबदारी माध्यमांची नसून राजकीय पक्षांची आहे. राजकीय पक्षांनी आपल्या नेत्यांसाठी आचारसंहिता बनवावी, अशी ठाम भूमिका सुप्रसिद्ध पत्रकार तथा निवडणूक विश्लेषक साहिल जोशी यांनी मांडली.

सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या शारदोत्सव व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प साहिल जोशी यांनी शनिवारी (दि. ५) गुंफले. सोलापूरचे ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी महाराष्ट्राचे राजकारण - दशा आणि दशा या विषयावर घेतलेल्या प्रकट मुलाखतीत साहिल जोशी यांनी विविध राजकीय पैलूंवर अभ्यासपूर्ण भाष्य केले.निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी पक्ष बदलणे ही भारतीय राजकारणातील नवीन गोष्ट नाही. भूमिका योग्य असेल तर पक्षाविरुद्ध बंड केले तरी मतदार त्या बंडखोर नेत्याच्या



पाठीशी राहतात हे देखील अनेकवेळा पाहायला मिळाले आहे. मात्र पक्ष नेतृत्वाला आव्हान देऊन पक्षावरच दावा सांगितला तर लोकांना ते पटत नाही. लोकसभेच्या निकालांवरून आपल्याला हे दिसून येते, असे साहिल जोशी म्हणाले. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ या तत्वानुसार भाजप आणि उद्धव ठाकरे यांच्यातील भांडणाचा लाभ एकनाथ शिंदे, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांना लोकसभा निवडणुकीत झाला आहे. निवडणूक आयोग किंवा न्यायालय जे निकाल देतात त्यानुसार सामान्य म तदार तांत्रिकदृष्ट्या मत बनवत नाही. त्यामुळे लोकसभेतील म तदानाला भावनेची किनार होती. मात्र विधानसभेला देखील म तदार असाच कौल देतील का याबाबत निश्चित सांगता येणार नाही. भाजपकडे वैचारिकदृष्ट्या बांधील मतदार आहे. काँग्रेसने गेली काही वर्षे तळ्यातमळ्यात भूमिका घेतल्यामुळे त्यांचा असा हक्काचा मतदारवर्ग दुरावला होता. मात्र आता काँग्रेसला पुन्हा सूर गवसल्याची चिन्हे आहेत. याचे श्रेय राहुल गांधींच्या स्पष्ट भूमिकेला जाते. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीत आता काँग्रेस आक्रमक झाली असून ती उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे वर्चस्व मान्य करणार नाही असे संकेत मिळत आहेत.देशातील अनेक राज्यांमध्ये भाजप हा एकमेव हिंदुत्ववादी पक्ष आहे. पण महाराष्ट्रात शिवसेना या प्रादेशिक अस्मिता असणाऱ्या पक्षाने हिंदुत्वाची मोठी जागा व्यापली आहे. त्यामुळे शिवसेनेशिवाय सत्तेची पायरी आपण चढू शकत नाही हे भाजपने ओळखले आहे. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्हींमध्ये मुख्यमंत्री पदावरून अंतर्गत संघर्ष सुरू आहे. विधानसभा निवडणुकीत राज्य पातळीवरचे तसेच स्थानिक मुद्दे असतात. त्यामुळे महाराष्ट्रात मतदानाचा पॅटर्न कसा असेल याची उत्कंठा संपूर्ण देशाला लागलेली आहे, असे साहिल जोशी म्हणाले. यावेळी सिद्धेश्वर बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभिरे, संचालक तुकाराम काळे व राजेश कलशेट्टी, सरव्यवस्थापक राम शर्मा तसेच बँकेचे सभासद, कर्मचारी यांच्यासह विविध नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

### सोशल मीडिया राजकारणाच्या केंद्रस्थानी

प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियापेक्षा सोशल मीडियाचा लोकांशी थेट संबंध आहे. त्यामुळे तो जनमानस प्रभावित करू शकतो. सोशल मीडियाची ही प्रचंड ताकद राजकीय पक्ष आणि नेत्यांनी ओळखली आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्ष, नेते आणि कार्यकर्ते सोशल मीडियाचा मोठा उपयोग करताना दिसतात. नरेटिव्ह सेट करून जनमानस आपल्या बाजूने वळवता येत असल्याने सोशल मीडिया राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे, असे जोशी म्हणाले.

### अंतर्गत सुरक्षेची आव्हाने

सिद्धेश्वर बँकेच्या शारदोत्सव व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प रविवारी निवृत्त पोलिस महासंचालक तथा भारताच्या रॉ या गुप्तचर यंत्रणेचे माजी अधिकारी श्री. जयंत उमराणीकर हे गुंफतील.अंतर्गत सुरक्षेची आव्हाने हा त्यांचा विषय असेल.

# शहरात दरोड्याच्या तयारीतील दोघे जेरबंद; चारजण फरार

**● विजापूर नाका पौलिसांची कामगिरी**
**● संशयितांना पाच दिवस पौलिस कोठडी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोंबर -**

हत्तुरे वस्ती ते पत्रकार भवन या मार्गावर दरोडा टाकण्याच्या तयारी असलेल्या दोघांना विजापूर नाका पोलिसांनी जेरबंद केले आहे.पोलिस पाठलाग करत असताना चारचाकीतील सहापैकी चौघेजण संधी साधून फरार झाले आहेत.विशाल कृष्णप्पा बंडीवडार व अनिल शिवप्पा वड्डुर (दोघेही रा.हनगल,हावेरी कर्नाटक) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

नवरात्र महोत्सवामुळे विजापूर नाका पोलिसांचे वाहन गुरुवारी दुपारी साडेबारा ते एकच्या दरम्यान विजयपूर रोडवरून गस्त घालत होते.त्यावेळी एमएच १२ पासिंग असलेल्या चारचाकीतील व्यक्तींबद्दल पोलिसांना संशय आला.पोलिसांनी पुढे नेलेले वाहन सात रस्त्याच्या दिशेने वळविले आणि त्या चारचाकीतील संशयितांनी वाहनाचा वेग वाढविला.वेगवेगळ्या भागातून संशयितांनी त्यांचे वाहन महावीर चौकामार्गे पत्रकार भवन चौकाच्या दिशेने वळविले. पण,त्यांचा पाठलाग करताना पोलिसांनी त्या चौकात एक डंपर रस्ता दुभाजकाजवळ आडवा लावला होता. संशयितांना आपली गाडी तेथून जाईल,असे वाटले पण त्यांचा अंदाज हुकला. त्यांच्या गाडीची धडक दुभाजकाला व डंपरला बसली.पोलिस मागून येत असल्याने मागे बसलेले चौघे उतरून कंबर तलावाच्या दिशेने पळून गेले.एकाचा पाठलाग करून तर एकाला वाहनातच पोलिसांनी पकडले.संशयित चोरट्यांच्या वाहनाची तपासणी केल्यावर पोलिसांना त्यात लहान-मोठे तीन कटर,कुऱ्हाडी,एक्साब्लेड,स्क्रू ड्रायव्हर, इलेक्ट्रिक कटर मशिन,लोखंडी हातोडा,सहा कापडी मास्क आढळले. चारचाकीसह (एमएच.१२, टीडी २२३८) दरोड्यासाठी आणलेले साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. अटक केलेल्या दोघांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे. सहायक पोलिस निरीक्षक शीतलकुमार गायकवाड तपास करीत आहेत.

**दोघेही रेकॉर्डवरील गुन्हेगार**

कर्नाटकातील विशाल बंडीवडार,अनिल वड्डुर, प्रशांत ऊर्फ परश्या, कृष्णा ऊर्फ कृष्णप्पा बंडीवडार, प्रवीण व अनंत (चौघेही रा. चिनहळ्ळी, कर्नाटक) हे सर्वजण दोन दिवसांपूर्वीच सोलापूर शहरात दरोडा टाकण्याच्या उद्देशाने गावातून निघाले होते. विजापूर नाका पोलिसांनी त्याचा प्लॅन हाणून पाडला असून हत्तुरे वस्तीजवळ संशयितरित्या दोघे फिरत होते. पोलिसांनी त्यांच्याकडे पहाताच त्यांनी तेथून पळ काढत त्यांनी आणलेल्या चारचाकी वाहनाकडे धाव घेतली. पोलिस पाठलाग करत असल्याचे जाणवताच त्यांनी आपले वाहन वेगवेगळ्या मार्गाने नेले. पण, पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून सहापैकी दोघांना अटक केली. विशाल व अनिल हे दोघेही पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर कर्नाटक व इचलकरंजी पोलिस ठाण्यात दरोडा, जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित संशयितांचा शोध सुरु आहे.




CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




मराठी छोट्या कवितांचे पुस्तक
समर्थ ॲडस्
• खरेदीसाठी संपर्क •
9422660190
रडणारे तेव्हाही नव्हतेच आपले
सरणही नव्हते पेटलेले
आयुष्य होतेच विस्कटलेले
मरणानेही चित्र न बदलले
ऑर्डरसाठी स्कॅन करा.
Flipkart वर उपलब्ध



दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# अखेर बाजार समिती निवडणुकीचे बिगुल वाजले

## दिवाळीत फुटणार फटाके; १० नोव्हेंबर रोजी मतदान; राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून निवडणूक कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोंबर-**

महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची बाजार समिती म्हणून ओळख असणाऱ्या श्रीसिद्धेश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीची प्रक्रिया अखेर सुरू होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळत आहे. ऑक्टोंबर महिन्यात अर्ज स्वीकृती तर नोव्हेंबर महिन्यात मतदान असणार आहे. अशी माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून सांगण्यात आली आहे. तसेच रीतसर आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण कार्यालयाचे सचिव अशोक गाडे यांच्या सहीनिशी जारी करण्यात आले आहे

दरम्यान याबाबत सविस्तर निवडणुकीचा कार्यक्रम अधिकृतपणे घोषित करण्यात आला आहे. ७ ते ११ ऑक्टोबर दरम्यान अर्ज स्वीकृती होणार आहे. १० नोव्हेंबरला मतदान तर ११ नोव्हेंबर रोजी मतमोजणी करून निकाल घोषित करण्यात येणार आहे. तत्पूर्वी बाजार समितीमध्ये मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. अर्ज स्वीकृतीनंतर अर्जांची छाननी दि.१४ व १५ ऑक्टोंबर रोजी करण्यात येऊन वैध अर्ज नोटीस बोर्ड लावण्यात येणार आहेत. त्यानंतर दी.१५ ते २९ ऑक्टोंबर पर्यंत अर्ज मागे घेण्याचे मुदत देण्यात आली आहे. तदनंतर दि.३० ऑक्टोंबर रोजी अंतिम उमेदवार यादी जाहीर करून चिन्ह वाटप कार्यक्रम निवडणूक कार्यालय येथे करण्यात येणार आहेत. त्यांचे प्रसिद्धीकरण बाजार समितीमध्ये असणाऱ्या नोटीस बोर्डवर करण्यात येईल.

शेवटी दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विविध मतदान केंद्रावर मतदान संपन्न होणार आहे. मतदान केंद्रांची यादी निवडणूक कार्यालयाकडून नंतर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीस सुरुवात होणार असून त्याचे ठिकाण देखील नंतर कळवण्यात येणार आहे. मतमोजणी संपल्यानंतर रात्री उशिरा निकाल घोषित करण्यात येणार आहे. दरम्यान या निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांची मुख्य निवडणूक कार्यकारी अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे. गायकवाड यांच्या देखरेखीखाली सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया संपन्न होणार आहे.

### उपनिबंधकांकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही

सोलापूर बाजार समितीचे निवडणूक कार्यक्रम जाहीर झाले आहे. याबाबत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून रीतसर सूचना व आदेश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार आगामी निवडणुकीची कार्यवाही केली जाईल.

**- मोहन निंबाळकर,** प्रशासक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती.

### इच्छुकांची भाऊगर्दी

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी दक्षिण मतदारसंघातून विद्यमान आमदार सुभाष देशमुख, माजी आमदार दिलीप माने, श्री सिद्धेश्वर परिवाराचे धर्मराज काडादी, सुरेश हसापुरे,. अशा अनेकांनी इच्छा व्यक्त करत, आगामी विधानसभेची तयारी सुरू केली असल्याने यंदा बाजार समितीवर कोणाचे वर्चस्व राहील हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

बाजार समिती निवडणुकीत तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार दिला होता. त्यामुळे ती निवडणूक चांगलीच गाजली. तरीही त्यावेळी सुभाष देशमुख यांच्या पॅनलचा पराभव झाला होता. आता या निवडणुकीत सुभाष देशमुख आणि विजय देशमुख यांची भूमिका काय असणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. कोण कोणाच्या पॅनलमध्ये असणार याची उत्सुकता असल्याने यंदा बाजार समिती निवडणुकीत रंगत असणार आहे.

दरम्यान सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर सध्या भाजपचे आमदार विजय देशमुख यांच्या गटाचे वर्चस्व आहे. तत्कालीन सभापती दिलीप माने आणि सुरेश हसापुरे यांनी भाजप काँग्रेस असा सुवर्णमध्ये साधून सभापती भाजपचा आणि सदस्य काँग्रेसचे अशा पद्धतीने आपली सत्ता बाजार समितीवर आणली. तत्पूर्वी आमदार विजय देशमुख यांना सलग तीनदा संचालक मंडळाची आणि सभापती पदाची मुदत वाढ मिळाली होती. अखेर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून याबाबत सविस्तर कार्यक्रम हे त्या दोन दिवसात जाहीर होणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# आर्थिक व्यवहारातून युवकाचा खून

## मटका व्यवसायातील धुसफूस; अवैध धंद्यांचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

आर्थिक व्यवहारातून काठ्या, लोखंडी रॉड व कोयत्याने हल्ला करून तरुणाचा खून करण्यात आल्याची घटना शुक्रवार ते शनिवारमध्यरात्री दरम्यान घडली. परंतु ही घटना मटका व्यवसायातील दोघांच्या अंतर्गत धुसफुसीतून घडल्याची चर्चा परिसरात आहे. या घटनेमुळे शहरातील अवैध धंद्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



या गुन्ह्यातील एका आरोपीवर शहर पोलिसांनी तडीपारीची कारवाई केली होती. अथर्व दिनेश जाधव (वय १९, रा. सरस्वती बिल्डींग, अमृत नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर प्रसाद लोंढे, बाळू काळे, सागर कदम, केदार गुमटे, मनोज सूर्यराव उर्फ भाईजी, अजिंक्य शाबादे, प्रकाश शिंदे उर्फ बुध्दा, जॉकी थोरात व विनायक राऊत अशी मारहाण करणाऱ्यांची नावे आहेत. अथर्व हा विजापूर नाका परिसरात मटका चालविणाऱ्या बुकीकडे मटका घेण्याचे काम करत होता, अशी चर्चा सिव्हील हॉस्पीटलमध्ये आलेल्या नागरिकांमध्ये होती. दरम्यान, आरोपी आणि मटका बुकी चालविणाऱ्यांमध्ये काही महिन्यांपासून अंतर्गत धुसफूस सुरू होती. या दोघांमध्ये मध्यस्थी करणाऱ्यांनाही दरम्यानच्या काळात मारहाण झाल्याचे समजते. दरम्यान घटनेच्या दिवशी यातील आरोपी तीन वेगवेगळ्या चार चाकी वाहनातून काठ्या, लोखंडी रॉड व कोयता घेऊन आले. त्यांनी शुक्रवारी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास अथर्व यास इंडियन मॉडेल शाळेच्या पाठीमागील रेणुका नगर येथील मोकळ्या जागेतील एका पत्र्याच्या शेडमध्ये नेऊन लाकडी काठ्या, लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण केली. या मारहाणीत अथर्व गंभीर जखमी झाला. अथर्वचे मित्र प्रदिप मंगळवेढेकर, शिवकुमार तंबाखे, राहुल साठे, समर्थ माटे यांनाही मारहाण करण्यात आली. दरम्यान, जखमी अवस्थेतच अथर्वला नातेवाईकांनी खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. परंतु शनिवारी उपचारा दरम्यान अथर्वचा मृत्यू झाला. याप्रकरणी दिनेश प्रकाश जाधव (वय ५०) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून दाखल गुन्ह्याचा तपास विजापूर नाका पोलीस करीत आहेत.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### सोने चोरल्याच्या कारणावरून काठीने मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

सोने चोरल्याच्या कारणावरून काठीने तरुणास मारहाण केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३ ऑक्टोंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पाटील वाडा हॅटेल दहिटणे येथे घडली. याप्रकरणी शेखर श्रीमंत शेटे (वय-२१,रा.दहिटणे मित्र नगर, शेळगी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून गुरुशांत बंकलगी व त्याचे दोन मित्र (रा.दहिटणे मित्र नगर,शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. गुरुशांत बंकलगी हा फिर्यादी शेखर शेटे याचा भाडेकरी आहे. त्यावेळी फिर्यादी शेखर हा घरात झोपलेला असताना गुरुशांत याने फोन करून फिर्यादीस वरील ठिकाणी ये म्हणून सांगितले असता, त्यावेळी फिर्यादी तेथे गेला असता वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादीस जखमी केले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वाघमारे हे करीत आहेत.

### पोलिसात दिलेली फिर्याद मागे घेण्यावरून मारहाण

**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

पोलिसात दिलेली फिर्याद मागे घे असे म्हणून शिवीगाळ करून हाताने मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. के एस ॲस्टर बिल्डिंग भवानी पेठ येथे घडली. याप्रकरणी प्रशांत जगन्नाथ सिंदगी (वय-४६,रा.के एस ॲस्टर बिल्डिंग,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सोमनाथ परमेश्वर चारे (रा.शेळगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी घरी असताना वरील संशयित आरोपी या नेत्यांच्याविरुद्ध मागील फिर्यादीचा राग मनात धरून फिर्यादीच्या घरात घुसून माझ्याविरुद्ध दिलेली फिर्याद मागे घे असे म्हणत मारहाण केली.

# एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचा पुरस्कार राजा माने यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार संपादक, माध्यम तज्ज्ञ व राजकीय विश्लेषक तसेच डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांना एमआयटी विद्यापीठ व समुहाचे संस्थापक डॉ.विश्वनाथ कराड यांच्या हस्ते बहाल करण्यात आला.

लोणी काळभोर येथील जगातील सर्वात उंच म्हणून नोंद झालेल्या शांती घुमटात हा शानदार सोहळा पार पडला. विज्ञान, तत्त्वज्ञान आणि आध्यात्म विश्वशांती चळवळीतील दहाव्या जागतिक विश्र्वशांती अधिवेशनाच्या दुसरा दिवसाच्या सत्रात हा सोहळा संयोजक डॉ. विश्वनाथ कराड आणि भारतीय महासंगणकाचे जनक शास्त्रज्ञ डॉ.विजय भटकर यांनी आयोजिला होता. गेल्या चाळीस वर्षांत राजा माने यांनी समर्पित भावनेने पत्रकारितेत केलेल्या सेवेचा गौरव करण्यात आला.यावेळी डॉ.कराड यांनी आपल्या भाषणात विश्र्वशांती चळवळीची महती विषद केली. या चळवळीतील पत्रकारांच्या सहभागाची गरज त्यांनी स्पष्ट केली.



# वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचा उद्या समारोप

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोंबर -**

हिंदू वीरशैव लिंगायत मंचच्या वतीने काढण्यात आलेल्या वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचा समारोप सोमवार दि. ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता शक्ति स्थळ, श्री काशी विश्वेश्वर सांस्कृतिक मैदान, मंगळवेढा येथे संकल्प सभेने होणार आहे, अशी माहिती गजानन धरणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध प्रश्नांना घेऊन खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या माध्यमातून भक्ती स्थळ ,राजूर, जिल्हा लातूर ते शक्ति स्थळ मंगळवेढापर्यंत ही सन्मान यात्रा काढण्यात आली. २२ जिल्ह्यातील ६८ तालुक्यामधून समस्या जाणून घेत ही यात्रा पूर्ण करण्यात आली आहे. यावेळी संकल्प सभा होणार असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. यावेळी डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य स्वामीजी, डॉ. गहिनीनाथ महाराज औसेकर आणि विविध मठांचे शिवाचार्य यावेळी उपस्थित राहणार आहेत. खा. डॉ. अजित गोपछडे, आ.विनय कोरे, आ. सचिन कल्याणशेट्टी, श्री सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, आ. समाधान आवताडे, आ. विजयकुमार देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी श्रीशैल हत्तुरे, ॲड. मल्लिनाथ शाहाबाद, राहुल पावले, चिदानंद मुस्तारे उपस्थित होते.

# आम्ही कृषी कन्या... शिवार अन् बांधावरच्या राजकन्या

## शेतीमध्ये महिलांना शासनाचे मोठे प्रोत्साहन; अनुदानासह प्रशिक्षण, अभ्यास दौऱ्यांची सोय

***शेतकरी हा ग्रामव्यवस्था आणि समाजरचनेचा कणा आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही देखील शेती उद्योगाशी निगडित आहे. जगाचा पोशिंदा म्हणून आपण शेतकऱ्याकडे पाहतो, तर आता पोशिंदाच्या खांद्याला खांदा लावून महिला शेती व्यवसायात प्रगत शेती करत आहेत तर शासनाने महिलांना शेती व्यवसायात आणण्यासाठी अनेक प्रोत्साहनात्मक योजना अंमलात आणल्या. कृषी विषयक वेगवेगळ्या योजनांमध्ये ३० टक्के महिलांचा सहभाग घेतला जात आहे. महिलांना जादा अनुदान रक्कम दिली जाते. शेती, शाळा, प्रशिक्षण, अभ्यास दौरे आत्मा योजनेंतर्गत शेतकरी गटामध्ये ५० टक्के महिला गटाचे उद्दिष्ट आहे. एकूणच शासन शेतीमध्ये महिलांना मोठे प्रोत्साहन देत आहे.***

### कृषी क्षेत्र महिलाही गाजवू शकतात



कृषी क्षेत्र फक्त पुरुषांचे आहे किंवा या क्षेत्रात पुरुषच काम करु शकतात असे काही नाही. आपल्या बुद्धीच्या बळावर, स्पर्धा परीक्षा देऊन कृषी क्षेत्रात महिला अधिकारी खूप आहेत. या क्षेत्रात आल्याचा मला खूप आनंद आहे. आपण कुणाच्या तरी उपयोगी पडू शकतो. आपल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणता येते. हे सर्व या पदावर कार्यरत असल्यामुळे शक्य आहे. आजपर्यंतच्या कामामध्ये मला कधीच शेतकऱ्यांकडून त्रास झाला नाही. याला माझी कार्यपद्धती किंवा शेतकऱ्यांनी स्त्री अधिकारी म्हणून दिलेला ठेवा असेल. क्षेत्र कुठलेही असो आव्हाने येत असतात. चॅलेंज स्वीकारावीत. घर, कुटुंब साभांळून समाजासाठी योगदान दिले पाहिजे. नोकरी करत असताना सन २०११ मध्ये आर्ट ऑफ लिव्हिंगचे शिबीर मी केले. ते मला इतके भावले की, २०१५ पासून ते आजतागायत मी माझे सर्व काम साभांळून समाजासाठी सेवा देण्याचे काम करते. जालना, उस्मानाबाद, परांडा अशा अनेक ठिकाणी हॅप्पीनेस प्रोग्राम राबविले. आता त्यांचे सोलापुरातदेखील सेंटर आहे.

**- मनिषा मिसाळ-जाधव**
**तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर**

### शेतकऱ्यांशी शेतीची नाळ जोडली



आम्हाला कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचण्याचे भाग्य लाभले. B.S.C ॲग्रीकल्चर शिक्षण घेऊन मी कृषी विभागात रुजू झाले. उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्वात मोठ्या नान्नज गावी कृषी सहाय्यक म्हणून कामावर रुजू झाले. तीन वर्षांच्या काळात शेतकऱ्यांशी शेतीची नाळ जोडली. अनेक मैत्रिणी मिळाल्या. शासनाच्या अनेक योजना राबवल्या. शेततळे, फळबाग लागवड योजना, कृषी यांत्रिकीकरण, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, सिमेंट नालाबांध, नाला खोलीकरण, कंपार्टमेंट बंडिंग, महिला बचत गट, वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना मिळवून दिल्या. तीन वर्षानंतर बार्शी तालुक्यात मळेगाव येथे बदली झाली. जलयुक्त शिवार स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. या गावातील शेतकऱ्यांनी उपलब्ध पाणी, जमिनीची प्रत, बाजारभाव पाहून पिके घेत आहेत. यामध्ये महिलाचा मोठा सहभाग आहे. जागतिक पातळीवर द्राक्ष पिकाचा लौकिक असलेल्या नान्नज तर जलयुक्त शिवारामध्ये राज्यात एक नंबरवर असलेल्या मळेगाव येथे नोकरी करण्याची सोनेरी संधी मिळत आहे. एका शेतकऱ्यांची मी कृषीकन्या आज काळ्या आईच्या कुशीतील राजकन्या असल्याचा आनंद हा सोन्यापेक्षा माझ्यासह या क्षेत्रात काम करणाऱ्या कृषी सहाय्यक महिलांना मौल्यवान आहे.

**- प्रतिभा जाधवर,**
**कृषी सहाय्यक, मळेगाव, ता. बार्शी**

### स्कुटर ते ट्रॅक्टरचा संघर्षमय प्रवास



समिना यांची अंत्यत हालाखीची परिस्थिती. आई व चार भावंडांचा समिनाचा परिवार मुंबईच्या चाळीत राहत होता. वडिलांचे छत्र हरवल्यामुळे त्यांना सातवीतच शाळा सोडून मजुरी करावी लागली. समिना वयात आल्यावर त्यांचा विवाह व्यवसायाने ड्रायव्हर असलेल्या मुराद मुलाणी यांच्याशी झाला. ज्या मुलीला कोथिंबीर कशी उगवते हे माहित नव्हते, त्या समिना मुंबईतून सोलापुरातील बार्शी तालुक्यातील सुर्डी गावापासून तीन किमी असणाऱ्या त्यांच्या शेतात पोहचल्या. सासरची आर्थिक परिस्थिती तशी बेताची. आयुष्याला झुंज देत वेगवेगळे आव्हान त्यांनी स्वीकारले. सुरूवातीला कोंबड्या, शेळी घेतली आणि उत्पन्न वाढविण्याचा प्रयल केला. गावात उमेद एसव्हीईपी कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या महिला उद्योजकता प्रशिक्षणात समिनासुध्दा सहभागी झाली. इथेच तिला विकासाची वाट गवसली. त्यांनी कटलरीचा व्यवसाय करायचे ठरवले. यासाठी गटातून पाच हजार रुपये कर्ज घेतले. गावात असलेल्या तिच्या जुन्या पडक्या घरातच दुकान सुरु केले. समिनाच्या तक्षात आत की व्यवसाय वाढवायचा असेल तर आठवडी बाजार गाठले पाहिजे. जमलेल्या पैशातून तिने लुना विकत घेऊन स्वतः लुना शिकली. परिसरातील सर्व आठवडी बाजार आता ती करु लागली. घरात चार पैशाची आवक वाढली. त्यातून त्यांनी २००७ मध्ये टॅम्पो घेतला. गावात महिलांनी टॅम्पो चालविणे हे पुरुषांना न पटण्यासारखीच गोष्ट असल्याने त्यांच्यावर लोक टिकाटिप्पणी करु लागले. समिनाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. आता त्यांनी त्यांच्या शेतात द्राक्ष, गहू, ज्वारी, हरभरा आदी पीक घेतात व स्वतः शेतामध्ये ट्रॅक्टर चालवतात.

**-समिना मुलाणी, शेतकरी, सुर्डी, ता. बार्शी**



## ओळख नारीशक्तीची

**आरती कुसेकर**

**आजचा रंग : केशरी**

### महिला झाल्या स्वावलंबी



माझे नाव महानंदा शिंदे. (रा. हगलूर तालुका उत्तर सोलापूर) स्वयं शिक्षण प्रयोग या संस्थेत गेल्या २२ वर्षांपासून मी काम करत आहे. सुरुवातीला मी फेडरेशनची अध्यक्षा होते. आता या संस्थेत लीडर म्हणून काम करत आहे. सध्या सोलापुरातील १५ गावांतील प्रत्येकी १०० महिला शेतकऱ्यांना जैविक शेतीचे प्रशिक्षण देणे, त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे देण्याचे काम झाले. १९९३ संस्थेची स्थापना झाली असून सध्या पाच लाखांपेक्षा अधिक महिला या संस्थेत काम करत आहेत. उस्मानाबाद, लातूर, वाशिम, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ आदी विविध तालुक्यांमधील महिलांचा सहभाग आहे. जैविक शेतीमधून महिला शेतकरी महिन्याला ३० ते ५० हजारांपर्यंत कमवत आहेत. माझ्या कामाची सुरुवात बचतगटाच्या माध्यमातून झाली. सुरुवातील या कामासाठी घरच्यांचा विरोध होता. घरच्यांना समजून सांगितल्यावर त्यांनी होकार दिला आणि बचतगटाकडून दहा हजार कर्ज घेतले. त्यातून दूध व्यवसाय सुरु केला आणि त्यातून धाडस आणि काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द निर्माण झाली. २०२१ साली भरारी सखी प्रोड्युसर कंपनीची सुरुवात केली. कंपनीच्या सर्व पदांवर महिलांच आहेत. यातून विविध उत्पादने बनवली जात आहेत. सध्या सोलापुरातील १,५०० ग्राहकांना होम डिलिव्हरी देण्यात येत आहे. या सर्व कार्यात अश्विनी कोरके, वैशाली वाले, शामल गुरव, मंगल धुमाळ, कल्पना माने यांचे सहकार्य मिळत आहे.

**- महानंदा शिंदे.**
**हगलूर ता. उत्तर सोलापूर**

### ज्वारीपासून बनवतात रवा, केक, कुकीज, पिझ्झा



गृहविज्ञान शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथे २००५ पासून कार्यरत आहे. माझे शिक्षण श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील कॉलेज ऑफ होम सायन्स, अकलूज येथून झाले. B.H.Sc, M.Sc. अन्न प्रक्रिया आणि चिकाटीमध्ये पूर्ण केले. आयसीआर, नवी दिल्ली, कृषी सरकार मंत्रालयात गेल्या १९ वर्षांपासून गृहशास्त्रज्ञ म्हणून काम करत आहेत. लहानपणापासून ग्रामीण भागाची आवड होती. मात्र या क्षेत्रातच आपले करिअर घडेल आणि आपल्याला ग्रामीण भागातील महिलांसाठी कार्य करण्याची संधी मिळेल असे कधीच वाटले नव्हते. ग्राउंडनट डेकोर्टिकेटर, सायकल-हो, स्पायरल सेपरेटर, हँड ग्लॉस यासारख्या सुधारित शेतीच्या साधनांचा आणि अवजारांचा प्रचार केला. जेणेकरून कष्ट कमी होईल आणि शेतातील महिलांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. पिके-फळांचे प्रोसेसिंग करुन त्यातून उद्योजक निर्माण करण्याचे कामदेखील सुरु आहे. गावपातळीवर आतापर्यंत ३५० ते ४०० महिला कृषीपूरक प्रक्रिया उद्योगामध्ये सक्षम बनल्या आहेत. कृषी विज्ञान केंद्रातंर्गत उत्तर, दक्षिण, अक्कलकोट, मंगळवेढा, बार्शी या पाच तालुक्यांमध्ये महिलांना कार्यशाळेच्या माध्यमातून मार्गदर्शन करत आहे. दरमहा ३० टक्के महिलांना महिन्याला ३० ते ४० हजारांचे उत्पन्न मिळते. २००९ मध्ये प्रथमच महाराष्ट्र राज्यात ज्वारीचा रवा, ज्वारीचा केक, कुकीज आणि ज्वारीचा पिझ्झा बेस सादर केला. नवी दिल्ली, ICR, IIMR, हैदराबाद येथे २०१६ साठी महाराष्ट्र राज्याकडून सर्वोत्कृष्ट एसएचजीच्या श्रेणीतील बाजरी प्रक्रियेसाठी त्यांनी योगदान दिले. २०१३ मध्ये महिला प्रदर्शनादरम्यान खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते ज्वारीच्या मूल्यवर्धित उत्पादनांसाठी सर्वोत्कृष्ट स्टॉल पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

**- अनिता शेळके, गृहशास्त्रज्ञ,**
**कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९०६

**सुख पाहतां जवापाडें ।**
**दु:ख पर्वता एवढें ।।**

सुख मिळावे म्हणून माणूस अहोरात्र धडपड करीत असतो. प्रत्येक क्षणाला सुख मिळावे म्हणून धडपडणाऱ्या माणसाला सुख मिळेलच असे नाही. त्याचबरोबर मिळालेल्या सुखात तो समाधानी असेल असेही नाही. खूप कष्ट करावीत तेंव्हा थोडे-फार सुख पदरी येते. डोंगर पोखरुन उंदीर काढल्यासारखा अनेकांना सुखाचा अनुभव येतो. पण काहींना कसल्याही प्रकारचे कष्ट न करता परंपरेने, योगायोगाने सुख प्राप्ती होते. ज्यांना स्वकष्टाविना सुखाची प्राप्ती होते, त्यांना त्या सुखाचे विशेष महत्व वाटत नाही. कष्टाअंती किंवा दु:खाचा सामना करुन प्राप्त झालेल्या सुखाची महती कांही वेगळीच असते. संसारात अडकलेल्या या जीवाला शारीरिक दु:खाबरोबर अनेक मानसिक दु:खांना सामोरे जावे लागते.



विशेष म्हणजे शारीरिक दु:खावर औषध सहजासहजी उपलब्ध होते. पण मानसिक दु:खावर मात्र सहजरित्या औषध उपलब्ध होत नाही. मानसिक प्रवृत्ती हीच मुळात मानसिक दु:खाला कारणीभूत असते. ही प्रवृत्तीच सुख-दु:खाची आपआपल्या परीने परिभाषा करीत असते. कशात सुख मानायचे व कशात दु:ख मानायचे हे मानवी प्रवृत्तीच ठरवित असते. मी च्या गुर्मीत माणूस सुखी असल्याचे भासवित असला तरीही खऱ्या अर्थाने या माया, मोह, मत्सर, अहंकार, ईर्षा, द्वेष आदिने भरलेल्या संसारात सुख अत्यंत अल्प व दु:ख खूप आहे. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, सुख पाहता जवापाडें । दु:ख पर्वता एवढें ।। इंद्रियांचे चोचले पुरविण्यात सुख मानणाऱ्या मानवाला शाश्वत व नाशवंत सुखातील फरक सहजासहजी लक्षात येत नाही. इंद्रियाधिनता मानवाला इंद्रियांचे लाड पुरविण्यात सुख मानायला लावते. इंद्रियांची इच्छा पूर्ण झाली नाही किंवा विषय साध्य झाले नाहीत तर माणूस दु:खी होतो. मूळात इंद्रियाधिन झालेला माणूस सुख व दु:ख म्हणजे नेमके काय? हे जाणू शकला नाही, असे जगदगुरु तुकोबारायांचे म्हणणे आहे. ज्याला खऱ्या सुख-दु:खाची व्याख्या समजते, तो माया, मोह, स्वार्थ, मीपणात अडकत नाही. आपण कोण आहोत? आपण काय करायला हवे? याचा जो शोध घेतो, तो खऱ्या सुख-दु:खाची परिभाषा जाणतो. एके दिवशी नाश पावणाऱ्या या देहाला मी समजणाऱ्या मानवाला सुख-दु:खाची खरी परिभाषा कळू शकत नाही. हा संसार माया, मोह, मत्सराने भरुन उरला आहे. मानवी जीवनाच्या शत्रुने भरलेल्या संसारात सुख अत्यंत अल्प आहे. दु:ख मात्र पावलो-पावली पर्वताप्रमाणे उभे आहे. इंद्रियांच्या इच्छा पूर्ती करण्यात माणूस जे सुख मानतो, ते खऱ्या अर्थाने दु:ख आहे. मान-अवमान, मी-तो, लहान-मोठा हे सर्व भेद दु:खाचे खरे मूळ आहेत. या मूळांना नष्ट करायचे असेल व खऱ्या सुख-दु:खाची परिभाषा जाणायची असेल तर संतांची वचने मानायला हवीत. त्यांनी केलेली कार्य, सांगितलेले मार्ग आठवण करुन त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करायला हवा. संतांच्या वचनांची आठवण ठेवून वागणाऱ्याच्या वाट्याला मी, अहंकार, मत्सर, द्वेष, आदी येत नाहीत. अर्थात, दु:खाचे मूळ असणारे हे वाट्याला येत नसल्याने दु:ख वाट्याला येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तुकाराम महाराजांनी माझे ऐका असे न म्हणता संतांची वचने ऐका व माना असे म्हटले आहे. यातून त्यांच्या मनाचा मोठेपणा आपल्या लक्षात यायला हवा. महाराजांचे बोल हे तुम्हा आम्हा सर्वांच्या जीवनात सुख वाढावे हे सांगण्यासाठीचे आहेत. चुकीच्या मार्गाने सुखाच्या मागे न लागता नीतीनियमाला धरुन सन्मार्गाने सुखाचा शोध व आनंद घ्यायला हवा, हे आपण लक्षात ठेवून वागलो तर निश्चितच सुखाची कमतरता पडेल असे वाटत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | सूर्यास्त - १८.२१ |
| दि. ६ ऑक्टोबर २०२४ | दिनविशेष - |
| विक्रम संवत् २०८०, | विनायक चतुर्थी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - अश्विन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. तृतीया (७.४९) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - विशाखा (२४.१०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - प्रीति (अहोरात्र) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२०.५०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| सुर्योदय - ०६.३२ | |

### राशीभविष्य

**मेष** : बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील.

**वृषभ** : विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**मिथुन** : काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता.

**कर्क** : स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह** : लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे.

**कन्या** : चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता.

**तुळ** : मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक** : राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा.

**धनु** : आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो.

**मकर** :जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो.

**कुंभ** : आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल.

**मीन**: दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ शक्यता. जमिनीचे वाद मिटतील.

# दूध अनुदानाचे १४ कोटी खात्यावर जमा

**प्रत्यक्षात १६ हजार दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळाला लाभ**

## उर्वरित तीन महिन्यांची रक्कम अदा करण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑक्टोंबर-**

राज्य शासनाने गायीच्या प्रति लिटर दुधाला जुलै ते सप्टेंबर या कालावधीसाठी पाच रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. मागील तीन महिन्यांच्या दूध अनुदानापोटी जिल्ह्यातील १६ हजार आठ शेतकऱ्यांच्या खात्यावर १४ कोटी ४३ लाख २९ हजार ८१५ रुपयांचे अनुदान जमा झाल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सरकारने लागलीच हा निर्णय घेतला असल्याने याचा फायदा सरकारला होणार आहे.

राज्यातील सर्व पशुपालकांना दूध अनुदानाचा लाभ मिळावा, यासाठी सरकारने लहान दूध प्रकल्पांसह मोठ्या दूध संघाच्या चिलिंग सेंटरला लॉगीन आयडी दिला आहे. त्यामुळे राज्यातील जवळपास सर्वच पशुपालकांना दूध अनुदानाची रक्कम जमा होत आहे. त्यामुळे पशुपालकांतून समाधान व्यक्त केले जात आहे. दूध अनुदानासाठी जिल्ह्यातील १०७ दूध संस्थांनी सहभाग नोंदविला होता. त्यातील बऱ्याच संस्थेत दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये दूध अनुदानाची रक्कम जमा झाली आहे. हजारो पशुपालकांच्या अर्जामध्ये बँक स्टेटमेंट, आधार प्रमाणीकरण, दूध फॅट व्यवस्थित न येणे, टॅगिंग न करणे, अशा त्रुटी असल्याने अद्यापही हजारो पशुपालक दूध अनुदानापासून वंचित राहिले आहेत.

त्या शेतकऱ्यांच्या कागदपत्रांतील त्रुटी दूर करून दूध संस्थाचालक दूध अनुदानासाठी अर्ज करत आहेत. ऑक्टोबरपासून दूध अनुदान सात रुपये केले आहे. मात्र दूध संस्थांनी ३.५ फॅट व ८.५ एस.एन.एफ या गुणप्रतीच्या दुधाचा भाव प्रति लिटर २ रुपयांनी कमी केला आहे. त्यामुळे या गुणप्रतीच्या दुधाला शेतकऱ्यांना २८ रुपये मिळणार आहेत.

दरम्यान दूध अनुदानात वाढ करून दुधाच्या खरेदी दरात कपात करण्याचा सरकारने घेतलेला निर्णय राज्यातील दूध उत्पादकांना पटलेला नाही. दूध खरेदी दर ३० रुपये ठेऊन दूध उत्पादकांना प्रति लिटर सात रुपये अनुदान द्यायला हवे होते, पण सरकारने अनुदान देताना दर मात्र कमी केले आहेत. अशी खंत व्यक्त केली जात आहे.

### आगामी विधानसभेची निवडणूक लक्षात घेता अनुदान जमा

तीन महिन्यांची रक्कम जमा गायीच्या दुधाचे दर पडल्याने शासनाने पाच रुपये अनुदान सुरू केले आहे. जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांचे दूध अनुदान रखडले होते; मात्र आगामी विधानसभेची निवडणूक लक्षात घेता शासनाने पशुपालकांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम भरण्यास सुरुवात केली आहे. तरीही जिल्ह्यात अनेक दूध उत्पादक शेतकरी या अनुदानापासून वंचित आहे. त्यांनाही अनुदान देण्याची गरज आहे. त्यांनी दूध घालूनही त्यांना अनुदान मिळत नसेल, तर ते योग्य होणार नसल्याच्या प्रतिक्रिया दूध उत्पादकांनी दिल्या आहेत.

### आचारसंहितेपूर्वी दूध अनुदानाची रक्कम खात्यावर जमा व्हावी

जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांची माहिती आम्ही भरली आहे. मात्र अद्यापही आम्हाला दुधाचे अनुदान मिळाले नाही. ऑक्टोबरपासून अनुदानात दोन रुपयांची वाढ केली खरी, पण दुधाच्या खरेदी दरात दोन रुपयांची कपात केली आहे. त्यामुळे त्याचा फारसा फरक पडणार नाही. आचारसंहितेपूर्वी दूध अनुदानाची रक्कम खात्यावर जमा व्हावी.

**- संतोष दहीहांडे, दूध उत्पादक**



## किर्लोस्कर कंपनीकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या प्रयत्नांतून किर्लोस्कर कंपनीकडून शालेय विद्यार्थ्यांना वह्या, शालेय दप्तर, कंपास पेटी आदी शालेय साहित्य देण्यात आले.

यावेळी किर्लोस्कर कंपनीचे व्यवस्थापक अमित राठोड, ऋषीकेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी, कन्नड, व, उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व मान्यवरांच्या हस्ते वह्या, शालेय दप्तर, कंपास पेटी वाटप करण्यात आले. मराठी शाळेच्या शिक्षिकर हाजराबी बागवान यांनी आभार मानले. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे पदवीधर शिक्षक दिनकर भारती यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगरचे हणमंतराव गुंडरगी, मल्लिनाथ चनपटणे, अनिता काटकर, हाजराबी बागवान, संध्या बशेट्टी, दिनकर भारती उपस्थित होते.

## राज्यातील ग्रंथालये समृद्ध होतील : डॉ. येळेगावकर

**मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने हिराचंद नेमचंद वाचनालयात आनंदोत्सव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील १२ हजार सार्वजनिक ग्रंथालये, समृद्ध आणि अद्यावत होण्यास मदत होईल, असे सांगून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात मराठी विभाग आहे, पण त्या विभागात एकही कायम स्वरूपी नियमित प्राध्यापक नाहीत ते सर्व कंत्राटी तत्त्वावर नेमले जातात महाविद्यालयाच्या पातळीवरही सेवानिवृत्तीनंतर त्या रिक्त जागेवर शासनाकडून नियमित आणि कायम प्राध्यापक भरण्यास वर्षानुवर्षे परवानगी दिली जात नाही. आहेत तेही कंत्राटी तत्त्वावर नेमले जातात, असे मत हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले.



केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याची घोषणा केल्यानंतर सोलापुरातील श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयात आनंदोत्सव साजरा करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. येळेगावकर, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत कामतकर, कार्यवाह दत्ता गायकवाड, महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, वाचनालयाचे कार्यकारिणी सदस्य नरसिंग मेंगजी, नितीन वैद्य, प्रा. पुष्पा आगरकर, प्रा. सुलभा पिशवीकर या मान्यवरांच्या उपस्थितीत ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला तसेच लीळाचरित्र आणि ज्ञानेश्वरी या प्राचीन मराठी ग्रंथाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर मसाप सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुतिश्री वडगबाळकर, दत्ता गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास उद्योजक दत्ता अण्णा सुरवसे, ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने, मोहन सोहनी, फैयाज शेख, डॉ. नरेंद्र काटीकर, वसंत सावंत उपस्थित होते.

## वृध्दाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

शहरातील विजय नगरात राहणाऱ्या वृध्दाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

विष्णु तुकाराम बत्तुल (वय ५३, रा. विजय नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. ३ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी जिन्याच्या टॉवरच्या पत्र्याच्या लोखंडी अँगलला विष्णु बत्तुल यांनी नॉयलॉन दोरीने गळफास घेतल्याचे नातेवाईकांना दिसून आले. त्यामुळे त्यांनी याबाबत जेलरोड पोलिसांना कळविले असता हवालदार बी बी घुगे यांनी घटनास्थळी येऊन बत्तुल यांना खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, बत्तुल यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. ओंकार तलकोकुल यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## जिल्हा न्यायालय परिसरात स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा न्यायालय परिसरात न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी स्वच्छ केला.

स्वच्छता पंधरवड्याअंतर्गत जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. या मोहिमेत सर्व न्यायिक अधिकारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी व सर्व कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, विधीज्ञ संघ, महाराष्ट्र सुरक्षा बल यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. स्वच्छता पंधरवड्याच्या कालावधीत न्यायालयाचा आतील व परिसरातील संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रमुख जिल्हा न्यायाधीश मोहम्मद सलमान आजमी यांनी उपस्थितांना स्वच्छतेचे महत्व सांगून उपक्रमात सहभागी झालेले सर्व आस्थापना प्रमुख यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला. याप्रसंगी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, जिल्हा न्यायाधीश योगेश राणे, पी.एस. खुणे उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा न्यायालयातील आवारात मान्यवरांचा हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उपक्रम यशस्वी करण्याकरिता सर्व न्यायिक अधिकारी कर्मचारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सर्व जवान, पोलीस अधिकारी कर्मचारी, महानगरपालिका सोलापूर येथील स्वच्छता विभागातील अधिकारी कर्मचारी, जिल्हा न्यायालयाचे सुपरवायझर यु.आर. कुलकर्णी आणि सर्व सफाई कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## स्त्रीशक्ती विधेयकाची अंमलबजावणी व्हावी

**उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीचे निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.५ ऑक्टोबर-**

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे. महिला व बालकावर होणाऱ्या अत्याचारात प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे नराधमांवर तात्काळ गुन्हे दाखल होऊन त्यांना कायद्याचा धाक बसवला पाहिजे, गुन्हेगारांना शिक्षण पर्यंत पोहोचवून अन्याय व अत्याचाराला प्रतिबंध करण्यात यावा यासाठी स्त्रीशक्ती विधेयकाची तातडीने राज्यात अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी सोलापूर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्याशी चर्चा करून त्यांना शिवसेना उपनेत्या व समन्वयक ज्योतीताई ठाकरे, शिवसेना उपनेत्याअस्मिता ताई गायकवाड, शिवसेना उपनेत्या छाया शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले,



यावेळी मुंबई येथील माजी नगरसेविका संजना मुणगेकर व रोशनी गायकवाड यांच्यासह सर्व जिल्हा संघटिका प्रिया बसवंती, सीमा पाटील, पुनम अभंगराव, अशा टोणपे, शशिकला चिवड शेट्टी, जोहरा रंगरेज,शहर संघटिका प्रीती नायर, उपजिल्हा संघटिका ज्योती मळवतकर, मंगल मोरे, मंगल थोरात, सुनिता लोंढे, सुनंदा माने, जयश्री पाटील, दिपाली पवार, प्रभावती एलगुंडे, नागू कनमुशे , मीनाक्षी गवळी, भारती मुनोळी, सुरेखा वाडकर आदी महिला पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या भेटीत महिला नेत्यांनी जिल्हयासह राज्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे सांगून सध्याचे चित्र अत्यंत विदारक आहे. शालेय मुली, बालीका यांची सुरक्षितता कमालीची धोक्यात आली आहे. विद्यमान सरकार मुलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. हा उद्रेक भविष्यात अधिक वाढणार आहे. यासाठी सतर्कता दाखवून कायदे प्रभावी पणे राबविले जावेत अशी मागणी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांचेकडे केली.

## शिखर पहारीया पुन्हा सोलापुरात; नवरात्र मंडळींना भेटी

**अनेकांना दिला मदतीचा हात; वागण्यात बोलण्यात सुशीलकुमारांची झलक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे नातू आंतरराष्ट्रीय पोलो खेळाडू उद्योगपती शिखर पहारीया हे पुन्हा गुरुवारी सोलापुरात येऊन गेले. सोलापूरच्या या दौऱ्यात त्यांनी अनेक ठिकाणी भेटी दिल्या, प्रश्न जाणून घेतले, त्यांना मदतीचा हात सुद्धा दिला आहे. शिखर यांच्या वागण्यात बोलण्यात सुशीलकुमार शिंदे यांची झलक दिसत असल्याची चर्चा होऊ लागली आहे.



सर्व समाज घटकांना समावेश करून शिखर पहारिया यांचा दौरा झाला. या दौऱ्यात विकास कामांना त्यांनी प्राधान्य दिले आहे. सामाजिक संस्थाना मदत, औद्योगिक केंद्राना भेट देऊन समस्या जाणून घेतल्या व सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली.

सोलापूर शहरातील युनिफॉर्म प्रोडक्शन युनिटला भेट दिली त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शाहजहुर अली दर्गा ला भेट देऊन चादर चढवली, तिथल्या समस्या समजून घेत सोडवण्याची ग्वाही दिली.

अक्कलकोट रोड येथील वृद्धाश्रमास भेट देऊन तेथे मदत देण्यात आली व येणाऱ्या काळात त्यांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्याचा ग्वाही दिली तसेच विविध नवरात्री मंडळांना भेट देऊन पूजा केल्या

सोलापूर शहरातील बुद्ध विहार, शाहजहुर दर्गा, तसेच विविध शारदीय नवरात्र उत्सव मंडळांना भेटी देऊन सर्व जाती-धर्माची सांगड घालताना आपल्या आजोबाप्रमाणे सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडवले. या दौऱ्यामुळे काँग्रेसच्या युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळत आहे या प्रसंगी राज सलगर तन्वीर शेख धर्मराज गुंडे व इतर उपस्तीत होते.




## जिल्हाधिकारी आशिर्वाद यांच्याकडून शिक्षक वाघमारे यांच्या कार्याचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

मोदी परिसरातील आदर्श बालक मंदिर शिवाजी नगर मोदी सोलापूर या शाळेतील सहशिक्षक जनार्दन वाघमारे यांचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी कौतुक केले. वाघमारे यांनी मतदार जनजागृतीसाठी नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून मतदानाचे महत्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना मतदानाची प्रक्रिया कशी राबविली जाते, याचे प्रत्यक्ष सादरीकरण करून दाखविले.

विविध नाट्यीकरण, घोषवाक्य, निबंध स्पर्धा या माध्यमातून समाज प्रबोधन केले. वाघमारे यांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत नाविन्य पूर्ण संबोध, तंत्रज्ञानातील बदल, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर मार्गदर्शन केले आहे.

# वडकबाळच्या गोशाळेतून ५०० महिलांना रोजगार

## आदर्श कामधेनू संशोधन संस्थेच्या उमा बिराजदार यांचा नवा आदर्श

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. ५ ऑक्टोबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सीना नदीकाठी वसलेल्या वडकबाळ येथे कट्टेव्वादेवी गोशाळेच्या माध्यमातून बचत गट व परिसरातील ५०० महिलांना रोजगार देणाऱ्या उमा बिराजदार या महिलांसाठी आदर्श ठरत आहेत.

वडकबाळ येथे आदर्श कामधेनू संशोधन संस्थेची निर्मिती करून गोशाळा काढली. शासनाच्या अनुदानाशिवाय गोशाळा सुरू आहे. सध्या या गोशाळेत ७० गोमाता असून त्यांची संगोपन स्वत: उमा बिराजदार करतात. विशेष म्हणजे त्या दिवसरात्र अनेक आजारी गोमातांचे उपचार व सेवा करतात. गोशाळेचे अध्यक्ष उमा बिराजदार व मुख्य प्रवर्तक रूद्रप्पा बिराजदार यांनी वडकबाळ येथे महिलांसाठी नंदिनी महिला स्वयंसहायता बचत गटाची स्थापना करून गोशाळेतील गोमूत्र व शेणापासून विविध वस्तू तयार करण्यासाठी रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

स्वत:च्या मालकीचे आठ एकर क्षेत्र गोमातांच्या चाऱ्यासाठी राखीव ठेवला आहे. या क्षेत्रात गोमातांना बंदिस्त व मुक्त दोन्ही पद्धतीने चारा उपलब्ध करून दिला जातो. गोमूत्र व शेणापासून या गोशाळेत बचत गटाच्या महिला गांडूळखत, गोमय विभूती, होमच्या गवऱ्या, दंतमंजन, गोनाईल, धूप, गोमूत्र अर्क, गोघनवटी मलम, चमत्कारी भस्म असे अनेक औषधी व घरगुती वापरण्यासाठी वस्तू तयार केले जातात. उमा बिराजदार या महिलांना मार्गदर्शन करून त्यांना स्वावलंबी होण्यासाठी मार्गदर्शन करतात. शिवाय शेतीसाठी गोमूत्र व गांडुळातही उपलब्ध करून दिला जातो. बिराजदार यांच्याकडून कच्चा माल घेऊन अनेक महिला गोमय साबण, गणेशमूर्ती, साम्राणिक कप, शोभेच्या वस्तू, किचेन यासह इतर अनेक वस्तू तयार करून बाजारात विक्री करतात. या वस्तूंना अधिक मागणी असल्याने दिवसेंदिवस महिलांची संख्या वाढत आहे. सोलापुरातील अनेक भागात कच्चा माल मिळाल्याने अनेक महिला पक्का माल तयार करून स्वावलंबी बनत आहे. शिवाय महिलांनी तयार केलेल्या वस्तू सोलापूर, पुणे, मुंबई, मंगळवेढा, पंढरपूर तसेच कर्नाटकातील अनेक जिल्ह्यात विक्री करण्यात येत असून मागणीच्या प्रमाणात वस्तूंची तुटवडा आहे.

या गोशाळेत असाध्य रोगावर पंचगव्य पद्धतीने उपचार करून कॅन्सरसह विविध आजारावर उपचार केला जातो. तीन वर्षात या गोशाळेत विविध आजाराचे ५०० रूग्ण पंचगव्य पद्धती उपचार घेऊन ठणठणीत होऊन गेल्याचे रूद्रप्पा बिराजदार यांनी सांगितले. बिराजदार दांपत्याच्या या

गोशाळेला विश्वसुंदरी नूतन मिस्त्री, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, प्राणीमित्र विलास शहा, विहिंप व बजरंग दलाचे सतीश आनंदकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी बिराजदार यांच्या गोशाळेला भेट देऊन त्यांचे कार्याचे कौतुक केले आहे.

गोशाळा चालविताना बिराजदार यांच्याकडून पर्यावरण संवर्धनाला महत्त्व दिले जात आहे. अंत्यविधीसाठी लागणाऱ्या लाकडांसाठी वृक्षतोडीवर उपाय म्हणून गोशाळेत शेणापासून तयार गोकाष्ट तयार करण्यात येत आहे.



### बचत गटाच्या महिला सदस्य

उमा बिराजदार यांच्यासह अनिता बिराजदार, वैशाली कुलकर्णी, रेवम्मा केरे, वैष्णवी बिराजदार, वैशाली पुजारी, शालन पुजारी, नागूबाई बिराजदार, प्रभावती बिराजदार, वनिता साबळे, मंगल शिवशरण, डाळिंबा शिवशरण, सुनंदा कोळी, अनिता गुदमे, मन्नाबाई भोई, जगदेवी बिराजदार.

### महिलांच्या स्वावलंबनाला प्राधान्य

प्रथमत: राज्य सरकारने गोमातेला राज्यमाता म्हणून घोषित केल्याबद्दल अभिनंदन. गोशाळेच्या माध्यमातून विविध वस्तू तयार करून पर्यावरण संवर्धन करीत आहे. शिवाय गोमूत्र व शेणापासून विविध घरगुती वस्तू बनवून महिलांना आर्थिक स्वावलंबी बनविण्यासाठी प्राधान्य देणार आहे. समाजाने गोशाळांना सहकार्य करावे.

**- उमा बिराजदार,** अध्यक्ष, नंदिनी महिला बचत गट, वडकबाळ

## संक्षिप्त वृत्त



**पंढरपूर : आनंदोत्सव साजरा करताना कल्याणराव शिंदे, सिद्धार्थ ढवळे, प्रा. धनाजी चव्हाण, प्रा. भास्कर बंगाळे आदी.**

### मराठी भाषेला अभिजात दर्जा; पंढरपुरात साखर वाटून आनंदोत्सव

**पंढरपूर, दि.५ ऑक्टोबर-**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा, पंढरपूर याच्या वतीने पंढरपूर येथे आनंदोत्सव व साखर वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विठ्ठल मंदिर परिसरातील भाविकांना साखर वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी कल्याणराव शिंदे, मसाप उपाध्यक्ष सिद्धार्थ ढवळे, प्रा.धनाजी चव्हाण, प्रा.भास्कर बंगाळे, हभप कवी सूर्याजी भोसले महाराज, राधेश बादले महाराज, प्रा. अशोक डोळ, पांडुरंग अल्लापूरकर, डॉ. प्रशांत ठाकरे, मंदार केसकर, धनंजय देशमुख, दत्ता तरळगट्टी, स्मिता कवडे, अजय पेनूरकर, ग्रंथपाल प्रवीण पाठक,ग्रंथपाल उत्पात इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मराठी भाषेच्या जी गौरवाच्या घोषणा देण्यात आल्या. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.यावेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मसाप पंढरपूर शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्रा. के. एल. पवळ. यावेळी डॉ. एस. के. टिळेकर व मान्यवर.**

### विद्यार्थ्यांनी स्वप्नांचा ध्यास घेऊन पाठपुरावा करावा प्रा. के. एल. पवळ

**अकलूज, दि. ५ ऑक्टोबर-**

शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या एमएससी ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट या पदव्युत्तर विभागातर्फे बीएससी आणि एमएसस्सीनंतर करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. के. एल. पवळ यांनी विद्यार्थ्यांनी स्वपनंचा ध्यास घेऊन पाठपुरावा करावा, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रयत्नांम ध्ये सातत्य ठेवण्याचा सल्ला दिला. प्रस्ताविक डॉ. कांबळे डी. आर. यांनी केले व आभार प्रा. रोहित कुंभार यांनी मानले. कार्यक्रमासाठी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. एस. देवकर, प्रा. प्रमोद घोगरे, प्रा. सूर्या यादव, प्रा. नंदकुमार गायकवाड, प्रा. अस्मिता माने, प्रा. स्नेहल पांढरे उपस्थित होते. सूत्रसंचालन चंद्रशेखर बुट्टे यांने केले.



**करमाळा : घरगाव येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाप्रसंगी संजय सरवदे, लक्ष्मी सरवदे व मान्यवर.**

### वाढदिवसाचा खर्च टाळून मूकबधिर विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप

**करमाळा, दि. ५ ऑक्टोबर-**

घरगाव (ता. करमाळा) येथील लक्ष्मी सरवदे व संजय सरवदे यांनी आपल्या कुटुंबातील मुलाचा वाढदिवस समाजोपयोगी पद्धतीने साजरा करतात. त्यांनी श्री मूकबधीर विद्यालय वाघोली या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप केले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सचित्र बालमित्र पुस्तिका, अंकलिपी, अक्षर उजळणी, वह्या, पुस्तके व खाऊचे वाटप केले. यावेळी संजय सरवदे, माजी सरपंच लक्ष्मी सरवदे उपस्थित होते.

### निराधार पेन्शनचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करा: शिखलकर

**कुर्डूवाडी, दि. ५ ऑगस्ट-**

निराधार पेन्शन योजनेचे लाभार्थी मागील दोन महिन्यांपासून वंचित असून लवकरात लवकर शासनाने पेन्शन लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याच्या मागणीचे निवेदन कुर्डूवाडी काँग्रेस अल्पसंख्य सेलचे अध्यक्ष हमीद शिखलकर यांनी प्रांताधिकारी प्रयांका आंबेकर यांना दिले आहे. दोन महिन्यांपासून श्रावणबाळ, अपंग, संजय गांधी निराधार योजनेची रक्कम अद्यापपर्यंत नवीन जुन्या योजनाधारकांसह खातेदारांना मिळालेली नाही. यामुळे सर्वत्र नाराजीचा सूर ऐकण्यास मिळत आहे. सध्या सणासुदीचे दिवस सुरु आहेत. शासनाने विविध योजनेची रक्कम खातेदारांच्या नावे त्वरित जमा करणे अत्यंत जरुरीची आहे. जेणेकरून सणवार आनंदमयी वातावरणात पार पडतील आणि आर्थिक चणचण भासणार नाही. जाणून बुजून दुर्लक्ष केल्यास वयोवृद्धाना अडचणीस साम ेरे जावे लागणार आहे. विजयादक्षमीच्या आगोदर संबंधित खातेदारांच्या खात्यावर रक्कम जमा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा हमीद शिकलकर यांनी दिला.

### कर्जाळ-हालहळ्ळी अ रस्ता खराब

**वळसंग, दि. ५ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी अ ते कर्जाळ हा रस्ता फारच खराब झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांसह वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. कर्जाळ, हालहळ्ळी अ, सोलापूर, अक्कलकोटसह अन्य ठिकाणच्या शेतजमिनी या रस्त्यावर आहेत. त्यांना खराब रस्त्यामुळे येणे-जाणे फारच जिकिरीचे झाले आहे. रस्त्याची दुरुस्ती नाही झाल्यास या भागातील नागरिकांना पालेभाज्या, अन्नधान्य बाजारपेठेत पोहोचविण्याबरोबरच दैनंदिन वाहतुकीसाठी मोठी करसत करावी लागणार असल्याचे हणमंत कळमंडे यांनी सांगितले.



# अकलूजच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय क्रीडा स्पर्धेत सुयश

**तभा वृतसेवा,**
**अकलूज, दि. ५ ऑक्टोबर-**

अकलूज येथील शंकरराव मोहिते म हाविद्यालयाच्या अभ्यास केंद्राने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राच्या क्रीडा महोत्सवात विविध क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

यामध्ये महेश महादेव जाधव (भालाफेक), भाग्यश्री विठ्ठल काळे हिने (१०० मीटर) धावणे प्रथम क्रमांक मिळविला. विजेत्या स्पर्धकांना पुणे विभागीय केंद्राचे संचालक संतोष वामन यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. महेश जाधव (भालाफेक) व भाग्यश्री काळे (१०० मीटर धावणे, खो-खो), अरबाज आतार (हॉलीबॉल व खो-खो) प्रणित पाटील व निखिल कोळी (खो-खो) यांची नाशिक येथे होणाऱ्या केंद्रीय क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांचे शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक जयसिंह मोहिते-पाटील, संस्थाध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर, संयोजक डॉ. बाळासाहेब मुळीक यांनी अभिनंदन केले.



**अक्कलकोट : आकांक्षित तालुका कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, पोनि महेश स्वामी, हर्षद निगडे, रमाकांत डाके, विशाल भोसले, डॉ. अश्विन करजखेडे आदी.**

# अक्कलकोट आकांक्षित तालुका कार्यक्रम संपूर्णत: अभियान समारोप

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ आक्टोबर-**

निती आयोग भारत सरकार यांच्या मार्गदर्शनानुसार आकांक्षित अक्कलकोट तालुक्यांतर्गत या कालावधीत संपूर्णता अभियान कार्यक्रम राबविण्यात आला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. नीती आयोगामार्फत सुरू असणाऱ्या आकांक्षित तालुका या योजनेत एकूण ४० इंडिकेटरवर काम चालू आहे. मात्र त्यापैकी सहा इंडिकेटरचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी सदरचे संपूर्णत: अभियान सुरू करण्यात आलेले होते. या अभियानांतर्गत तालुक्यातील गरोदर महिला नोंदणी, रक्तदाब तपासणी, म धुमेह तपासणी, गरोदर महिलांना सकस आहार देणे विशेष जागृती, महिला बचत गटांना खेळते भांडवल उपलब्ध करून देणे आणि कृषी विभाग अंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्याचे हेल्थ कार्ड तयार करणे प्रमुख उद्दिष्ट होते.

आकांक्षित तालुका योजनेतील उर्वरित ३४ सिंडिकेटरवर काम करण्याबद्दल प्रोत्साहित केले. यावेळी तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, दक्षिण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक महेश स्वामी, तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, प्रकल्प अधिकारी विशाल भोसले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, उपअभियंता राठोड, पशुधन विकास अधिकारी डॉ. दिनेश मुरूमकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी दयानंद परिचारक, आकांक्षित तालुका फेलो प्रीती रोकडे, यंग फेलो निकिता गायकवाड, विस्ताराधिकारी भोरे पठाण, कोळी, निलुरे, पोतदार, मठ, निकम, बोरगाव, वाघमोडे, राठोड, कोरे, जमादार, कोरे, दामटे, अंजुटगी, कनाळ उपस्थित होते. सूत्रसंचालन विस्तार अधिकारी संजय पाटील यांनी केले. आभार बालविकास प्रकल्प अधिकारी विशाल भोसले यांनी मानले.



**करमाळा : धावण्याच्या स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर सिद्धार्थ मंजुळे व मान्यवर.**

# जेऊरच्या सिद्धार्थ मंजुळेची विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड

## शंभर व दोनशे मीटर धावण्यात जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.५ ऑक्टोबर**

जेऊर ता करमाळा येथील सिद्धार्थ संतोष मंजुळे याचा शंभर व दोनशे मिटर धावण्याच्या स्पर्धेत जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून शालेय विभागस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषदेमार्फत शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा एसआरपीएफ, गट क्रमांक दहा सोरेगाव येथे झाली. या स्पर्धेसाठी जिल्ह्यामधील ११ तालुक्यातून विजयी झालेले विविध खेळातील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यामध्ये करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा खेळाडू सिद्धार्थ संतोष मंजुळे याने १०० मीटर आणि २०० मीटर धावणे या दोन्ही प्रकारच्या खेळामध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. त्याची पुणे येथील विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला प्रा. रामकुमार काळे व अंकुश थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. विद्या विकास मंडळाचे सचिव विलासरावजी घुमरे सर संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड ,संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# लायन्स क्लब बार्शी टाऊनच्यावतीने शाह कन्या प्रशालेत मोफत नेत्र तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**

येथील लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या वतीने शाह कन्या प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी खास नवरात्रोत्सवानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक सचिव हेमंत जमदाडे यांनी केले व नेत्र तपासणी शिबीर घेण्याबद्दलचा उद्देश सांगितला. प्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ गजानन शेटे यांनी विद्यार्थिनींची मोफत नेत्र तपासणी केली व नेत्र विकाराबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी गणेश गोडसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व लायन्सच्या विधायक कार्यास शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका शुभदा जोशी यांनी या उपक्रमासाठी शाह कन्या प्रशालेची निवड केल्याबद्दल लायन्स क्लब पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. यावेळी एमजेएफ ला.अतुल सोनिग्रा, लायन्स क्लब बार्शी टाऊनचे उपाध्यक्ष रवी राऊत, सदस्य अन्वर पटेल आदी उपस्थित होते. लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या वतीने प्रशालेला डिजिटल बोर्ड देण्यात आला. सूत्रसंचालन संदेश घाडगे व आभार प्रदर्शन आयुब शेख यांनी केले. लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊनचे अध्यक्ष महावीर कदम यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यप्रशालेतील विद्यार्थीनी उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका शुभदा जोशी यांनी लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या उपक्रमाचे कौतुक केले.




**बार्शी : शाह कन्या प्रशालेत नेत्र तपासणीप्रसंगी अतुल सोनिग्रा, रवी राऊत, अन्वर पटेल, शुभदा जोशी यांच्यासह मान्यवर.**

# विराज जोशींच्या अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताची पंढरपूरकरांना भुरळ

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती नवरात्र संगीत महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ ऑक्टोबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाची पहिलं स्वरपुष्प भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांनी गुंफले. त्यांनी अभिजात भारतीय शास्त्रीय संगीतातून पंढरपूरकरांना भुरळ घातली.

मंदिर समितीचे सदस्या शकुंतला नडगिरे, सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर व्यवस्थापक मनोज श्रोत्री, श्रीनिवास जोशी, शिल्पा जोशी, विराज जोशी यांचे हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सुरुवातीला शास्त्रीय गायनामध्ये राग शुद्ध कल्याण गात अभिजात शास्त्रीय संगीताचा दमदार वारसा दाखवला. त्यानंतर बीजमंत्र जय राम कृष्ण हरीने सुरुवात करत आजोबा भारतरत्न भीमसेन जोशी यांनी स्वरबद्ध केलेल्या प्रसिद्ध संतरचना आता कोठे धावे मन, माझा भाव तुझे चरणी, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल, जय दुर्गे दुर्गती परिहारीणी, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा आदी गाऊन शेवटी अगा वैकुंठीच्या राजा या भैरवीने आजोबांच्या आठवणी जागवल्या. सुंदर रियाजी आवाजाने सर्व पंढरपूरकर रसिक श्रोत्यांना त्यांनी मंत्रमुग्ध केले.




**पंढरपूर : विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीमध्ये शास्त्रीय गायन सादर करताना विराज जोशी. यावेळी साथसंगत करणारे पांडुरंग पवार, ज्ञानेश्ववर दुधाणे, ओंकार पाठक, सरदेशमुख यांच्यासह सहकारी.**

### यांनी दिली साथसंगत

यावेळी त्यांना तितकीच दमदार आणि सुंदर साथसंगत तबला पांडुरंग पवार, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे हार्मोनियम ओंकार पाठक, टाळ अक्षय सरदेशमुख यांनी केली. तर सूत्रसंचालन संदीप कुलकर्णी यांनी केले. नऊ दिवस चालणाऱ्या या संगीत महोत्सवात ख्यातनाम गायक गायिका यांची उपस्थित राहणार आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बार्शीतील अन्यायाविरोधी आंदोलनास सहकार्य करु : आ. गोरखे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**

विविध सामाजिक मागण्यावर आक्रमकपणे काम करणाऱ्या बार्शीतील अन्याय विरोधी आंदोलनास आवश्यक ते संपूर्ण सहकार्य करु आणि मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन तोडगा काढू, असे आश्वासन विधानपरिषद सदस्य आ. अमित गोरखे यांनी दिले. अन्याय विरोधी आंदोलनाचे अध्यक्ष नवनाथ चांदणे यांच्यासह शिष्टमंडळाने औसा (जि. लातूर) येथे आ. गोरखे यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी ते म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाकडून मातंग समाजातील बेरोजगार तरुणांना बिनव्याजी व विनातारण कर्ज पुरवठा व्हावा, यासाठी आपण शासन दरबारी प्रयत्न करु, असे आश्वासन आ. अमित गोरखे यांनी दिले. येत्या काही काळात बँकामार्फत बिनव्याजी कर्ज पुरवठा केला जाणार आहे. याबाबत शासनाकडून लवकरच अध्यादेशही जारी केला जाईल, असे विधानही आ. गोरखे यांनी केले. बार्शीतील विविध विषयावर सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करुन तोडगा काढण्यात येईल. तसेच रमाई घरकुल योजनेतील जुन्या लाभार्थ्यांना वाढीव एक लाखाचा फरक मिळण्यासाठी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.







अकलूज : आश्विन शुद्ध तृतीयेनिमित्त ग्रामदैवत श्री अकलाईदेवीची करण्यात आलेली भवानी तलवार अलंकार महापूजा.

# करमाळा तहसील कचेरी स्थलांतरास विरोध

### ● बहुजन संघर्ष सैनेची निदर्शने; भविष्यात जनता रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ५ ऑक्टोबर-**

करमाळा तहसील कार्यालय मौलाली म ाळावर बांधण्यास करमाळा तालुक्यातील जनतेचा विरोध आहे. विरोध दाखवण्यासाठी बहुजन संघर्ष सेनेने करमाळा तहसील कार्यालयासमोर भव्य निदर्शने केली.

बहुजन संघर्षनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम म्हणाले, इंग्रजांनी बांधलेल्या तहसील कचेरीचा एकही दगड अद्याप हललेला नाही. पूर्ण इमारत सुस्थितीत आहे. मग नवीन तहसील कचेरी बांधण्याचा निर्णय कशासाठी घेतला, हा प्रश्न जनता विचारत आहे. तहसील कचेरी बांधायचीच असेल तर आहे या ठिकाणी बांधावी. इंग्रजांनी तहसील कचेरीच्या अवतीभवती भरपूर जागा शिल्लक ठेवलेली आहे. मग आज असलेल्या तहसील कचेरीच्या जागेवर नवीन तहसील कचेरी बांधावी तहसील कचेरी बांधणे तसे गरजेचे नव्हते. तहशील कचेरीमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. कर्मचाऱ्यांची संख्या आ. संजय शिंदेंनी वाढवावी व तालुक्यातील जनतेची तहसील कचेरीमधील रखडलेली कामे मार्गी लावावीत, दप्तर दिरंगाई होणार नाही याची दखल घ्यावी आ. संजय शिंदे यांनी पाच वर्षांमध्ये एकदाही आमसभा घेतली नाही व तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतलेला नाही. दोन-दोन वर्षांपासून शेतकऱ्यांचे प्रस्ताव तहसील कचेरीमध्ये पडून आहेत. रेशन कार्डचे संदर्भातील कामे दोन-तीन वर्षांपासून पुरवठा विभागामध्ये पडून आहेत. मात्र कामे लोकांची झालेली नाहीत. आ. संजय शिंदे यांनी प्रशासनातील कामे गतिमान करण्याऐवजी तहसील कचेरीचे बांधकाम मौलाली माळावर बांधण्याचा निर्णय पूर्णपणे चुकीचा घेतलेला आहे. आज असणाऱ्या तहसील कचेरीच्या आवारामध्ये पंचायत समितीचे कार्यालय आहे, पोलीस स्टेशनचे कार्यालय आहे, भूमी अभिलेखचे कार्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय आहे. संस्था निबंधकाचे कार्यालय आहे. एवढ्या सोयी एकाच ठिकाणी तहसील कचेरीच्या आवाराम ध्ये लोकांना मिळतात. शिवाय तहसील कचेरीपासून करमाळा शहरातील बाजारपेठ जवळ आहे. सरकारी दवाखाना, एसटी स्टँड जवळ आहे. एवढ्या सर्व सोयींनी उपलब्ध असणारी तहसील कचेरी मौलाली माळावर नेण्यास जनतेचा विरोध आहे.




करमाळा : निदर्शने करताना रामभाऊ कदम, अंगद लांडगे, कालिदास कांबळे यांच्यासह पदाधिकारी.

यावेळी अंगद लांडगे, कालिदास कांबळे,भीम राव घाडगे, अतुल चव्हाण, अभिमान गायकवाड, रामभाऊ नलवडे, दत्तू शिंदे, महादेव काळे, उत्तम गायकवाड, इरफान शेख, अनिल जगदाळे, श्रीराम सुरवसे, संजय तोरमल, पांडुरंग साळुंखे, सचिन कदम, हंबीराव खरात, सागर कदम, पप्पू सरवदे, प्रेमचंद, लक्ष्मण भोसले, सुरेश खरात, अर्जुन डावरे, कय्युम शेख, भाऊसाहेब भोसले, रामा पांडव, सोम नाथ धावरे, प्रकाश चव्हाण, विष्णू रंधवे, अजिनाथ मार्कड, दिगंबर मारकड, लालमन भोई, चैतन्य कदम, रेवण झिंजाडे-पाटील, अर्जुन भोसले, अधिकराव शिंदे, मच्छिंद्र गायकवाड, राहुल खरात, मोहन विटकर, सुनील बंडगर, संतोष लावंड, संदिपान गरड, संदीप मारकड, भागवत कदम, गौतम शिंदे, अप्पा भोसले, मारुती भोसले, लहू भालेराव, सुरेश चाकणे, संतोष चव्हाण आदी उपस्थित होते.

### शहरापासून दोन किमी होणार लांब

मौलाली माळावरती तहसील कचेरी झाल्यास करमाळा शहरापासून दोन किलोमीटर लांब अंतरावर पडते. शिवाय नगर-टेंभुर्णी नॅशनल हायवे मौलाली माळावरून जात असल्याने करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागातून येणाऱ्या लोकांच्या जीवितास धोका पोहोचू शकतो. याचा परिणाम करमाळा बाजारपेठेवरदेखील होऊ शकतो. या सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्र शासनाने मौलाली माळावर बांधण्यात येणारे तहसील कचेरीचे टेंडर रद्द करावे. अन्यथा भविष्य काळामध्ये करमाळा तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरेल याची दखल घ्यावी, असे निवेदन नायब तहसीलदार विजयकुमार लोकरे यांनी स्वीकारले.

## संक्षिप्त वृत्त...



बार्शी : फार्मा मॉडेल मेकिंग स्पर्धेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक प्राध्यापक.

### राष्ट्रीयस्तरावरील फार्मा मॉडेल मेकिंग स्पर्धेत सोजर फार्मसीचे घवघवीत यश

**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचा राष्ट्रीय स्तरावरील फार्मा वर्किंग मॉडेल स्पर्धेमध्ये कौतुकास्पद गुणगौरव करण्यात आला. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी अंतर्गत मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी निगडी, पुणे येथे राष्ट्रीय स्तरावरील फार्मा वर्किंग मॉडेल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये देशभरातील ८८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमध्ये सोजर कॉलेज ऑफ फार्मसी खांडवी येथील जवळजवळ २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून वैज्ञानिक सिद्धांतावर आधारित १० फार्मा वर्किंग मॉडेल बनवून तो सादर करण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला. यामध्ये बी फार्मसी अंतिम वर्षातील कु. हर्षदा बंडू जगताप व कु. स्वप्नाली नंदकुमार झालटे यांना सिरप मॅन्युफॅक्चरिंग प्लांट फार्मा वर्किंग मॉडेलकरिता कौतुकास्पद गुणगौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



सांगोला : अभियंत्यांच्या सन्मानाप्रसंगी प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, हर्षल काळे, मनीष कांबळे, सागर आवताडे, आकाश म्हेत्रे व मान्यवर.

### लायन्स क्लबकडून अभियंत्यांचा सन्मान

**सांगोला, दि. ५ ऑक्टोबर-**

सांगोला लायन्स क्लबकडून अभियंता दिनानिमित्त सन्मान कर्तृत्वाचा गौरव अभियंत्यांचा या कार्यक्रमाअंतर्गत माजी प्रांतपाल प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते अभियंता हर्षल काळे, मनीष कांबळे,सागर आवताडे, आकाश म्हेत्रे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सांगोला लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेश आटपाडीकर, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजचे प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते.यावेळी प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, मनीष कांबळे, सागर आवताडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सांगोला लायन्स क्लबचे सचिव अजिंक्य झपके, संचालक प्रा.अमर गुळमिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उन्मेश आटपाडीकर, सूत्रसंचालन लायन्स कॅबिनेट ऑफिसर प्रा. धनाजी चव्हाण यांनी केले. प्रा.मिलिंद देशमुख यांनी आभार मानले.

### अकोले खुर्द येथील गणपती फार्मसीचे यश

**टेंभुर्णी, दि. ५ ऑक्टोबर-**

अकोले खुर्द (ता. माढा) येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, टेंभुर्णी येथील द्वितीय वर्ष डी. फार्मसीतील प्राजक्ता शिंदे, सानिया शेख, भोसले श्रावणी व दुपडे राजलक्ष्मी यांनी क्लिनिकल फार्मासिस्ट इन प्रोव्हिजन ऑफ कॉन्ट्रासेप्टिव्ह पोस्टर स्पर्धेमध्ये यश मिळविल्याची प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यांनी दिली. यावेळी श्री गणपती संस्थेचे सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे, अध्यक्ष अ‍ॅड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबासाहेब येडगे यांनी अभिनंदन केले. प्रा. धनश्री करंडे, प्रा. कोमल यादव, प्रा. आशिष जाधव प्रा. रूपाली राऊत, प्रा.पूजा शिंदे, प्रा. स्वाती पाटील व प्रा. मोनिका माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## श्री विठ्ठलाला अलंकार, रूक्मिणीमाता कमलादेवीच्या पोषाखात

**● नवरात्र महोत्सव : तिसरी माळ; परिवार देवतांनाही पारंपारिक पोषाख**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑक्टोबर-**

घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त प्रथा परंपरेप्रमाणे तिस-या दिवशी श्री विठ्ठल व रुक्मिणीमातेला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणीमातेस कमलादेवी पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, हिऱ्याचा नाम, कौस्तुभ मणी, दंडपेट्या, हिऱ्याचा कंगन, मोत्याचा तुरा, मोत्याची कंटी, इमिटेशन नेकलेस, शिरपेच तुरा, मत्सजोड, तोडे, सोन्याचा करदोडा, बोरमाळ, मोहन माळ तसेच रुक्मीणी मातेस सोन्याचा मुकुट, नवरत्नाचा हार, चिंचपेटी, मद्रासी कंठा, दशावतारीहार, सोन्या मोत्याचे ताणवड, मोत्याचा कंठा, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेठेची बिंदी, मन्या मोत्याचा पाटल्या, सोन्याचे बाजूबंद, मत्स्य जोड, रुळजोड, पैंजण, नथ, कर्णफुले, कंबरपट्टा तसेच राधिका मातेस नक्षी टोप, जवमनीपदक, पुतळ्यांची माळ, जवेचे माळा, लक्ष्मी हार व सत्यभामादेवीला सिद्धेश्वर टोप, लक्ष्मी टोप, हायकोल, चिंचपेटी तांबडी, मोरांची माळ, जवेची माळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच मंदिर समितीच्या अखात्यरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांनादेखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे. श्रीस परिधान करण्यात येणारे अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहेत. देवाचे रुप सुंदर दिसत आहे.



### मंदिरात परंपरेचे पालन

या अलंकाराचे 'मकर कुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभमणी विराजित।' यासारख्या अनेक अभंगातून संतांनी वर्णन केलेले आहे. नवरात्र महोत्सवानिमित्त श्री विठ्ठलास नऊ दिवस दुपारी पोषाखावेळी अलंकार व रूक्मिणीमातेस विविध प्रकारचे पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात येत असल्याने, भाविकांची गर्दी होत आहे. नवरात्र उत्सवातील सर्व प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.



अकलूज : शैलेश कोतमिरे यांच्या सत्काराप्रसंगी मान्यवर.

## जिल्हा बँकेसाठी काम करणे माझे भाग्य

**● शैलेश कोतमिरे : सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ आक्टोबर-**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने अपर आयुक्त व विशेष सहकारी संस्था निबंधक शैलेश कोतमिरे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ अकलूज शाखेत घेण्यात आला.

कोतमिरे म्हणाले जिल्ह्याची आर्थिक वाहिनी असलेल्या जिल्हा बँकेमध्ये मला प्रशासक म्हणून काम करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य समजतो. यावेळी अकलूज सहकारी संस्थेसंचे सहाय्यक निबंधक मोहन शिंदे, उत्तमराव दीक्षित, मृणाल गायकवाड, शशिकांत माने-पाटील, राजेंद्र शिंदे, तानाजी देशमुख, सचिव निंबाळकर, प्रदीप नागटिळक, नागेश सुरवसे, अशफाक मुलाणी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुहास उरवणे यांनी केले तर मृणाल गायकवाड यांनी आभार मानले.

# पाकिस्तानला युद्धात धूळ चारणारा टी-५५ रणगाडा बार्शीच्या अमर जवान स्मारकात

**आज लोकार्पण समारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑक्टोबर-**

बार्शी नगरपरिषदेने विकसित केलेल्या उद्यानामध्ये सन १९७१ च्या भारत पाकिस्तान युध्दातील टी-५५ हा रणगाडा शहीद जवानांच्या स्मृती जपण्यासाठी ठेवण्यात आलेला आहे. म हाराष्ट्रातील नगरपरिषद स्तरावरील उद्यान विकसनाबाबतीत विचार केला असता शहीद स्मारक आणि ढ-५५ रणगाडा मागविण्याबाबत बार्शी नगरपरिषद एकमेव नगरपरिषद आहे. बार्शी नगरपरिषदेच्या सि.स.नं. ७२३/१ अमर जवान स्मारक व उद्यान (शहीद स्मारक) अलीपूर व उपळाई लिंक रोड, बार्शी या ठिकाणी विकसीत केले आहे. सदरची खुली जागा एकुण २६ गुंठे एवढी आहे.

सदर उद्यान विकसित करणेकरिता नगरपरिषदेने ई-निविदा प्रसिध्द करून ठेकेदार श्री. राजेश डिडवळ व श्री अरुण (लाडू) शिंदे यांना देणेत आली होती. सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू. ४३,८४,०००/- होते. त्यामध्ये उद्यान विकसित करणे, पाथवे तयार करणे, झाडे व रोपे लावणे, लॉन तयार करणे व शहीद स्मारकाकरिता व रणगाड्या करिता (ढ-५५) २ चबुतरे बांधणे इत्यादी कामांचा समावेश होता.

त्यामध्ये रणगाड्याकरिता नगरपरिषद व माजी सैनिक यांनी खडकी लष्करी छावणी, पुणे यांचेकडे सतत पाठपुरावा करून रणगाडा उपलब्ध करून घेतला आहे. सदर रणगाडा सन १९७१ च्या भारत पाकिस्तान युध्दातील असून रशियन बनावटीचा आहे. सदर रणगाड्याचे वजन अंदाजे ३८ टन एवढे आहे. सदर रणगाडा हा ढ-५५ मॉडेलचा आहे.

सदर रणगाड्याची वाहतूक व इतर व्यवस्था नगरपरिषदेने केलेली आहे. सदर रणगाड्याला रंगकाम करून सदरचे उद्यान शहीद जवानाच्या स्मृती जपण्यासाठी ठेवण्यात आलेल्या रणगाड्यासह लोकार्पण आज रविवारी करणेत येत आहे.



बार्शी : अमर जवान स्मारकामध्ये दाखल झालेल्या टी-५५ रणगाड्याची पाहणी करताना पदाधिकारी.

# लिंक रोडमार्गे पंढरपूर-पुणे बस धावणार

### ● बसस्थानकासमोरील अतिक्रमण हटणार अन् जिल्हा न्यायालय थांब्यावर गाड्या थांबणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ ऑक्टोबर-**

पुण्याकडे जाणाऱ्या बस लिंक रोडमार्गे धावणार आहेत, अशी माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळाच्या पंढरपूर आगारात प्रवासी राजा दिन हा उपक्रम सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांच्या उपस्थितीत पार पडला. ग्राहक पंचायतीने पंढरपूर-पुणे-पंढरपूर या बस लिंक रोडवरुन ये-जा कराव्यात अशी मागणी केल्याने कार्यवाही करण्याचे मान्य करण्यात आले. अमोल गोंजारी यांनी विभाग नियंत्रक म्हणून नुकताच पदभार स्वीकारल्याबद्दल ग्राहक पंचायतीतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. या उपक्रमात ग्राहक पंचायतीचे सोलापूर जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा सदस्य पांडुरंग अल्लापूरकर, पंढरपूर तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे यांनी पंढरपूर आगाराची पंढरपूर-बारामती या मार्गावर सकाळी बससेवा सुरू करावी, पंढरपूर-मुंबई बस सुस्थितीतील असावी, पंढरपूर जिल्हा न्यायालय येथील मंजूर बस थांब्यावर प्रवासी चढ-उतार करण्यात यावेत, तेथे अधिकृत फलक लावण्यात यावा, पंढरपूर आगाराला नवीन बस तातडीने मिळाव्यात, बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावरील अतिक्रमण तात्काळ हटवावे, बस गाड्यांमध्ये आगार प्रमुखांचे मोबाईल नंबर लावावेत, डीजी लॉकरमधील कागदपत्रे पुरावे म्हणून सवलतीसाठी ग्राह्य येतील असे फलक विविध ठिकाणी लावण्यात यावेत, स्थानकावरील पोलीस कक्षात कर्मचारी उपस्थित असावेत, अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी पंढरपूर आगार प्रमुख योगेश लिंगायत, स्थानक प्रमुख अंकुश सरगर यांनीही प्रतिसाद दिला. प्रवाशांच्या अडचणी समस्या प्राधान्याने सोडविल्या जातील अशी अपेक्षा प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, जिल्हा संघटक दीपक इरकल यांनी व्यक्त केली. या उपक्रमासाठी समाधान मेटकरी व सुमित भिंगे यांनी परिश्रम घेतले.



बार्शी : विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांचा सत्कार करताना शशिकांत हरिदास, विनोद भरते, दीपक इरकल व मान्यवर.

### चार्जिंग स्टेशनही होणार

संपर्कासाठी फोन नंबर लिहावेत, फलाटाच्या दोन्ही बाजूला स्वच्छतागृहाची सोय तातडीने करावी, चार्जिंग स्टेशनचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे या प्रवाशांच्या मागण्या, अडचणी, समस्या मांडण्यात आल्या. यावेळी त्यांनी समस्या सोडविण्याचा गांभीर्याने विचार केला जाईल असा विश्वास विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी दिला.

# पंढरपूर-पुणे पालखी मार्गावर बसने घेतला पेट

**सुदैवाने जीवितहानी नाही**

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ५ ऑक्टोबर-**

पंढरपूर पुणे पालखी मार्गावर शिवशाही बसला इथे भीषण आग लागली चालकाच्या प्रसंगावधाना मुळे मात्र प्रवाशांचे प्राण वाचलेत. बस पंढरपूरहून पुण्याला जात असताना ही दुर्घटना घडली. भीषण आगीमध्ये बस जळून खाक झालेली आहे.

पंढरपूर वरून पुणेकडे पालखी महामार्गावरून ८ प्रवासी घेऊन निघालेल्या शिवशाही बसला वाडीकुरोली परिसरात असणाऱ्या उड्डाणपूलावर अचानक आग लागली. यामुळे महामार्गावर एकच गोंधळ उडाला. पालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. बस चालकाच्या प्रसंगावधानामुळे सर्व प्रवासी तातडीने बस बाहेर उतरविले. काही वेळात आगीने रौद्ररूप धारण केले.



पंढरपूर : वाडीकुरोली येथील उड्डाणपुलावर शिवशाही बसला लागलेली आग.

पंढरपूर होऊन पुण्याकडे ८ प्रवासी घेऊन निघालेली शिवशाही बस वाडीकुरोली परिसरातील उड्डाणपुलावर आल्यानंतर अचानक गाडीला आग लागली. आग कशामुळे लागली याची चौकशी सुरू आहे. तपासणी पुर्ण झाल्यानंतरच आगीचे कारण समोर येईल.

**- एस. एस. लिंगायत,**
आगार प्रमुख, पंढरपूर

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महामंडळाच्या कमिटया व अशासकीय कमिट्या जाहीर करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.५ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र राज्यातील महामंडळाच्या कमिटया व अशासकीय कमिट्या जाहीर करण्याची मागणी भारतीय किसान मोर्चाचे धाराशिव तालुका उपाध्यक्ष हनुमंत कोळपे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यातील विविध महामंडळाची कार्यकारीणी व विभागीय स्तरावरील महामंडळाची कार्यकारीणी जाहीर करावी तसेच जिल्हा व तालुका स्तरावरील अशासकीय कमिट्या त्या त्या पालकमंत्री यांना जाहीर करण्याची आदेश महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता पूर्वी करण्याचे आदेश देण्याची मागणी भारतीय किसान मोर्चाचे धाराशिव तालुका उपाध्यक्ष हनुमंत कोळपे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

निवेदनाच्या प्रति महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही पाठविलेल्या आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



### पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी घेतले श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन

**धाराशिव, दि.५ ऑक्टोबर -**
सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी शारदीय नवरात्र महोत्सवाच्या दुसऱ्या माळेच्या दिवशी आज ४ ऑक्टोबर रोजी तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. त्यावेळी राज्यातील जनतेच्या उत्तम आरोग्यासाठी देवीजींना साकडे घातले. यावेळी जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जि.प.चे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख, पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी आशिष सोनटक्के

**जळकोट, दि.५ ऑक्टोबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य गणेशराव सोनटक्के यांचे सुपुत्र, जळकोटचे माजी ग्रा.पं.सदस्य व तालुक्याचे आ. राणाजगजियतसिंह पाटील यांचे कट्टर समर्थक आशिष सोनटक्के यांची तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी बिनविरोध झाली निवड झाली आहे. सभापती पदावर ॲड. आशिष सोनटक्के हे बिनविरोध निवडून आले. याप्रसंगी आ. पाटील यांच्या हस्ते सोनटक्के यांचा सत्कार करण्यात आला.



### मराठीला अभिजात भाषेचा दर्जा; सिध्देश्वर विद्यालयात आनंद उत्सव

**कसगी, दि.५ ऑक्टोबर -**
जगामध्ये भाषेला माय समजणारा आईची दर्जा देणारा एकमेव राज्य म्हणजे महाराष्ट्र महाराष्ट्राची बोली भाषा मराठी याच मराठीला अभिजात दर्जा मिळावा म्हणून अनेक वर्षांपासून सामाजिक राजकीय लढा अविरत चालू होता. दसऱ्याच्या मुहूर्तावरती केंद्र सरकारने मराठीला अभिजात दर्जेचा दर्जा देऊन महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेचा अस्मिता मराठीला अभिजात दर्जेचा भाषा दिला. त्याबद्दल श्री सिद्धेश्वर विद्यालय उमरगा तालुक्यातील कसगी येथे केंद्र सरकारचे अभिनंदन आणि आनंदोत्सव साजरा केले. यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे यांच्या हस्ते मराठी ग्रंथ आणि प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी भाऊसाहेब पाटील, विद्यार्थी, सर्व शिक्षक बांधव, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### सुनील सुर्यवंशी, अशोक राठोड यांचा सत्कार

**लोहारा, दि.५ ऑक्टोबर -**
होर्टी केंद्र अंतर्गत जि.प.प्रा.शाळा जळकोटवाडी (नळ) येथे दि.४ ऑक्टोंबर रोजी तुळजापूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सुनील सूर्यवंशी, व्हॉ. चेअरमनपदी अशोक राठोड यांची निवड झाल्याबद्दल शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतच्या संयुक्त विद्यमाने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डी.डी.कदम, निळकंठ इटकरी, सत्यवान अभिवंत, सरपंच शिवाजी कदम, भरत सोमवंशी, मुख्याध्यापक उमेश भोसले, सुधीर लष्करे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### हाजी इस्माईल सौदागर यांचे निधन

**परंडा, दि.५ ऑक्टोबर -**
परंडा शहरातील रहिवासी राजकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक हाजी इस्माईल सौदागर यांचे शनिवार दि.५ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात सहा मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असून ते माजी नगराध्यक्ष झाकीर सौदागर व नगरसेवक साबीर सौदागर यांचे वडील होत.



# डिसेंबर अखेरपर्यंत कृष्णा खोऱ्यातील पाणी तुळजापूरपर्यंत येईल : आ. राणाजगजितसिंह पाटील









**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑक्टोबर -**

कृष्णा खोऱ्यातून धाराशिव जिल्ह्याला मिळणारे हक्काचे सात टीएमसी पाणी डिसेंबर अखेरपर्यंत जिल्ह्यात तुळजापूर जवळील राम दारा तलावात येईल आणि या पाण्यामुळे दहा हजार ८६२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल अशी माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आज तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ येथे पंपग्रह पाहणी दरम्यान पत्रकारांना दिली.

यावेळी सिंचन विभागाचे अधीक्षक अभियंता भारत शिंगाडे कार्यकारी अभियंता नाईक, चावरे तसेच भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, तुळजापूरचे नगराध्यक्ष सचिन रोचकरी, भाजपा तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, विनोद गंगणे, आनंद कंदले यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सिंदफळ येथील प्रगतीपथावर असलेल्या लिफ्ट इरिगेशनच्या पंप हाऊसची पाहणी झाली.

कृष्णा खोऱ्यातील हक्काचे धाराशिव जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यातील सात टीएमसी पाणी या योजनेच्या दुसऱ्या टप्प्या अंतर्गत तुळजापूर, उमरगा, लोहारासाठी २.२४ अब्ज घनफूट पाणी येणार असून या उपसा सिंचन योजना दोन मधील स्थापत्य कामे ८१ टक्के पूर्ण झाले असून यांत्रिकी कामे ६५ टक्के पूर्ण झाले आहेत. विद्युत कामे ८० टक्के पूर्ण झाले आहेत. तर भूसंपादन ९५ टक्के क्षेत्राचे पूर्ण झाले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या उपसा सिंचन योजना दोनमध्ये सहा पंपग्रहे, सहा उर्ध्वगामी नलिका, पाच जोड कालवे, सात तलावांची कामे आहेत. उपसा सिंचन योजना दोन मधील टप्पा पाच अंतर्गत सिंदफळ ते रामदारा या टप्प्यातील स्थापत्य विद्युत व यांत्रिक घटकांची कामे जवळपास पूर्ण झाली असून जलसंपदा विभागाने या टप्प्याची चाचणी करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

डिसेंबर अखेरपर्यंत धाराशिव जिल्ह्यात येण्यास कसलीही अडचण नाही, मध्यंतरी सततच्या पावसामुळे या कामात अडचणी आल्या, आता मात्र ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. वेगाने सुरू आहेत अशी माहिती पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पत्रकारांना दिली. जिल्ह्याच्या विकासाला मोठ्या प्रमाणात हातभार लागण्यासाठी कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे निधी मिळाला आणि ही कामे वेगाने सुरू झाली.

मागच्या महिन्यात उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या योजनेसह धाराशिव जिल्ह्यातील सर्व विकास कामांचा घेतलेला आढावा यामुळे ही कामे आता वेगाने सुरू असून हे पाणी आल्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खूप मोठा फायदा होणार आहे, असे प्रतिपादन आ. पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी सिंदफळ पंप हाऊसची तांत्रिक माहिती कार्यकारी अभियंता नाईक यांनी पत्रकारांना दिली. या पंपग्रहाच्या बहुतेक कामांना आता गती मिळाली असून लवकरच म्हणजे फक्त विद्युत जोडणी झाल्यानंतर पूर्ण होईल अशी माहिती त्यांनी दिली.

#### काँग्रेसचे धीरज पाटील झाले आक्रमक...

या पत्रकार पाहणी दौऱ्या दरम्यान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांनी काम पूर्ण होण्याआधीच याचे उद्घाटन कसे करता? या प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या शेतकऱ्यांना अद्याप मावेजाही मिळाला नाही तू केव्हा मिळणार? ही योजना फक्त या सरकारच्याच काळात नाही तर यापूर्वीच्या सरकारच्या काळात मंजूर झाले असून त्याचे श्रेय घेण्यासाठीच हा दौरा आयोजित केल्याचे आरोप केले.

#### भाजप-काँग्रेसमध्ये गोंधळाचे वातावरण...

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धीरज पाटील यांना या कार्यक्रमाला आणि पाहणी दौऱ्याला थांबण्याची विनंती केली आणि माहिती घ्या तुम्ही पण असा आग्रह केला. हा उद्घाटनाचा कार्यक्रम नाही हा फक्त पाहणी दौरा आहे असे सांगितले. तरीही त्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे पाहणे दौऱ्यात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

सिंदफळ पंपग्रहापासून हे पाणी उचलून तुळजापूर जवळच्या रामदरा साठवून तलावात आणले जाणार आहे आणि तेथून पुढे पुढच्या टप्प्यात हे पाणी उमरगा लोहारा या तालुक्यांपर्यंत नेले जाणार आहे.

## कुलस्वामिनी तुळजाभवानीची नित्योपचार पूजा; सिंह वाहनातून काढली छबिना मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑक्टोबर -**

तुळजापूर येथे सुरू असलेल्या शारदीय नवरात्र महोत्सवात आज ५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीजींची नित्योपचार पूजा करण्यात आली. शारदीय नवरात्राची आज तिसरी माळ आहे.



आज पहाटे सकाळी ६ ते सकाळी १० या वेळेत देवीजींची अभिषेक पूजा करण्यात आली. शनिवारी पहाटे १ वाजेच्या सुमारास चरणतीर्थ होवुन श्री तुळजाभवानी मातेच्या धर्म दर्शनास प्रारंभ झाला. सकाळी पासुनच भाविकांनी देवी दर्शनार्थ गर्दी केली होती. सकाळी ६ वाजता देविजीस भाविकांचे अभिषेक प्रारंभ करण्यात आले. ते संपल्यानंतर देविजीस वस्त्रोलंकार घालुन नित्योपचार पूजा करण्यात आली. शनिवारी दिवसभर धर्म, मुख, अभिषेक, पेड आदी दर्शन रांगा भाविकांनी भरभरुन वाहिल्या. सायंकाळी ७ वाजता देविजीस दही, दुध, पंचामृत अभिषेक पुजा करण्यात आल्यानंतर देविजीस वस्त्रोलंकार घालण्यात आले. त्यानंतर आरती झाली. पारंपरिक पद्धतीने श्री तुळजाभवानी देवीजींचे दररोज नियमित विविध धार्मिक विधी विधीवत पार पाडले जातात. ७ ऑक्टोबरपासून श्री तुळजाभवानी देवीजींच्या विविध अलंकार पूजेस सुरुवात होणार आहे. ललित पंचमीनिमित्त ७ ऑक्टोबर रोजी रथ अलंकार महापूजा, ८ ऑक्टोबर रोजी मुरली अलंकार महापूजा,९ ऑक्टोबर रोजी शेषशाही अलंकार महापूजा, १० ऑक्टोबर रोजी भवानी तलवार अलंकार महापूजा आणि महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा ११ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता श्री देवीजींची छबिना मिरवणूक सिंह या वाहनातून काढण्यात आली. या मिरवणुकीत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





**तुळजापूर :** तुळजाभवानी मंदिर परिसरात आकर्षक असा फुलांचा आरास करण्यात आला होता. हा आरास हजारो देवीभक्तींचे लक्ष वेधून घेत होता.

## आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांच्या स्वखर्चातून तेरखेडा येथे शेतरस्ते करण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.५ ऑक्टोबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून तसेच स्वखर्चातून शेतरस्ते करण्यास सुरुवात केली आहे.

तेरखेडा येथील दोन किलोमीटर लांब असलेला बांगरवाट हा महत्वाचा रस्ता आहे.

या रस्त्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी असून केळी ऊस यासारखी बागायती पिके या शिवारात आहेत. तसेच सध्या सोयाबीन काढणीचा सिजन सुरू आहे. परंतु रस्ता प्रचंड खराब असल्यामुळे शेतकऱ्यांना पिकाची मळणी वेळेवर करता येत नाही.



त्यामुळे शेतकरी हैराण झाले होते. रस्त्यावर चिखल आणि पाणी साचत असल्याने शेतकऱ्यांना पाण्यातून वाट काढत जावे लागत होते. तसेच शेती संबंधित विविध कामे करण्यासाठी वर्षानुवर्षे या रस्त्यावरुन जाताना शेतकऱ्यांना अडचणींना सामना करावा लागत असे. याबाबत बांगरवाट शिवारातील शेतकऱ्यांनी धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजीराव सावंत यांचे पुतणे केशव सावंत यांची भेट घेऊन रस्ता करण्याची मागणी केली होती.

पालकमंत्री तानाजीराव सावंत यांनी ही बाब लक्षात घेऊन दि.३ ऑक्टोबर रोजी रस्त्याच्या कामास सुरवात करण्यात केली आहे.

त्यामुळे तेरखेडा येथील शेतकरी वर्गातून आनंद व्यक्त केला जात आहे.

## जळकोट येथे ५ योजनांची मोफत नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.५ ऑक्टोबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालय, टाटा एआयजी, बेंगलोर येथील स्वस्ति, धाराशिव येथील एनएमपी प्लस व जळकोट येथील अंबव्वा महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने गावातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांची मोफत नोंदणी करण्यात आली.

जळकोट ग्रा.पं. कार्यालयात शनिवारी आठवडी बाजारा दिवशी नागरिकांसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेचा शुभारंभ सरपंच गजेंद्र कदम यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी दहा ते पाच या वेळेत जवळपास जळकोट गावातील ५६० लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. या लाभार्थ्यांना योजनेचे कार्ड उपलब्ध होणार आहे. या नोंदणी मोहिमेमध्ये आयुष्यमान भारत योजना कार्डचे ४००, ई-श्रम कार्ड १००, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना १० व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेच्या ५० लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. गावातील नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्तने सहभाग नोंदवला. यासाठी ग्राम पंचायत कार्यालयाचे ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी सहकार्य केले.

या नोंदणी मोहिमेसाठी जिल्हा समन्वयक आकाश नालेगावकर, अंबवा महिला मंडळ अध्यक्ष कस्तुरा कारभारी, महादेव ढगे, अलीम शेख, साजेदा शेख, छाया चव्हाण, समीर खान, समीना मुजावर आदि विविध संस्थेचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## नियम मोडणाऱ्या १०६ वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव दि.५ ऑक्टोबर -**

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.४ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा, नियम भंग प्रकरणी एकुण १०६ कारवाया करुन ८५ हजार ५०० रूपये 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## अतिवृष्टीने बाधित एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये : पालकमंत्री सावंत


**अतिवृष्टीने झालेल्या पीक नुकसानीचा घेतला आढावा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑक्टोबर -**

गेल्या आठवड्यात धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, असा नुकसानबाधित एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता जिल्हा प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी ४ ऑक्टोबर रोजी आढावा बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक हॉलमध्ये अतिवृष्टीने शेतीच्या नुकसानीचा आढावा पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे आयोजित बैठकीत घेतला. यावेळी ते बोलत होते.

बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, अप्पर जिल्हाधिकारी शिरीष यादव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. दुरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार सहभागी होते.

पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत पुढे म्हणाले की, सन २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या बाबतीत पिक विमा कंपनीने अनेक गैरसोयीची कामे केले आहेत. कंपनीकडून देण्यात येणारे रकमेचे धनादेश हे चुकीच्या पद्धतीने आणि कमी रकमेचे दिले होते. मात्र यावेळी पिक विमा वाटप करताना शेतकऱ्यांना समान व व्यवस्थित वितरण होईल या दृष्टीने काम करावे. विमा कंपनीकडून देण्यात येणारी रकमेचे धनादेश



याची पडताळणी करून घ्यावी. ज्या शेतकऱ्यांच्या केवायसी पेंडिंग आहे त्याची केवायसी तात्काळ करून घ्यावी, असेही ते म्हणाले. रब्बी हंगाम सध्या सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना लागणारे खते बियाणे आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करून द्यावेत तसेच बोगस खत विक्री होणार नाही याची दक्षता ही प्रशासनाने घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले आहे.

जिल्ह्यात गाव तेथे स्मशानभूमी हे अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाचा आढावाही पालकमंत्री डॉ. सावंत यांनी यावेळी घेतला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना निर्धारित वेळेत हे काम करण्याचे निर्देशही दिले. तसेच जिल्ह्याला आकांक्षित जिल्ह्याच्या यादीतून बाहेर काढण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यातील कोणतीही पात्र महिला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन जिल्ह्यातील ज्या ४२ हजार ६३८ महिलांचे बँक खाते आधार संलग्न करणे बाकी आहे, ते आधार संलग्न करून त्यांच्या तांत्रिक अडचणी दूर करून त्यांना योजनेचा लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. या महिलांच्या बँक खात्यात १० ऑक्टोबरपर्यंत दोन महिन्याची रक्कम जमा होईल याचे नियोजन करावे. यासाठी जिल्ह्यातील संबंधित बँकेत सोमवारी व मंगळवारी शिबीर आयोजित करावे असे निर्देशही पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी यावेळी दिले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी माने यांनी जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती यावेळी दिली. जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ मंडळात अतिवृष्टी झाल्याचे सांगून जिल्ह्यात १ लाख ३४ हजार ४३४ हेक्टरवर पिकांचे नुकसान झाल्याचे विमा कंपनीला कळविण्याचे माने यांनी सांगितले.

# यंत्रणांनी नवरात्र काळात अलर्ट मोडवर काम करावे : पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत

## श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवाचा आढावा



तभा वृत्तसेवा

धाराशिव, दि.५ ऑक्टोबर - श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवाला ३ ऑक्टोंबरपासून सुरुवात झाली आहे.या महोत्सवादरम्यान तुळजापूर येथे राज्यासह आंध्रप्रदेश,तेलंगाना व कर्नाटक राज्यातील भाविक मोठ्या संख्येने दर्शनाला येतात.येणाऱ्या भाविकांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही यासाठी संबंधित यंत्रणांनी महोत्सव काळात अलर्ट मोडवर काम करावे, असे निर्देश पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी दिले.

आज ४ ऑक्टोबर रोजी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवाचा विविध यंत्रणांनी केलेल्या तयारीचा आढावा घेताना पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत बोलत होते. सभेला जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन, धाराशिवचे उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता चव्हाण तुळजापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख व तहसीलदार तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक माया माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले की, तुळजापूर येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा आयोजित आरोग्य शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध करून द्याव्यात. तुळजापूर येथे येणाऱ्या सोलापूर लातूर व धाराशिव महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी रुग्णवाहिका तैनात कराव्यात. एखादी या मार्गावर दुर्दैवाने दुर्घटना झाल्यास घटनास्थळी १० ते १५ मिनिटात रुग्णवाहिका पोहचली पाहिजे.या महामार्गावर जे अपघात प्रवण ठिकाण आहेत, त्या ठिकाणी सुद्धा रुग्णवाहिका तैनात असावी व तेथे वाहतूक पोलीस उपस्थित असावा. तुळजापूर शहरात म्बुलन्स बाईक असाव्यात. गर्दी आणि अरुंद रस्त्यातून त्यांना रुग्णांपर्यंत पोहोचणे सहज शक्य होईल. तुळजापूर बसस्थानक व खाजगी वाहतूक तळाच्या ठिकाणी सुद्धा म्बुलन्स बाईक तैनात असाव्यात असे ते म्हणाले.

कोजागिरी पौर्णिमेला सुद्धा मोठ्या प्रमाणात तुळजापूर येथे गर्दी असते असे सांगून प्रा.डॉ. सावंत म्हणाले, त्या दिवशी सुद्धा आरोग्यसेवा उपलब्ध करून द्याव्यात. नगरपरिषदेने शहरात कायम स्वच्छता कशी राहील याकडे लक्ष द्यावे.पिण्याच्या पाण्याचे नमुने नियमितपणे तपासावे.नवरात्र काळात खाद्यपदार्थांची अन्न औषध प्रशासनाने नियमितपणे तपासणी करावी.आवश्यक त्या ठिकाणी पोलिसांनी बॅरिकेट्स लावावेत. पोलिसांनी तुळजापूर शहरात येणाऱ्या भाविकांशी सौजन्याने वागावे, असे ते यावेळी म्हणाले.

शहरात किराणासह इतर आवश्यक साहित्य घेऊन येणाऱ्या वाहनांची प्रवेश वेळ निश्चित करावी, असे सांगून प्रा.डॉ सावंत म्हणाले की, मंदिरातील वॉर्डमध्ये पोलिसांच्या सायबर सेलचे दोन कर्मचारी तीन शिफ्टमध्ये उपलब्ध असावे.

त्यामुळे प्रत्येक बाबीवर बारकाईने लक्ष ठेवता येईल. यंत्रणांनी नवरात्र काळात कामांचे विकेंद्रीकरण करावे. नवरात्र दरम्यान आपत्ती व्यवस्थापनासह विविध यंत्रणांनी एक वेळ निश्चित करून रंगीत तालीम घ्यावी.असे प्रा.डॉ.सावंत यावेळी म्हणाले.

या बैठकीला भोपे पुजारी मंडळ, पाळेकर पुजारी मंडळ व उपाध्ये पुजारी मंडळाचे प्रतिनिधी, तुळजापूर तहसीलदार बोळंगे यांच्यासह विविध यंत्रणांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# पाटील कुटूंबियाचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्याकडून सांत्वन

## परंडा येथे शिवसेना कार्यालयात कै.ज्ञानेशर पाटील यांना दानवे यांनी वाहीली श्रद्धांजली



परंडा, दि.५ ऑक्टोबर - शिवसेना नेते दिवंगत माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या निधनामुळे परंडा भूम वाशी मतदारसंघावर व पाटील कुटुंबावर जो आघात झाला त्यांची दखल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने घेतली आहे.

शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांचा शोक संदेश घेऊन महाराष्ट्रातील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे व शिवसेना पक्षाचे भूम-वाशी तालुक्यातील नेत्यांनी परंडा येथे येऊन दि.५ ऑक्टोंबर रोजी शिवसेनेचे धाराशिव जिल्हाप्रमुख रणजीत ज्ञानेश्वर पाटील, विश्वजीत पाटील, सत्यजित पाटील यांच्यासह पाटील कुटुंबातील सर्व सदस्यांचे सांत्वन करून त्यांना दिलासा दिला. एवढेच नव्हे तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सदैव पाटील कुटुंबासोबत असल्याची ग्वाही विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दिली आहे.

### शिवसेनेचा निष्ठावान पाईक हरपला : पक्षप्रमुख उद्धव ठाकरे

शिवसेना उबाठाचे ज्येष्ठ नेते, परंडा विधानसभेचे माजी आ. ज्ञानेश्वर पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद, धक्कादायक आहे. ज्ञानेश्वर पाटील यांनी प्रतिकूल परिस्थितीत एकनिष्ठ राहून शिवसेनेचा विचार घरोघरी पोहोचवला. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी शिवसेनेचा विचार सोडला नाही, त्यांच्या निधनाने अनुभवी लोकप्रतिनिधी व शिवसेना विचारांचा एक निष्ठावान पाईक हरपला असल्याची शोक भावना शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या शोक संदेशात व्यक्त केले आहेत.

शिवसेना उबाठा कार्यालयात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी व तम्माम शिवसैनिकांनी दिवंगत नेते माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांना पुष्प अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली यावेळी वाशीचे शिवसेना तालुका प्रमुख विकास मोळवणे, भूमचे तालुका प्रमुख दिलीप शाळू तसेच परंडा येथील शिवसेनेचे नेते जनार्धन मेहर, शिवाजी मेहर, सुभाष शिंदे, संजय कदम, संतोष गायकवाड, प्रशांत गायकवाड, जैन मालक, शंकर जाधव, शंकर इतापे, दत्ता मेहर, तर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे राहुल बनसोडे, नसीर शहाबर्फीवाले, श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, खय्युम तुटके, बापू मिस्कीन आरपीआयचे संजय बनसोडे, कार्यकर्त तानाजी शिंदे आदिसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वैभव लेणेकर यांना कृषी सेवा रत्न पुरस्कार प्रदान

## राज्यपालांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव



तभा वृत्तसेवा

धाराशिव, दि.५ ऑक्टोबर - धाराशिव येथील तालुका कृषी कार्यालय येथे कार्यरत असलेले वैभव लेणेकर यांना कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्यामार्फत अधिकारी कर्मचारी यांना दिला जाणारा पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार सन २०२२ महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला

नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया वरळी, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला

वैभव लेणेकर यांनी वानेवाडी, हिंगळजवाडी, किणी या गावात महिला शेती शाळेचा अभिनव उपक्रम राबविला या प्रयोगाद्वारे कृषी विभागाचे आधुनिक तंत्रज्ञान व विविध योजना महिला शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

या कार्यक्रमाची दखल घेऊन तत्कालीन कृषी सचिव सुहास दिवसे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी स्वतः महिला शेतीसाठी वर्गात उपस्थित राहून या स्तुत उपक्रमाची प्रशंशा केली होती

वैभव लेणेकर यांनी मौजे वानेवाडी, व हिंगळजवाडी येथे सोयाबीन पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी रुंद सरी वरंबा पद्धत तसेच टोकन पद्धतीने सोयाबीन लागवडी बाबत शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून जवळपास १ हजार एकर क्षेत्रावर सोयाबीन पिकाची टोकन व बीबीएफ पद्धतीने लागवड करून घेतली त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात भर पडली.

तसेच सोयाबीन पिकाच्या पीक स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत भाग नोंदवून जिल्ह्यात व तालुक्यात प्रथम क्रमांकाची बक्षीस प्राप्त केले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अधिक उत्पादनाबाबत सकारात्मक स्पर्धा निर्माण झाली

वैभव लेनेकर हे मागील १५ वर्षांपासून धाराशिव तालुक्यातील शेतकऱ्यांना विविध योजना व उपक्रमांची माहिती विविध शेतकरी मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम तसेच शेती शाळेच्या माध्यमातून पोहोचवीत आहेत. सन २०२१ मध्ये महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात आलेला इ-पिक पाहणी कार्यक्रमांतर्गत मौजे वानेवाडी व बालपिरवाडी या गावात १०० टक्के शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी करून घेतली त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले होते.

कोरोना काळात धान्यदान संकल्पनेतून शेतकरी यांच्याकडील धान्य व भाजीपाला गरजू व्यक्तीपर्यंत उपलब्ध करून दिले तसेच बांधावर खत योजनेअंतर्गत २५० मे. टन खत शेतकऱ्यांपर्यंत उपलब्ध करून दिला त्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झाला.

वेळेची बचत झाली. तसेच सोयाबीन पिकाची उत्पादकता वाढीसाठी त्यांनी विविध रेडिओ टॉक व प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. सोयाबीन घरगुती बियाणे वापराबाबत घरोघर जाऊन जनजागृती केली. महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक शेतकरी मासिक वर्गणीदार बनविले.

या त्यांच्या कार्याची दखल घेऊन तत्कालीन पालकमंत्री शंकरराव गडाख यांनी त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविले होते.

कृषी विभागामार्फत आयोजित विविध कृषी महोत्सव, क्रीडा महोत्सव व रानभाजी महोत्सव या सारख्या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. या विविध उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीसाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्यामार्फत दिला जाणारा कृषी सेवा रत्न पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## ज्येष्ठ नागरिक दिवस उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

धाराशिव, दि.५ ऑक्टोबर - जागतिक जेष्ठ नागरिक दिन म्हणुन दरवर्षी साजरा करण्यात येतो.यावर्षी १ ऑक्टोबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यांच्या कार्यालयाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हा विधि सेवा प्रधिकरणचे सदस्य सचिव वसंत यादव हे उपस्थित होते.ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष ह.भ.प.महादेव महाराज हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे इतर मान्यवरही उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा जोतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहु महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.ज्येष्ठ नागरिकांची कार्यशाळा,चर्चासत्र घेण्यात आले.समाज कल्याण विभागाकडून राबविण्यात येणा-या वयोश्री व तिर्थदर्शन योजनेची माहिती देण्यात आली. तसेच आई-वडील व जेष्ठ नागरिक यांचे कल्याणार्थ निवाह योजना यांची सविस्तर माहिती देण्यात आली.

सर्व उपस्थित मान्यवरांचे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# तुळजाभवानी महाविद्यालयात विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा: आमदार राणाजगजितसिंह पाटील



तभा वृत्तसेवा

तुळजापूर, दि.५ ऑक्टोबर - येथील तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावर विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आ. राणाजगजीतसिंह पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी ते बोलताना म्हणाले की, तुळजापूर हे आई तुळजाभवानीच्या नावाने ज्याप्रमाणे प्रसिद्ध आहे अगदी त्याचप्रमाणे तुळजापूर हे शैक्षणिकदृष्ट्या सुद्धा प्रगत झाले पाहिजे भारताच्या नकाशात तुळजापूर हे शैक्षणिक दृष्ट्या प्रगत झालेले दिसून आले पाहिजे भविष्यामध्ये तुळजापूर शहरांमध्ये केंद्रीय विद्यापीठाची स्थापना होणार आहे. या विद्यापीठात तरुणांना विविध कौशल्यावर आधारित कोर्सेस उपलब्ध होणार आहेत. ज्या माध्यमातून तरुणांना वेगवेगळ्या प्रकारचे रोजगार उपलब्ध होतील जेणेकरून आपल्या भागातील तरुणांची बेरोजगारी संपुष्टात येईल भविष्यामध्ये आपल्याला अनेक सामाजिकदृष्ट्या प्रगतिचे अशी कामे करायची आहेत. ज्या कार्याच्या माध्यमातून समाजाचे हीत साधले जाईल.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन पवार बोलताना यावेळी म्हणाले की, तुळजापूर मध्ये एक प्रकारची शैक्षणिक क्रांती घडून येऊ शकते कारण जिथे श्रद्धा असते तिथे ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार हे शिक्षणाच्या माध्यमातूनच प्राप्त होऊ शकतात यासाठीच तुळजाभवानी महाविद्यालय हे आम्ही तुळजापूरकर शिक्षणासाठी एक पाऊल पुढे ही संकल्पना घेऊन तुळजापूर मध्ये शैक्षणिक दृष्ट्या कार्य करणार आहे.

या कार्यासाठी तुळजापूर वासियांनी सुद्धा आपल्या परीने सहकार्य करावे, ही अपेक्षा आहे.

यावेळी सचिन रोचकरी यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.धनंजय लोंढे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक कोरे यांनी केले. तसेच यावेळी प्राचार्य दौंड, मुख्याध्यापक येलगुंडे यांची देखील विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रा.राजा जगताप यांनी मांडले.

# शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन तब्बल १५४ कोटी

तभा वृत्तसेवा

नळदुर्ग, दि.५ ऑक्टोबर - नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन तब्बल १५४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असुन यामुळे नळदुर्ग शहरात महत्वाची विकास कामे होत आहेत. नळदुर्ग शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच शहराच्या विकास कामांसाठी इतका मोठा निधी उपलब्ध झाला आहे.

आ.राणा जगजितसिंह पाटील यांनी नळदुर्गच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन शहराच्या सुधारीत पाणीपुरवठा योजनेचे ४६ कोटी रुपये खर्चाचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर नळदुर्गकरांना दररोज नळाद्वारे पाणी मिळणार आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन सर्वात महत्वाचे काम कोणते होत असेल, तर ते म्हणजे पाणीपुरवठ्याचे काम होय.

नळदुर्गकरांना बोरी धरणात मुबलक पाणी असुनही पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते ही अतिशय दुर्दैवाची बाब होती. मात्र आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्गकरांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविला आहे. त्याचबरोबर शहरात अप्पर तहसिल कार्यालय सुरु करण्यासाठी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मंजुरी मिळवुन दिली आहे. याबद्दल शहरातील नागरीकांनी आ.राणा जगजितसिंह पाटील यांचे आभार मानले आहे.

त्याचबरोबर या निधीतुन भव्य अशी बसवसृष्टी, कै. वसंतराव नाईक स्मारक, मराठवाडा मुक्तीसंग्राम स्मारक, शादीखाना ही कामे होणार आहेत. या कामांमुळे नळदुर्ग शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी भव्य अशी ई-लायब्ररी व अद्यायवत अभ्यासिका केंद्र उभारण्यात येणार आहे.

त्याचबरोबर आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन तब्बल ९३ कोटी रुपये खर्चाची शहरातील विविध ठिकाणी रस्त्याची कामे होत आहेत. यामध्ये सर्वात महत्वाचे रस्त्याचे काम म्हणजे राष्ट्रीय महामार्ग ते जुन्या खंडोबा मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम आहे. या रस्त्याची रुंदी वाढविण्यात आली आहे.

त्यामुळे खंडोबा यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना आता वाहतुक कोंडीचा त्रास सहन करावा लागणार नाही. भाविक तसेच चिकुंद्रा, मुर्टा, किलज, सलगरा दिवटी या भागात जाणाऱ्या नागरीकांसाठी देखील हा रस्ता सोईचा ठरणार आहे.त्याचबरोबर शहरातील विविध भागात गटार व रस्त्याची कामे, सभागृह, जॉगिंग ट्रॅक, बगिचा विकसित करणे, सभामंडप, व्यायाम शाळा, सांस्कृतिक सभागृह नुतनीकरण करणे ही कामे होत आहेत.

त्याचबरोबर शहरातील विविध दहा ठिकाणी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या निधीमधुन आर. ओ. प्लॅन्ट उभारण्यात आले आहेत याचा शहरातील नागरीकांना मोठा फायदा झाला आहे.

या आर. ओ. प्लॅन्टमधुन फक्त पाच रुपयांमध्ये २० लिटर शुद्ध पिण्याचे पाणी नागरीकांना मिळाले. पाणीटंचाई तसेच उन्हाळ्यात नागरीकांना या आर. ओ. प्लॅन्टचा मोठा आधार मिळाला आहे. भीमनगर येथेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन कोट्यावधी रुपये खर्चाची विकासकामे होत आहेत.

येणाऱ्या काळात औद्योगिक वसाहत, पर्यटकांना राहण्यासाठी अद्यायावत भव्य असे विश्रामगृह, कृषी उत्पन्न बाजार समितीची उप बाजारपेठ ही महत्वाची कामे पुर्ण करायची आहेत यासाठी नळदुर्गकरांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना साथ देणे गरजेचे आहे.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग शहरात एक विकासाचे पर्व सुरु झाले आहे.

# पुन्हा नवरात्रीच्या अजाबळी प्रथा सुरु करण्याची येरमाळाकरांची मागणी

तभा वृत्तसेवा

येरमाळा, दि.५ ऑक्टोबर - येथील येडेश्वरी मंदिर देवस्थानने ट्रस्टने सहा वर्षांपूर्वी देवीच्या पिढयान पिढ्या चालत आलेल्या (बकरा बळी) दिल्या जाणाऱ्या भोगीचा कार्यक्रम होम हवनातील अजाबळी मंदिर परिसराचे पावित्र्य धोक्यात येत असल्याने बंदी घातली होती. हे निर्बंध बाहेरगावच्या भाविकांकडून अवघ्या सहा महिन्यात मोडीत काढत मंदिर परिसरात भोगीचे कार्यक्रम चालु झाल्याने देवीला बकराबळी देण्याचा भोगीचा यावर्षीच्या होमहवनात नवरात्रीच्या अजाबळी देण्याची मागणी गावातील भाविक, होम अजाबळी भाविकांतुन होत आहे. शिवाय देवस्थान ट्रस्टने मंदिरा ऐवजी मंदिर परिसरात भोगी कार्यक्रम सुरु केल्याने यंदा होमहवनात अजाबळी दिला जावा अशी मागणी होत आहे.

### भोगी म्हणजे काय...

हिंदु समाजात मुलाच्या लग्नानंतर बकऱ्याच्या कार्यक्रमाचे जागरण गोंधळ कार्यक्रम असतो तसा येरमाळ्याच्या मूळ रहिवास्यांना देवीची भोगी करण्याची प्रथा होती. भोगी दिवशी रात्रीच्या आरतीला देवीला साडी, चोळी, पानाचा विडा (तांभूळ) पुरणपोळीच्या नैवेद्याने घंगाळी भरुन, बकऱ्याचा नैवेद्य दाखवून जेवनावळी होत असे, ही देवीची अट्टाहास सायासाने भावभक्तीने केलेली भोगी पाहुन पाहुणे रावळे भोगीच्या तारखा घेऊन कार्यक्रम करत असतं तर कोणी माझे अमुक कामं तमुक अडचण दूर होउदे म्हणुन नवस बोललेली भोगी करत असते.

जिल्ह्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या येरमाळा येथील श्री येडेश्वरी देवी मंदिरातील बकराबळी (भोगी) प्रथा बंद करण्याचा निर्णय (५ जुन २०१७) मुख्य मंदिरात आयोजित देवस्थान ट्रस्टच्या बैठकीत घेण्यात आला होता.

येडेश्वरी देवीच्या दर्शनाला राज्यासह कर्नाटक, आंध्र कर्नाटक इतर राज्यातील लाखो भाविक येतात. देवीचा नवस फेडताना भाविक देवीस पुरनपोळीच्या नैवेद्यासह नारळ, हार, टिळे, डोळे, साडी, चोळीने ओटी भरुन तर कांही भाविक पारंपरिक नवसाच्या भोगीचा (बकऱ्याचा) कार्यक्रम करत असते. स्थानिक गावातील मूळरहिवासीयांना मुलाच्या लग्नानंतर देवीला जागारण गोंधळा ऐवजी बकऱ्याची भोगी करण्याची प्रथा होती.

मात्र, भोगी कार्यक्रमावर बंदी घातल्यापासून गावातील मुलाचे नवीन लग्नाचे अनेकांची भोगी कार्यक्रम सहा वर्षांपासून प्रलंबित होते,बकराबळी वर बंदी घातल्यानंतरही अवघ्या सहा महिन्यात बाहेरगावच्या भाविकांनी ट्रस्टचा नियम झुगारुन बकऱ्याचे कार्यक्रम चालु केले चैत्र, श्रावण होम बलिदाना पर्यंत अर्धा अश्विन, सोडता दररोज पन्नास ते शंभर बकऱ्याचे कार्यक्रम होतात.

गावतील कांही गावकऱ्यांनी बाहेर गावचे भाविक बकऱ्याचे देवदेव करतात मग गावच्या मानाच्या भोग्याच का बंद असा पवित्रा व्यक्त केल्याने ट्रस्टने गेल्या जानेवारी महिन्यात भोगीच्या पावत्या द्यायला चालु केले आहे. मात्र, देवीला पुरणपोळीचा नैवेद्य आणि बकऱ्याचा नैवेद्य पायरीला अशी पळवाट काढली आहे.

त्यामुळे नवरात्रीच्या होमहवनात बकऱ्याचा अजाबळी देणाऱ्या पिढयानपिढयाचे अजाबळी देणाऱ्या मानकऱ्यातून यंदा अजाबळी दिला जावा अशी मागणी होत आहे. पूर्वी देवीला भोग्या सुरु होत्या तेंव्हा वर्षा अखेरच्या ३१ डिसेंबर दिवशी पुढच्या वर्षीच्या भोगीच्या वर्षाच्या तारखाचे एका दिवसात बुकिंग व्हायचे.

### ...असा घेतला होता देवस्थान ट्रस्टने निर्णय

भोगीच्या कार्यक्रमांमध्ये तळीरामांची संख्या वाढत असून, कार्यक्रमात व्यत्यय येऊन देवीचे पावित्र्य धोक्यात येत आहे. भाविकांच्या कौटुंबिक वाद वाढले मंदीर परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरु लागली,याचा त्रास भाविकांना सहन करावा लागतो त्यामुळे देवीच्या मुख्य मंदिरावर होणारा भोगीचा बंद करण्यासाठी देवीने कौल दिल्याचे सांगत ५ डिसेंबर २०१७ ला ३१ डिसेंबर पर्यंत बुक असणाऱ्या भोग्या नंतर १ जानेवारी २०१८ पासुन भोगी बंद नियम लावण्यात आला.

# शक्ती वंदन यात्रा पुर्व तयारी बैठक

तभा वृत्तसेवा

धाराशिव, दि.५ ऑक्टोबर - महायुती सरकारने राबविलेल्या लोककल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचवून राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार सत्तेत यावे, यासाठी भाजपच्या वतीने शक्ती वदंन यात्रा उद्या दिनांक ६ रोजी सायंकाळी ४ वाजता काढण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष अभय इंगळे यांनी दिली आहे.

महाराष्ट्रामध्ये गेली अडीच वर्षापासून अनेक लोक कल्याणकारी योजना राबवत असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार पुन्हा सत्तेत यावे, यासाठी दि.५ ऑक्टोबर रोजी शक्ती वंदन यात्रा पुर्व तयारी बैठक प्रतिष्ठान भवन, धाराशिव येथे भाजपा बुथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व प्रमुख पदाधिका-यांच्याश उपस्थीतीमध्ये ही बैठक घेण्यात आली. महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानीस साकडे घालण्यासाठी या शक्ती वदंन यात्रेचे आयोजन केले आहे. दि. ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ४ वा. प्रतिष्ठान भवन येथून शक्ती वदंन यात्रा सुरुवात करण्यात येणार आहे.या मार्गावरुन निघणार आहे शक्ती वंदन यात्रा. यात्रेचा आरंभ हा प्रतिष्ठान भवन धाराशिव- छत्रपती शिवाजी महाराज चौक- पोस्ट कॉलनी - इडछड कॉलनी रोड- समर्थ नगर- पोलीस लाईन - कालीका देवी- तेरणा कॉलेज- भवानी नगर- दत्त नगर- राधीका हॉटेल - स्वामी समर्थ मंदिर- येडेश्वरी मंदीर- राम नगर- माणिक चौक- उंबरे कोटा- तांबरी विभाग- काळा मारुती चौक - हिंगळजमाता मंदिर - सांजा वेज गल्ली- माऊली चौक- नेहरु चौक- देशपांडे स्टँड- गणेश नगर- अण्णाभाऊ साठे चौक- धारासुर मर्दिनी येथे सामारोप या प्रकारे शक्ती वदंन यात्रेचे आयोजन करण्यात आले. यात कार्यकर्त्यांसह जनतेने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नांदेड विमानतळावरून प्रस्थान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ५ ऑक्टोबर-**

बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवी येथे नंगारा म्युझियम लोकार्पण व जाहीर सभेसाठी आलेले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुपारी २.४५ ला गुरूगोविंदसिंघजी विमानतळावरून मुंबईसाठी प्रस्थान केले. गुरूगोविंदसिंघजी विमानतळावर पोहरादेवी येथून हेलिकॉप्टरने त्यांचे आगमन झाले.आगमनानंतर त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आ.चंद्रशेखर बावनकुळे, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक बिपीन कुमार सिंग,जिल्हाधिकारी अभिजीत राऊत,जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह मान्यवर



उपस्थित होते.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आज दुपारी ठाणे येथील कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. ठाणे येथील कार्यक्रमासाठी यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आ.चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर त्यांच्या सोबत रवाना झालेत.

# आ.पवारांच्या प्रयत्नाने उमरीत उभारला छ. शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. ५ ऑक्टोबर-**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ. राजेश पवार याच्या पुढाकारातून व स्वखर्चाने उमरी शहरातील मोंढा भागात सोळा फूटी भव्य असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पूतळा उभार तोय त्याचें पदपूजन सोहळा आ.राजेश पवार व सौ. पूनमताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजेंचे आगमन उमरी शहरात झाले. आ.राजेश पवार,सर्व समाजाला घेवून चालण्याचे काम लोकप्रतिनिधीचे असते,पिढयानं- पिढया विकासापासून दूर असलेल्या नायगाव विधान सभा मतदारसंघातील उमरी, धर्माबाद,नायगाव तालूक्यातील विकास कामे करण्याचे भाग्य मला मिळाले.तरीही अजून बरीच कामी राहीली आहेत. पुढील काळात निश्चितच नायगाव मतदार संघ राज्यासाठी रोल मॉडेल राहील. मी छत्रपतीचां पूतळा उभारतोय पण राजकारणाला प्रेरीत होवून नाही, तर एक छत्रपती शिवाजी महाराजाचां मावळा म्हणून काम करतो.

पूनमताई पवार यांनीआपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच जय जय जय भवानी, जय जय जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज कि जय म्हणत व्यासपिठ दणाणून सोडले. आमदार साहेबाच्या हातून विधायक कामे होतायत माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. अवघड काम ते सोपे करून दाखवण्याचे सोलूशन म्हणजे आपले लाडके आमदार राजेश पवार आहेत. आपल नायगाव विधानसभा मतदार संघ



हे पूर्वी कुपोषित बाळ होते.आज ती आमदार राजेश पवार यांच्या माध्यमातून सदृढ होताना नायगाव विधानसभा मतदारसंघातील जनता पाहत आहे.

डॉ.विक्रम देशमुख तळेगावकर आपल्या प्रास्ताविकेत म्हणाले,नायगाव विधानसभा मतदारसंघात आज पर्यंत फक्त जाती पातीच,नात्या गोत्याच राजकारण झाल,पण आ.राजेश पवार यांच्या या पाच वर्षाच्या काळात जात-पात न पाहाता विकासाच राजकारण केल.आणि एखाद्या मंत्र्याला लाजवेल असा विकास आपल्या मतदारसंघात केला.निश्चितच पुढच्या टर्म मध्ये आ.राजेश पवार मंत्री होतील यात काही शंका नाही.

यावेळी आ. राजेश पवार, पूनमताई पवार, सुधाकर देशमुख धानोरकर, डॉ. विक्रम देशमुख, संजय कुलकर्णी, विजयकुमार उत्तरवार, मुख्याधिकारी निलम कांबळे, शासकीय कंत्राटदार संजिवअण्णा सवई, सुभाष पेरेवार, सुनिल पाटील शिंदे, ज्ञानेश्वर पाटील सावंत, गजानन मालीपाटील, बापूसाहेब कौडगावकर,विजय पाटील डांगे, बालाजी पाटील इज्जतगावकर, गोंविद अप्पा नलबलवार, पारसमल दर्डा आदी सह शिवप्रेमी जानता, कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### कै.नागोराव दुधंबे यांच्या पुण्यतिथी निमित्त मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान

**मुदखेड**-राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवा तालुका अध्यक्ष सुभाष दुधंबे, सामाजिक कार्यकर्ते, विकी दुधंबे, यांचे वडील कै.नागोराव श्रावण दुधंबे यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्ता दि. ०२ ऑक्टोबर रोजी अंकुर शिक्षण संस्था संचलित निवासी मुकबधिर विद्यालय वसतिगृह कृष्णा नगर येथील मुकबधीर विद्यार्थ्यांना भोजनदान व फळे, आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक हणमंत गवलवाड, सौ सुनिता सुर्यवंशी, गणेश बामणे, भास्कर वाघ, सतिष हजारे, कैलास जामुंदे,सौ वाडेकर माऊशी स्वयंपाकीण,दता हासेवाड, गजानन शिंदे सेवक,बालाजी राठोड, सुभाष दुधंबे, विकी दुधंबे, उद्धव राठोड, वैभव हाटकर, वरद हाटकर, विकास उन्हाळे, अनिल चुडेवार, नितीश चुडेवार, जामुदे सर,दत्ता हासेवाड, गजानन शिंदे, कालीदास रेगुलवाड, लोकडेश्वर गायकवाड, बादल राठोड, हरिश कांबळे, अकाश कमळे, रितेश राठोड, राहुल मात्रे, रंजित पाटिल, सागर पाटिल, संतोष वाघमारे, आर्यन गिरी, अकाश गायकवाड, श्रीनिवास सारले, मयुर पेकमवार, यांच्यासह मित्र परीवार, उपस्थित होते

### सिडको मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

**नवीन नांदेड**-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथील स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांच्या स्वभाव स्वच्छता; संस्कार स्वच्छता अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर सिडको मातृसेवा आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे एस. के. यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १ ऑक्टोंबर २०२४ रोजी पार पडले. नांदेड मनपाच्या अंतर्गत



असलेल्या मातृसेवा आरोग्य केंद्र सिडको झोन येथे स्वभाव स्वच्छता; संस्कार स्वच्छता या मोहिमे अंतर्गत मनपाच्या स्वच्छता विभागातील साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या रक्तातील विविध आरोग्य तपासण्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे एस. के. यांनी करण्यात आल्या.या तपासणीत रक्तातील साखर (शुगर) तपासणी, रक्तदाब (बीपी), किडनी, लिव्हर, अशा अन्य रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. सदरील तपासणीअंती एखादे आजार आढळून आल्यास त्या रुग्णांना पुढील उपचारासाठी गरजेनुसार व आजारानुसार पुढील रुग्णालयात पाठवण्यात येईल अशी माहिती मातृसेवा आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी शिंदे एस्.के. यांनी दिली्. सदरील योजनेअंतर्गत ४० ते ५० कर्मचाऱ्यांनी रक्त तपासणीचा लाभ घेतला तर यावेळी कर्मचाऱ्यांच्या रक्तांच्या तपासण्या करण्यासाठी महालॅबच्या तंत्रज्ञ नाजमीन बेगम व मनीषा मुनेशवार यांनी रक्तचे नमुने घेतले. सदरील आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी सिडको मातृसेवा केंद्राचे आरोग्य कर्मचारी सुरेश अरगुलवार ,विष्णुदास गलपवार, पल्लवी मुगटकर, रमेश डोंगरगावकर यांनी परिश्रम घेतले.

### राजश्री विभुते हिमगिरे यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका म्हणून गौरव

**उमरी**-प्रियदर्शनी कन्या शाळेच्या शिक्षीका राजश्री विभूते ( हिमगीरे ) यांना सन २०२४ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षीका म्हणून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .नाशिक येथे दि २ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या ध्येय उद्योग समूह व दैनिक युवा ध्येय यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या सोहळ्यात राज्यस्तरीय शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला राज्य पुरस्काराने सन्मानीत कर्ण्यात येते . यंदा ही या वर्षीचा राज्य स्तरीय आदर्श शिक्षीका पुरस्कार प्रियदर्शनी कन्या प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका तथा महाराष्ट्रात कवयित्री भाजलेल्या श्रीमती राजश्री विभुते हिमगिरे यांना प्रमुख पाहुणे दिनकर टेमकर शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तम कांबळे जेष्ठ संपादक व लेखक, दिनेश अदलिंग लेखक, अरुण धामणे सर प्रा.शिक्षण अधिकारी , परशराम पावसे शिक्षणधिकारी नाशिक,सुनील बेनके अध्यक्ष -बेनके गुरुजी सोशल ट्रस्ट पुणे, श्रीकृष्ण कुलकर्णी विभाग प्रमुख भोसला मिलिटरी कॉलेज नाशिक, संदीप वाकचौरे शिक्षण तज्ञ ,अण्णासाहेब सदगीर उद्योजक, संदीप बिन्नार, डॉक्टर टी के सदगीर यांची प्रमुख उपस्थिती होती तर प्रमुख आकर्षक सेने अभिनेते रिशी जोरवर हे होते. लहानु निवृत्ती सदगीर संपादक तथा अध्यक्ष युवा ध्येय तथा उद्योग समूह हे कार्यक्रमाचे निमंत्रक होते. आदर्श शिक्षिका सन्मानीत राजश्री विभुते यांच्या संस्थेचे सचिव शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, सुभाषराव गोरठेकर, दासराव देशमुख गोरठेकर तसेच स्त्री रोग तज्ञ डॉ. माधव विभुते, प्रियदर्शिनी कन्या प्रशाला उमरीच्या मुख्याध्यपिका सौ. बेलूरकर मॅडम, धर्माबाद येथील संदिप पाटील, बसापुरे सर, विठ्ठल हिमगिरे सर, नागनाथ माळगे, सतीश माळगे जेष्ठ पत्रकार जी पी मिसाळे , नायगाव चे व्यंकटराव अनेराये, पुंडलिक पा. अनेराये, उमरीचे सर्व पत्रकार बांधव,व्यापारी, शिक्षक, मित्र परिवार यांच्यासह उमरी, गोरठा व परिसरातील सर्व स्तरातून कौतुक व शुभेच्छांच्या वर्षाव करीत आहेत.

# महेश देशमुख तरोडेकर यांच्याकडून नांदेड विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ५ ऑक्टोबर-**

समाजकारणातून राजकीय वाटचालीत अग्रेसर असलेले नांदेड शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देऊन नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात आजपासून जन आशिर्वाद यात्रेला प्रारंभ केला आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळा मरळक (बु.) येथे आयोजित या कार्यक्रमाला नांदेडचे दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र प्रा.रविंद्र चव्हाण, नांदेड शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष तथा,नांदेडचे माजी महापौर अब्दुल सत्तार,नांदेड शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष व आयोजक महेश देशमुख तरोडेकर,युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे,राष्ट्रवादी किसान सभेचे माजी प्रदेश प्रतिनिधी लक्ष्मण भवरे,कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल पावडे,तालुकाध्यक्ष निरंजन पावडे,अनु.जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष सत्यपाल सावंत,संजय वाघमारे, शरद वाघमारे,कर्णराज कोळेव१र, गंगाधर देशमुख आदींसह तातेराव शिंदे, भिवाजी पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाचे शिवाजी शिंदे,देवराव कदम,ओमकार शिंदे, सोनू शिंदे, सुनिल गायकवाड आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# वैद्यकीय अधिक्षक रजेवर तर उप अधिक्षकांचे मौन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,, दि. ५ ऑक्टोबर-**

येथिल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील बाल रोग विभागातील साहित्य परस्पररित्या विक्री करण्यात आले असल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकाराची चौकशी सुरू करण्यात आली असली तरी संबंधीत वैद्यकीय अधिक्षक रजेवर गेले असून उप वैद्यकीय अधिक्षक या बाबतीत माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत.

भंगार विक्रीची निविदा प्रक्रीया पुर्ण झाली. संबंधीत कंत्रादाराने भंगार साहित्य देखील नेले. शासकीय रूग्णालयातील भंगार साहीत्य विक्री झाल्याच्या संधीचा फायदा घेत रूग्णालयातील काही अधिकाऱ्यांनी भंगार साहित्याच्या नावाखाली नवे साहित्य देखील विक्री केले.

या प्रकाराचा गवगवा होताच, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून अधिष्ठाता डॉ. सुधीर



देशमुख यांनी चौकशी समिती नेमली आहे. परंतू शासकीय रूग्णालयातील अधिकाऱ्यांनी 'एकमेका सहाय्य करू'ची भुमिका बजावल्यास लाखो रूपयांच्या घोटाळ्यावर पडदा पडण्याची शक्यता असून या प्रकाराची वरिष्ठ स्तरावर चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

**डॉ. संजय मोरे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती अध्यक्ष**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वार्ड क्र. ६ मधील साहित्य परस्पररित्या विक्री केल्याची तक्रार प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केल्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीसाठी डॉ. संजय मोरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून यात डॉ. रोजेश अंबुलगेकर, डॉ. प्रदित बोडखे, डॉ. वंदना दुधमल, डॉ.मो.समीर, व वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संजय वाकोडे यांचा समावेश आहे. या समितीला चौकशी करून अहतवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**उप वैद्यकीय अधिक्षकांचे मौन**

शासकीय वैद्यकीय महाविद्यायलयाचे वैद्यकीय अधिक्षक रजूवर गेले असल्यामुळे रूग्णालयातील स्वच्छता कामगार, कर्मचारी आदी सर्व जबाबदारी वैद्यकीय उप अधिक्षक टॉ. अभिजीत देवगरे यांच्यावर असली तरी भंगार साहीत्य विक्रीच्या प्रकारावर त्यांनी मौन बाळगल्याचे दिसून आले. त्यातच शासकीय रूग्णालयातील स्वच्छता कामगारांची माहिती उपलब्ध नसल्याचे सांगून त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर जबाबदारी झटकली.

# लाडक्या बहिणीची ग्राहक सेवा केंद्र चालकाकडून अर्थिक लूट

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. ५ ऑक्टोबर-**

लाडकी बहिण योजनेचे पंधराशे रुपये काढण्यासाठी गेलेल्या महिलांची भारतीय स्टेट बँकेच्या अधिकृत ग्राहक सेवा केंद्रचालकाकडून सर्रास अर्थिक लूट होत असून याकडे संबधित बँक अधिकाऱ्यांचे साफ दूर्लक्ष होत आहे.

महिला सक्षमिकरणासाठी राज्यसरकारने दर महिन्याला पंधराशे रुपये राज्यातील महिलेच्या बँक खात्यावर जमा करित असून तसेच शेतकऱ्यांचे विविध प्रकारचे अनूदान देखील शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यावर जमा होत असताना भोकर शहरातील ग्राहक सेवा केंद्र चालकांनी या संधीचा फायदा घेत लाडक्या बहिणी व शेतकरी ग्राहक सेवा केंद्रावर पैसे उचलण्यासाठी गेल्यावर संबधित केंद्र चालकाकडून सर्रास अर्थिक लूट केली जात आहे याकडे संबधित बँक अधिकाऱ्यांचे साफ दूर्लक्ष दिसून येते.भारतीय स्टेट बँकेच्या खातेदारांना अधिकृत ग्राहक सेवा केंद्रावरुन पैसे काढावयाचे असल्यास ग्राहकांना मोफत सेवा देणे बंधनकारक असताना सदरील ग्राहक सेवा केंद्र चालकांनी दोन हजार काढावयाचे जरी असले तरी विस ते पन्नास रुपये अधिकचे मोजावे लागत असल्याने ग्राहकांत संताप व्यक्त होत आहे सदरील ग्राहक सेवा केंद्रावर कूणाचेही अंकूश राहिला नाही परिणामी लाडकी बहिण असो वा शेतकरी यांची भरदिवसा अर्थिक लूट केल्या जात आहे भोकर शहरात जागोजागी ग्राहक सेवा केंद्र चालकांचे मोठ मोठे बॅनर झळकताना अढळून येतात पण सदरील ग्राहक सेवा केंद्र ग्राहकांना सेवा देण्यासाठी का ग्राहकांची लूट करण्यासाठी हा प्रश्न सूज्ञ नागरीकाना पडला आहे.मागील अनेक वर्षापासून ग्राहकांची दिवसा ढवळ्या लूट होत असताना याकडे कूणाचाही लक्ष नाही बँक अधिकारी व ग्राहकसेवा केंद्र चालकांची मिलीभगत असल्यानेच हा प्रकार होत असल्याची चर्चा शहरात असुन संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकाराकडे लक्ष देवून

शहरातल्या सर्वच ग्राहक सेवा केंद्र चालकांची चौकशी करुन लाडक्या बहिणीची होत असलेली अर्थिक लूट थांबविण्यात यावी अशी मागणी सर्वत्र होत आहे.

# मुद्रांक विक्रेता संघटनेचा आज मराठवाडा स्तरीय मेळावा

**नांदेड**- नांदेड जिल्हा मुद्रांक विक्रेता व दस्तलेखक संघटनेचा दि. ६ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता हॉटेल अतिथी शिवाजीनगर नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष शंकर कृष्णाजी भिसे तर प्रमुख अतिथी म्हणून संघटनेचे नेते निलेश कदम, राज जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन पईतवार, सुभाष चावरे, सुनील पारडे, सोपान कांबळे, विनायक रेवलकर, लक्ष्मण भोसले, या बैठकीला संघटनेचे नेते मार्गदर्शन करणार असून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. तसेच याच बैठकीत मराठवाडा अध्यक्षांसह इतर कार्यकारिणी जाहीर करून त्यांना निवडीचे पत्र देण्यात येणार आहे. आदी प्रयत्न करत आहेत.

# सगरोळी मंडळात ईव्हीएम मतदान मशीनचे दाखवले प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. ५ ऑक्टोबर-**

बिलोली तालुक्यातील सगरोळी मंडळातील सगरोळी, बोळेगाव, येसगी, कार्ला (बु), व गंजगाव, कोटग्याळ, बावलगाव, सगरोळी व येसगी तलाठी सज्जा अंतर्गत येत असणाऱ्या सर्व गावात शनिवारी ईव्हीएम मतदान मशीनवर येथील नागरिकांचे मतदान घेत त्यांना ईव्हीएम मशीनचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले आहे.

संपूर्ण देशात काही सामाजिक संघटना व नागरिकाकडून ईव्हीएम मतदान मशीन हटाव अशी मागणी जोर धरत असताना, सरकारकडून आगामी विधानसभा निवडणुकीच्या



पार्शवभूमीवर हे ईव्हीएम मतदान मशीन तंत्रशुद्ध मशीन असल्याचे प्रत्येक गावोगावी जाऊन त्या ईव्हीएम मशीन वर काही नागरिकांचे मतदान घेत मशीन मध्ये बिघाड किंवा कोणत्याही एकाच उमेदवाराच्या निशाणीस मतदान जात नसल्याचे स्पष्टोक्ती सरकार देत असताना दिसून येत आहे. अशाच प्रकारे बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांच्या मार्गर्शनाखाली संपुर्ण बिलोली तालुक्यात ईव्हीएम मतदान मशीनचे प्रात्यक्षिक दाखवण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने दि.५ ऑक्टोंबर रोजीतलाठी सज्जा सगरोळी, येसगी यासह सज्जात येत असलेल्या बोळेगाव, गंजगाव, शिंपाळा, कोटग्याळ, कार्ला (बु) येथे मंडळ अधिकारी एल.जी. तोटावाड, तलाठी धनजंय माळेगावकर संजय पाटील, चक्रधर जाधव या महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांचे ईव्हीएम मतदान मशीन वर मतदान घेऊन ईव्हीएम मशीनचे प्रात्यक्षिक दाखवले आहेत.

# दिव्यांग बांधवांचा मुदखेड तहसिल कार्यालयावर आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ५ ऑक्टोबर-**

प्रहार दिव्यांग क्रांती संघटना व प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिनांक ०३ ऑक्टोंबर रोजी मुदखेड तालुक्यातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी क्रांतीकारी,, आक्रोश मोर्चा,, काढण्यात आला होता. यावेळी अनेक प्रहार पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार मुदखेड व भ्रष्ट अधिकारी यांच्या निषेध व्यक्त केला. अखेर तहसीलदार




यांनी मागण्या मान्य करून लेखी पत्र दिले तेव्हा आक्रोश मोर्चाला स्थगिती देण्यात आली.

आक्रोश मोर्चासाठी नांदेड जिल्ह्यातील प्रहार पदाधिकारी जिल्हा प्रमुख विठ्ठलराव देशमुख, पंढरीनाथ हुंडेकर, श्रीराम पा.पवार , मारोती मामा मंगरूळे , शंकर भाऊ आचेवाड,हनमंतू ढगे, साईनाथ बोईनवाड, संजय पा.भरकडे,संतोष पा.चाबरेकर,एकनाथ तारु, अनिल पा.शेटे, शंकरराव शिंदे,केशरताई शिंदे पा., गोविंद लोणे, साहेबराव निवडंगे, दिलिप पा. शिंदे, असे असंख्य दिव्यांग बांधव, मुकबधीर बांधव,निराधार महिला, वयोवृद्ध व्यक्ती, शेतकरी शेतमजूर, प्रहार कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# नवरात्रोत्सवकाळात उघड्यावरील मास विक्रीवर प्रतिबंध घालावा

## मनसेचे नितीन मोहरे यांचे सहा. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि.५ ऑक्टोबर-**

हिंदू धर्मीयांचा पवित्र समजला जाणारा नवरात्रोत्सव हा सण सुरू झाला असून श्रीक्षेत्र माहूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त लाखो भाविक दाखल होत आहेत परंतु इस्लापूर पासून ते बोधडी गोकुंदा किनवट शहर घोटी फाटा सारखाणी वाई बाजार व माहूर येथे प्रमुख मार्गावर सुरू असलेल्या उघड्या मास विक्रीच्या दुकानामुळे भक्तांना त्रास सहन करावा लागत असून पावित्र्य राखण्यासाठी नवरात्र उत्सवाच्या काळात ९ दिवसासाठी उघड्यावरील मास विक्रीच्या दुकानावर प्रतिबंध घालावा अशा मागणीचे लेखी निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नितीन मोहरे यांनी सहा जिल्हाधिकारी किनवट यांना दिले आहे. निवेदनात नमूद केले आहे की हिंदूधार्मियांचा सर्वात पवित्र समजला जाणारा शारदीय नवरात्रोत्सव हा सण ३ ऑक्टोबर पासून सुरू झाला असून यानिमित्त समस्त हिंदूबांधव सलग ९ दिवस दुर्गा मातेची उपासना करतात. महाराष्ट्र



राज्यात साडेतीन शक्तीपीठापैकी एक प्रमुख शक्तीपीठ असलेल्या श्रीक्षेत्र माहूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्यासह देशातील कानाकोपऱ्यातून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. जागोजागी भक्तांची रेलचेल असते विशेषता महिला भक्तांची संख्या लक्षनीय असते. परंतु इस्लापूर पासून ते बोधडी बुद्रुक,, गोकुंदा, किनवट शहर, घोटीफाटा, सारखणी, वाई बाजार व माहूर येथील प्रमुखरस्त्यालगत जागोजागी उघड्यावर मास विक्रीची अवैध दुकाने सुरू असल्याने भाविकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.मास विक्रीमुळे भाविकांच्या उपासनेचा भंग होऊन अपवित्रता निर्माण होत आहे. भक्तांना नवरात्रोत्सव काळात मास, मच्छी मटन वर्ज्य असून उघड्यावरील मास विक्रीमुळे हिंदूधार्मियांच्या भावनेला ठेस पोहोचत आहे. माहूर येथे दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविक भक्तांच्या धार्मिक उपासनेचा भंग होऊ नये तसेच या काळात पावित्र्य राखले जावे यासाठी इस्लापूर पासून ते बोधडी बुद्रुक गोकुंदा किनवट शहर घोटीफाटा सारखणी वाईबाजार व माहूर या ठिकाणी प्रमुख रस्त्यावर मास विक्री करणाऱ्या दुकानावर ९ दिवसासाठी प्रतिबंध घालून दुकाने बंद ठेवण्याचे आदेशित करावे अशी मागणी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन मोहरे यांनी केली आहे.

# मुदखेड येथील केंद्रिय प्रशिक्षण महाविद्यालयात मेगा सफाई अभियान



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि.५ऑक्टोंबर**

रोजी केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालय मुदखेड येथील प्रांगणात मेगा सफाई अभियान व्ही. पी. त्रिपाठी (कमांडंट) मुख्य प्रशिक्षण अधिकारी, केंद्रीय राखीव पोलीस दल,

यांच्या नेतृत्वाखाली दि. ०२ ऑक्टोंबर रोजी मेघा सफाई अभियान राबविण्यात आले. यावेळी केंद्रीय विद्यालय मुदखेड चे प्राचार्य अजय चौकिकर, मुख्याध्यापक पांडुरंग फाजगे, दिपक कुमार उप कमांडंट, अरुण कुमार उप कमांडंट, शाहनवाज उप कमांडंट, जैकी कुमार सहाय्यक कमांडंट, हरी शंकर प्रसाद सहाय्यक कमांडंट, श्री एस. रमेश सहाय्यक कमांडंट, अधिनस्थ अधिकारी आणि स्टाफ तसेच नगर पालिकेचे कर्मचारी असे सर्वांनी मिळून. स्वच्छता ही सेवा/ मेगा सफाई अभियान राबविण्यात आले.

# ज्ञानेश्वर आप्पाने यांना गुरू गौरव आदर्श शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद, प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद केंद्राचे केंद्रप्रमुख आप्पाने ज्ञानेश्वर तेजेराव यांना दि. (०४ अक्टो) २०२४ शुक्रवार रोजी जिल्हा परिषद नांदेड यांच्या वतीने, जिल्हा गुरु गौरव आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी खासदार अशोकराव चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, शिक्षण अधिकारी (प्राथमिक) डॉ. सविता बिरगे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक) माधव सलगर, तालुका गटशिक्षणाधिकारी (मुखेड) कैलास होनधरणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आप्पाने यांच्या कार्यकाळात स्पर्धा परीक्षा, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, वनभोजन, परिसर भेट, शैक्षणिक सहल, वृक्षारोपण, अंधश्रद्धा निर्मूलन, नव साक्षर अभियान राबविण्यात आले. त्याचप्रमाणे समाजाच्या सहभागातून शाळेला विविध शैक्षणिक साहित्य सहजपणे उपलब्ध करून दिले.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## वीरशैव तेली समाजातर्फे कुंकुमार्चम पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. ५ ऑक्टोबर-**

श्री जय जगदंबा माता मंदिर गोलाई लातूर येथे वीरशैव तेली समाज लातूर यांच्या महिला समितीतर्फे ओटी भरण्यात आली ही कुंकूमार्चम पूजा समाजातील दीडशे महिलांनी एकत्र येऊन देवीच्या मंदिरात आनंदाने उत्साहात साजरी केली.

याप्रसंगी समाजाचे अध्यक्ष सर्व संचालक, महिला समितीच्या सदस्य, सर्व युवक कार्यकर्ते यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळ यांचे अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ यांनी कुंकूमार्चम पूजा पार पाडण्यासाठी जे सहकार्य केले. त्याबद्दल वीरशैव तेली समाज लातूर, अध्यक्षांनी त्यांचे आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त



### राज्यस्तरीय, विभागीय क्रीडा स्पर्धेत यशवंत विद्यालयाचे यश

**अहमदपूर, दि. ५ ऑक्टोबर -**

शालेय क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे दिनांक २९ सप्टेंबर झालेल्या ज्ञानमाता विद्या विहार या शाळेच्या मैदानावर लातूर विभागीय बास्केटबॉलच्या १९ वर्ष मुलींच्या स्पर्धा संपन्न झाल्या. त्यामध्ये यशवंत विद्यालयातील १९ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ विभागामध्ये प्रथम आला असून कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तो पात्र ठरला आहे. तसेच दिनांक २६ ते २९ दरम्यान बुलढाणा येथे झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत यशवंत विद्यालयाचा ऋषभ शिवशंकर गुणाले हा विद्यार्थी राज्यात प्रथम येवून सुवर्णपदक पटकावले. त्याची छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यासमवेत माही मंगेश कुलकर्णी, साक्षी महेश पाटील, स्मिता दिनकर गुट्टे यांनी इप्पी सांघिक प्रकारात रौप्य पदक पटकावले. शालेय विभागीय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत आपल्या विद्यालयाचा १७ वर्ष वयोगटातील मुलांचा संघ सर्वप्रथम आला असून यवतमाळ येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी पात्र झाला. जिल्हा क्रीडा संकुल लातूर येथे झालेल्या विभागीय कुस्ती स्पर्धेत संगम कुंटे हा विद्यार्थी प्रथम आला असून त्याची राज्यस्तरासाठी निवड झाली. विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक संतोष कदम, दीपक हेंगणे, प्रभावती मिरजकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल संस्थेचे सचिव डी.बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगविकर, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, उपसचिव डॉ. सुनिता चवळे, मुख्याध्यापक गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी आदींनी अभिनंदन केले.



### आईच्या सुसंस्कारातच भारतीय मातीचे संस्कार : प्रा. पाटील.

**अहमदपूर, दि. ५ ऑक्टोबर-**

शिक्षणाबरोबरच संस्कार, चारित्र्य आणि शौर्याचा ऐतिहासिक ठेवा आईने बालकांच्या मनात रुजवावा, भारताच्या मातीचे संस्कार आईच्या सुसंस्कारतच आहे, असे प्रतिपादन शिवव्याख्याते,प्रख्यात निवेदक, प्रा.मारोती बुद्रुक पाटील यांनी केले. उन्नी (ता. अहमदपूर) येथील शंभुराजे नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन व मशाल धारकांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सुसंस्काराला पोरखी झाली पिढी या विषयावर प्रा.मारोती बुद्रुक पाटील बोलत होते. पुढे बोलातांना ते म्हणाले, शिवरायांच्या जीवन चरित्रा सारखे दुसरे चरित्र अजूनही वाचायला मिळत नाही.हिमालयासारखा तेजस्वी शिवरायांचा इतिहास युवकांनी आपल्या डोक्यात घेतला तर येणाऱ्या भविष्यकाळात परत सुराज्य निर्माण करता येईल परंतु आजची तरुण पिढी व्यसनाधीन होऊन संस्कारहीन होत चालली आहे. यावेळी तुळजापूर ते उन्नी पायी पदयात्रा मशाल घेऊन येणाऱ्या युवकांचा इंजिनीयर विष्णू आडाव यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. अजय गंगथडे, शिवशंकर आडाव, माधव केरले यांच्या मार्गदर्शनाखाली श्याम आडाव, तुकाराम केरले, दिपक गंगथडे, माधव जाधव, श्याम चोथवेसह ४० रणयौध्याचा सन्मान करण्यात आला.



### श्री अनंतपाळ नूतन विद्यालयाचे फुटबॉल स्पर्धेत यश

**शिरूर अनंतपाळ, दि. ५ ऑक्टोबर-**

श्री अनंतपाळ नूतन विद्यालयाच्या १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या फुटबॉल संघाने दैदिप्यमान विजय संपादन करत विभागीय स्तरावर यश संपादन केले आहे. नांदेड येथील ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल या ठिकाणी झालेल्या स्पर्धेत चुरशीच्या लढतीत चार संघाला हरवून उपांत्य फेरीत मजल मारली आणि शेवटचा सामना श्री अनंतपाळ नूतन विद्यालयाची टीम व महानगरक्षेत्रातील लातूरच्या बंकट लाल विद्यालयाच्या संघासोबत चुरशीच्या लढतीत लढत दिली यामध्ये दोन्ही संघाचे चार समान गुण झाले आणि शेवटच्या तीन सेकंदामध्ये बंकटलाल विद्यालय विजय झाला. यामध्ये श्री अनंतपाळ नूतन विद्यालययाचा विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक आला याबद्दल संस्थेचे अध्यक्ष नामदेवराव जगताप, चिटणीस प्रभाकरराव कुलकर्णी, सहचिटणीस भारत कोंडेकर, शाळेचे मुख्याध्यापक मादलापुरे शिवाजी वैजनाथराव संघ प्रशिक्षक आनंद पौळकर यांचे संस्थेच्या वतीने व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. अनंतपाळ नूतन विद्यालयाच्या या यशाबद्दल नगर नगरपंचायत च्या वतीने नगराध्यक्षाचे प्र.गणेश धुमाळे यांनी विजयी संघाचे व प्रशिक्षक आनंद पौळकर आणि श्रीमती मानूरकर यांचा सत्कार केला. यावेळी पाणीपुरवठा सभापती उमाकांतराव देवगरे,शंकर दाजी बेंबळगे, विद्यासागर वाले, संजय मादळे, विनोद देवंगरे, नवाज चौधरी उपस्थित होते.

## पामतेल आयात केल्याने सोयाबीनला भाव नाही

### आमदार बच्चू कडू

### चाकूर शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. ५ ऑक्टोबर-**

चाकूर येथे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत चाकूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या हस्ते संपन्न झाले. आझाद चौकातील वर्टीकल गार्डन व बसस्थानक परिसरातील स्वच्छता गृहाचे फित कापून शुभारंभ करण्यात आला.

रस्ते करणे म्हणजे विकास नसुन रस्त्यावर चालणार्या माणसांना जपले पाहिजे मात्र हे सरकार अन्न पिकविणाऱ्या पेक्षा अन्न खाणाऱ्यांना जास्त महत्त्व देत आहे आणि खाणाऱ्यांचाच विचार करीत आहे.तसेच पामतेल आयात केल्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीनला योग्य भाव या सरकारने दिले नाही. कर्मचाऱ्यांना दवाखान्यासाठी जास्तीचा खर्च दिला जातो मात्र सर्व सामान्य माणसाला फक्त पाच लाख रुपयांची अट घातली जाते.सर्वांनी हक्काची लढाई थांबवू न्यू.राजकीय नेत्यापेक्षा आपला स्वतःच्या बापाकडे जास्तीचे लक्ष द्या असा अनमोल सल्ला दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी दिला. माझ्या अंगावर हजारो केस आहेत अनखी होतील पण स्वतःच्या स्वार्थासाठी एकही केस नाही सर्वसामान्य जनतेसाठी कितीही केस झाल्या तरी मी सक्षम आहे असे कडू म्हणाले.

भारताला स्वातंत्र्य मिळाले पण आजही पाण्यासाठी जणता वणवण भटकंती करत आहे. अन्न, वस्त्र निवारा या मूलभूत गरजा असून ते



मुभलक प्रमाणात मिळाल्या पाहिजेत.माणसाने पाण्यासारखे नितळ राहिले पाहिजे. आमदार यांच्यावर साडेतीन लाख रुपये खर्च होतो पण शेतकऱ्यांवर अत्यंत अल्प खर्च केला जातो. जिल्हा परिषद शाळेत मतदान करणाऱ्यांची मुलं शिकतात त्यामुळे जिल्हा परिषदा टिकल्या पाहीजेत याकडे सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. कपील माकणे यांच्या संकल्पनेतून चाकूरकरांना या योजनेच्या माध्यमातून दररोज मुभलक प्रमणात पाणी मिळेल.असे आश्वासन बच्चू कडू यांनी सभेला संबोधित करताना दिले.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत चाकूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचा भूमीपूजन सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार बाबासाहेब पाटील होते तर आ.बच्चू कडू यांच्या हस्ते वाढीव पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन झाले.

यावेळी भाजपा प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, प्रहारचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ चौगुले,नगराध्यक्ष कपील माकणे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरूके, उपनगराध्यक्ष अरविंद बिरादार,सोसायटी चेअरमन डॉ. गोविंद माकणे, मुख्याधिकारी प्रतिक लंबे, गटनेत्या हिरकणा लाटे, स्वच्छता व आरोग्य सभापती वैशाली कांबळे, माजी नगराध्यक्ष तथा बांधकाम सभापती मिलिंद महालिंगे, पाणी पुरवठा सभापती भागवत फुले, मुज्जमिल सय्यद, ज्योती स्वामी,सुजाता रेड्डी, शाहीनबानु सय्यद, गंगुबाई गोलावार, ॲड. युवराज पाटील, आत्माराम डाके, नितीन रेड्डी, पपण कांबळे, संगमेश्वर लाटे, बालाजी सुर्यवंशी, साईप्रसाद हिप्पाळे आदी उपस्थित होते.

जाहीरनाम्यात दिलेले आश्वास आम्ही बच्चूभाऊ कडू यांच्या सहकार्याने पुर्ण केले असून चाकूर शहराला २० लाख लिटर पाण्याची आवश्यकता आहे. आता नवीन वाढीव पाणीपुरवठा योजनेमुळे ७० लाख लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र होणार आहे.त्यामुळे चाकूरचा पाणी प्रश्न या योजनेमुळे कायमचा मिटणार आहे.

चाकूरला अग्नीशामक गाडी, अग्निशमन मोटारसायकल दलितवस्तीचे सभागृह, बसस्थानक येथे स्वच्छता गृह असे अनेक कामे केलेले आहेत अनखीन पुढील कार्यकाळात राहीलेले सर्व कामे पुर्ण करणार आहोत असे आश्वासन नगराध्यक्ष कपील माकणे यांनी दिले.

## अतिवृष्टीचे अनुदान आठवडाभरात शेतकऱ्यांच्या खात्यावर : क्रीडामंत्री बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ५ ऑक्टोबर-**

सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीने तालुक्यातील ३७ हजार दोनशे सोळा हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते यावेळी शेतकरी बांधवांच्या पाठीशी महायुतीचे सरकार खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही उदगीर - जळकोट मतदार संघाचे आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली होती. महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या दि. ०४ सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोबत घेऊन उदगीर तालुक्यातील लोहारा सर्कलमधील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली होती. यावेळी शेतकरी बांधवांना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी आश्वासन देऊन तो शब्द क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी पाळला असून उदगीर जळकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना सप्टेंबरमधील अतिवृष्टीचे तब्बल ७० कोटी रुपयाचे अनुदान मंजूर करण्यात आले असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे. सप्टेंबर, २०२४ या कालावधीत राज्यात विविध जिल्ह्यात अतिवृष्टी/पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन कटिबध्द होते. त्या अनुषंगाने उदगीर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ५१ कोटी तर जळकोट तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी १९ कोटी असे एकुण मतदार संघासाठी ७० कोटी रुपायांचे सप्टेंबर, महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनुदान लवकरच प्रशासनाच्या वतीने पुढील आठवड्यामध्ये संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यांवर अनुदान वर्ग करण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले आहे.

## जेष्ठ पत्रकार निरंजन टकले यांचे आज व्याख्यान

**उदगीर, दि. ५ ऑक्टोबर-**

लातूर जिल्ह्यातील वाटेगाव येथील न्यायाधीश लोया यांच्या मृत्यू संदर्भात शोध पत्रकारिता करुन गूढ उलगडणारे निर्भीड पत्रकार निरंजन टकले यांचे उदगीर येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रयास चळवळीच्या माध्यमातून रघुकुल मंगल कार्यालय उदगीर येथे सत्याग्रह : माणुसकीच्या शत्रू संगे युद्ध आमचे सुरु या विषयावर आज रविवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:०० वाजता कार्यक्रम होणार आहे. इलेक्ट्रॉनिक इंजीनियर असलेले निरंजन टकले यांनी गेल्या तीन दशकांपासून पत्रकारिता केली आहे.

## राधे दांडीया महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ५ ऑक्टोबर-**

दि. ८ ते १० ऑक्टोबर दरम्यान राधासाई दांडीया महोत्सव व स्पर्धेचे आयोजन दुध डेअरी, दुधिया हनुमान मंदिर शेजारी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली करण्यात आल्याची माहिती संयोजक अभिजित औटे, श्याम ठाकूर, दीपाली औटे, संगीता नेत्रगावे शुभांगी वट्टमवार, मीरा चंबुले व अनुराधा मुक्कावार यांनी दिली.

या स्पर्धा फक्त युवती व महिलांसाठी आयोजीत करण्यात आले असून तिकीट दर प्रत्येक स्पर्धकांसाठी १०० रु. ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये फॅन्सी ड्रेस, युवती गट, महिला गट, महिला ग्रुप व बालगट असे विभाग असणार आहेत. या दांडीयासाठी दि. ५ ते ७ ऑक्टोबरपर्यंत मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

स्पर्धा दि. ८, ९ व १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते १० यावेळेत होणार आहेत. या स्पर्धेमध्ये महिला गटास प्रथम पारितोषिक रु.३१००, द्वितीय रु.२००० व तृतीय रु. ११००, महिला (वैयक्तीक ) पारितोषिक प्रथम रु.१५००, द्वितीय रु. १००० व तृतीय रु. ७५०, युवती गट प्रथम पारितोषिक रु. २१००, द्वितीय रु.१५०० व तृतीय रु. ११००, युवती गट (वैयक्तिक) प्रथम पारितोषिक रु. १०००, द्वितीय रु.७५० व तृतीय रु. ५००, महिला ग्रुप (४ पेक्षा जास्त) प्रथम पारितोषिक रु. ३१००, द्वितीय रु.२००० व तृतीय रु. ११००, बालगट (वय ६ ते १२) प्रथम पारितोषिक रु. १०००, द्वितीय रु. ७५० व तृतीय रु. ५०० तसेच फॅन्सी ड्रेस (सिंगल) प्रथम, द्वितीय व तृतीय भेटवस्तू देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी मुख्य प्रशिक्षक म्हणून सुनील कोळी व श्रध्दा कोळी हे काम पाहणार आहेत. या दांडीया महोत्सवाच्या सल्लागारपदी माजी आ. गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, सुभाष नागठाणे, माजी जि. प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, डॉ. विश्वनाथ डांगे, सुधाकर पंदीलवार, डॉ. स्मृती स्वामी, डॉ. पुष्पा गवळे, डॉ. स्मिता वंजे, डॉ. सचिन स्वामी आदी मान्यवर असून या दांडीया महोत्सवात युवती व महिलांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन सह आयोजक शीतल नाटकरे, प्रीती कवटीकवार, सुमन पवार, अश्विनी मानकरी, संगीता पाटील, डॉ. सुलोचना येरोळकर, स्वाती गुरुडे, पल्लवी मुक्कावार, ॲड. पुनम टाकळे, मधुमती कनशेट्टे, मानसी चन्नावार, स्नेहा चणगे, डॉ. शीतल जाधव, चंचला हुगे, सुप्रिया हिंगणे, मीनाक्षी पाटील, काजल मिरजगावे, सुनीता तेलंगे, कीर्ती कांबळे, संगीता बागडी, गंगा पांडे, दीपाली आंबेसंगे, ज्योती स्वामी, अस्मिता सोनफुले, शीतल बलशेटवार, डॉ. राखी वरनाळे, प्रीती पटवारी, अंजली राजपाल, मंजुषा कुलकर्णी, निकिता इनानी, स्नेहल कोटलवार, स्वाती बांगे, सुरेखा गुजलवार, महिता कोयले, पल्लवी पोलावार, संगीता पंदीलवार, ज्योती कोटलवार, अर्चना चिकटवार, नीता गुडमेवार, कल्पना मुंढे, सुनंदा वट्टमवार, स्वाती देवशेटवार, सारिका आंबेसंगे, दीपा मुक्कावार, मनीषा मुक्कावार, रंजिता देवशेटवार, उमा मुक्कावार, अदिती पारसेवार, सीमा मुंगीलवार, अनुसया गुडमेवार, आशा बिरादार, सुरेखा कुमठेकर, वैशाली कांबळे, संगीता गुमनर, आशा कुंडगीर, सविता शेट्टे, रंजना पिगळे व प्रसिद्धी प्रमुख रविंद्र हसरगुंडे यांनी केले आहे.

## तुळजाभवानीच्या भक्तांसाठी आरोग्य तपासणी

### आलमला येथील फार्मसी महाविद्यालयाचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, ५ आक्टोबर-**

दसऱ्यानिमित्त आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या भक्तांना आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वश्वर शिक्षण प्रसारक मंडळाअंतर्गत असलेल्या डी फार्म ,बी फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने औसा-तुळजापुर महामार्गावर गरजूभक्तांच्या आरोग्याची मोफत तपासणी करुन प्रथमोपचार केंद्र व अन्नछत्राचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेच्या वतीने गेल्या ११ वर्षापासून उपक्रम सुरु आहे.



श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरु असलेल्या शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुल, ब्ल्यू बर्ड ज्युनीअर सायन्स कॉलेज, विश्वेश्वरय्या औद्योगीक प्रशिक्षण संस्था, आलमला, विश्वेश्वरय्या पब्लीक स्कूल लातूर, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तुळजाभवानी अन्नछत्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान तुळजापूर मोड, औसा येथे आई तुळजाभवानीच्या भक्तांची सेवा म्हणुन मोफत आरोग्य तपासणी, प्रथमोपचार व अन्नछत्राचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, डॉ. नितीन सगरे, वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, औसा, राहुल कुमार भोळ, सहाय्यक पोलिस निरीक्षक, संदीप राठोड, पोलिस स्टेशन, भादा, डॉ. नारागुडे नितीन, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, औसा यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्रवीण मिटकरी, प्रकाश माने, अजय शेटे, आकाश मंदे, लक्ष्मण सूर्यवंशी, शिवाजी जाधव, प्रमिला शिंदे, प्राथमिक आरोग्य केंद्र, आलमला, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, डॉ. समीर शफी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. अजय फुगटे, वागदरे एस. एस., भावले गिरीशंकर, गोपाळ माळी, बालाजी विभुते, डॉ. अशोक गिरी, डॉ. अक्षय भांबरे, डॉ. वनिता वडेवाले, डॉ. रामेश्वर धानुरे उपस्थित होते. शिबीराच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर बोंडगे, रुपेश गायकवाड, बाबाराव शिंदे, ज्ञानेश्वर घोडके, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेत आहेत.

## पानगाव-खरोळा फाटा रस्त्याच्या कामास सुरुवात

### माजी सरपंच सुकेश भंडारे व जनतेच्या आंदोलनाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

पानगाव ते खरोळा फाटा क्रमांक ३६१ हा राष्ट्रीय महामार्ग २०१८ साली मंजूर झाला आसून गेल्या चार वर्षापासून हा रस्ता रखडलेला होता. या रस्त्याचे काम सुरु व्हावे म्हणून अनेक आंदोलने झाली पण रस्ताच्या प्रश्न अनेक अडचणी येवून मार्ग निघत नव्हता त्यामुळे पानगांव व परिसरातील व्यापारी, नागरिक विद्यार्थी यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे पानगावचे माजी सरपंच सुकेश भंडारे पानगाव व परिसरातील मुरढव, हनुमंतवाडी, फावडेवाडी, नरवटवाडी, रामवाडी, पाथरवाडी, मुसळेवाडी, गोविंदनगर, भंडारवाडी, घनसरगांव, तळणी मोहगांव येथील नागरीकांना सोबत घेवून १५ ऑगस्टपासून खरोळा फाटा येथे साखळी उपोषनास सुरवात करण्यात आली.

उपोषनास बसल्यास सुद्धा प्रशासन कसलीच दखल घेत नसल्यामुळे पानगांव व पानगांव परीसरातील खेडे पाड्यातील नागरिकांनी रस्ता रोको, बोंबाबोंब, हलगी नाद, अर्ज नग्र अशी अनेक वेगवेगळी आंदोलने केली पानगाव बाजारपेठ सुद्धा बंद करून निषेध व्यक्त केला. खरोळा फाटा ते पानगाव रस्ता रखडल्यामुळे पानगाव येथील बाजारपेठ पूर्णपणे बंद पडण्याच्या मार्गावर होती. या सर्व आंदोलनाची दखल घेऊन दिनांक १९ सप्टेंबर रोजी आंदोलन करते शेतकरी महामार्ग अधिकारी महसूल विभाग . नागरिक यांची संयुक्त बैठक अप्पर जिल्हा अधिकारी संगीता टकले यांच्या दालनात सर्व विषयावर चर्चा होऊन सर्व विभागाच्या अधिकारयांना सोबत घेऊन शेतकऱ्यांसोबत चर्चा करून संयुक्त मोजणी करून अहवाल सादर करावा अशा सूचना दिल्या. त्यानंतर संयुक्त मोजणी करून शेतकऱ्यांची शंभर रुपयांच्या बॉण्डवर रस्ता करावा म्हणून संमती पत्र व रस्ता संयुक्त मोजणी अहवाल शासनास सादर करण्यात आला.त्यानंतर दिनांक ९ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यामुळे पानगाव व पानगाव परिसरातील जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



खरोळा फाटा ते पानगाव या रखडलेल्या रस्त्यामुळे जनतेने केलेल्या वेगवेगळ्या आदोंलनामुळे शासनाने दखल घेवून कामास सुरवात केली. हे सर्व आंदोलनकर्ते, शेतकरी, व्यापारी, जनता या सर्वांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

- सुकेश भंडारे, माजी सरपंच, पानगांव.

गेल्या ५२ दिवसांपासून आम्ही आंदोलन करते आंदोलन स्थळी घर दार सोडुन रस्त्यासाठी आंदोलन स्थळी बसून आहोत. गेल्या दोन दिवसापूर्वी आंदोलन स्थळी जोराचा वादळी पाऊस होऊन आंदोलन स्थळापासून दोनसे फुटावर विज पडून एका शेतकऱ्यांचा बैलाचा मृत्यू झाला आम्ही त्या दिवसी त्या दिवसी जिव मुठीत धरून भिजत रात्र काढली. तर ऐके दिवसी आंदोलन स्थळी रात्रीच्या वेळी साप पन आला होता अशा विविध संकटाला आम्ही आंदोलन कर्ते सामोरे जात आहोत. आम्ही सर्व आंदोलनकर्ते रस्त्याचे काम पुर्ण होई पर्यंत हे आंदोलन सुरुच ठेवनार आहोत.

- **झानोबा गुडे,** आंदोलन कर्ते पानगांव.